सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, ०४ सप्टेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १६३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# लालपरी ठप्प! प्रवाशी संतापले



## संप करु नका, मुख्यमंत्र्यांचे आवाहन

**मुंबई : महाराष्ट्र राज्य परिवहन (एसटी) कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संपामुळे राज्यभरातील एसटी सेवा विस्कळीत झाली आहे, त्यामुळे प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. गणेशोत्सवाच्या तोंडावर संपाची घोषणा झाल्याने चाकरमान्यांनाही त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज (४ सप्टेंबर) सायंकाळी ७ वाजता सह्याद्री अतिथी गृहात तातडीची बैठक बोलावली आहे. मुख्यमंत्री शिंदे यांनी एसटी कर्मचाऱ्यांना संप स्थगित करण्याचे आवाहन केले आहे. ते म्हणाले, एसटी ही गावोगावी पोहोचणारी महत्त्वाची सेवा आहे. गणेशोत्सवाच्या काळात अनेक नागरिक खरेदीसाठी आणि इतर कामांसाठी एसटीवर अवलंबून असतात. त्यामुळे संप टाळा आणि चर्चेतून तोडगा काढू. एसटी कर्मचाऱ्यांनी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन, प्रलंबित महागाई भत्ता, वाढीव घरभाडे भत्ता, आणि इतर वित्तीय मागण्यांसाठी बेमुदत संप पुकारला आहे. या मागण्यांसाठी ४८४९ कोटी रुपयांच्या शिल्लक रकमेचे वाटप करण्यात यावे, अशी मागणी करण्यात येत आहे. मुख्यमंत्री शिंदे यांनी या मागण्यांवर सकारात्मक चर्चा होईल असे आश्वासन दिले आहे आणि आजच्या बैठकीत तातडीचा तोडगा निघेल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.**

मुंबई : 'बहुजन सुखाय, बहुजन हिताय' असे ब्रीदवाक्य असलेल्या एसटी महामंडळाचा गलथान कारभार नेहमीच सुरु असतो. कायम तोट्यात चालणाऱ्या एसटीला गणपती, दिवाळी आणि होळी सारख्या सणाच्या वेळेला आर्थिक उत्पन्न मिळवण्याची संधी असताना नेमके त्याचवेळी एसटीचे कर्मचारी संपासारखे हत्यार उपासून प्रवाशांना वेठीस धरतात. आताही एसटी कर्मचाऱ्यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता संप पुकारल्याने प्रवाशांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. तुम्हाला मुलं-बाळं आहेत आणि आमची मुलं-बाळं आज पहाटेपासून रस्त्यावर रडत आहेत. आयाबहीणी आणि वृद्धांची देखील मोठी गैरसोय होत आहे. यामुळे सामानसुमान आणि परिवारासह गावाकडे निघालेले चाकरमानी चांगलेच संतापले आहेत. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन मिळावे त्याचबरोबर मागील आठ वर्षांपासूनच्या थकीत महागाई भत्ता, घर भाडे भत्ता नक्कीच, व वार्षिक वेतन वाढ करावी अशा प्रलंबित मागण्यांसाठी राज्यभरातील सर्व एसटी कर्मचाऱ्यांनी आक्रमक भूमिका धारण केली आहे. आज सकाळपासूनच एसटी कर्मचारी संघटनेकडून संपाची हाक दिली आहे. अनेक जिल्ह्यातील डेपो मधून एसटी फेऱ्या पूर्णपणे बंद ठेवण्यात आल्यामुळे बाप्पाच्या आगमनासाठी निघालेल्या चाकरमान्यांसह विद्यार्थ्यांना याचा मोठा फटका बसला आहे.

एकीकडे 'प्रवाशांचे होणाऱ्या हालामुळे आम्ही माफी मागतो. परंतु आम्हालाही मुलंबाळं आहेत. आमच्या घरी देखील सण आहेत. परंतु कमी वेतन आणि सरकारकडे केल्या जाणाऱ्या मागण्या अपूर्ण असल्यामुळे आमचेही हाल होत आहेत', असे म्हणत एसटी कर्मचाऱ्यांनी मागणी केली आहे. तर दुसरीकडे एसटी बसचे आरक्षण करुनही प्रवाशांचा खोळंबा होत आहे. एसटी महामंडळ आणि कर्मचाऱ्यांच्या या भांडणात सर्वसामान्यांना वेठीस धरण्यात येत असल्याने प्रवाशांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

राज्यभरात या आंदोलनाचा फटका बसल्याचे पाहायला मिळत आहे. डेपोमध्ये साडे सातची एसटी बस होती. मात्र दोन-अडीच तास होऊनही बस निघत नसल्यामुळे प्रवाशी संतापले असता कर्मचाऱ्यांकडून ही बस कुठेही जाणार नाही, असे प्रवाशांना सांगण्यात आले. त्यामुळे प्रवाशांमध्येही संताप व्यक्त होत आहे. आम्ही मुलाबाळांसह सकाळपासून इथे उभे आहोत. दोन-तीन महिन्यांआधी रिजर्वेशन करुनही एसटीचा पत्ता नाही. एसटी मंडळाकडून आंदोलनाबाबत कोणतीही पूर्वकल्पना दिली नाही. गणपतीची पूर्व तयारी करण्यासाठी गावाकडे जायचे आहे. परंतु सर्व खासगी गाड्यांसह रेल्वे आरक्षण देखील भरले आहे. त्यामुळे आता आम्ही गावी कसे जायचे, असा प्रश्न प्रवाशांनी उपस्थित केला आहे. तसेच एसटी कर्मचाऱ्यांकडून सर्वसामान्यांना वेठीस धरण्यात येत असल्याची संतप्त प्रतिक्रिया प्रवाशांकडून व्यक्त केल्या जात आहेत.

एसटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे शाळकरी मुलांचे देखील मोठे हाल झाले आहेत. वस्तीसाठी गेलेल्या बसने प्रवाशी विद्यार्थी शहरात आले असून माघारी जाण्यासाठी बसफेरी नसल्याने त्यांना आर्थिक भुर्दंड बसणार आहे. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांनी तातडीने संप मिटवावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण व युवानेत्या श्रीजया चव्हाण थेट शेतकऱ्यांच्या बांधावर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०३ सप्टेंबर-**

जिल्ह्यासह अर्धापूर तालुक्यात ३१ ऑगस्टच्या रात्रीपासून सुरू असलेल्या संततधार पावसाचा जोर मागील ७२ तासापासून कायम असल्यामुळे तालुक्यातील सर्वच नदी नाल्यांना महापूर आला आहे. गावाला शहराशी जोडणारे प्रमुख रस्त्यावरचे नदी नाल्याच्या पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे तालुक्यातील शेलगाव बुद्रुक, शेलगाव खुर्द, सांगवी, भोगाव, देळुब खुर्द, या गावांचा पूर्णपणे संपर्क तुटला होता. आजही शेलगाव या गावचा संपर्क तुटलेलाच आहे. अनेक गावातील शेतीला तळ्याचे स्वरूप आले होते तर नदीकाठचे शेतीतले पिके कापूस, सोयाबीन, मूग, हळद, ऊस, केळी व पालेभाज्या हे पिके खरडून गेली. मागील ७२ तासापासून पिकात पाणी असल्यामुळे पिके सडून जाण्याची भीती शेतकऱ्यांचा निर्माण झाली.

**सरसकट शेतकऱ्यांना तात्काळ मदत जाहीर करण्याची शेतकऱ्यांची मागणी**

यावर्षी सोयाबीन व इतर पिकांची स्थिती चांगली असल्याचे दिसून येत होती परंतु या तीन दिवसाच्या पावसाने होते त्याचे नव्हते केले म्हणून या भागातील शेतीच्या नुकसानीचे सर्वे ड्रोन कॅमेरा व गुगलद्वारे करून सरसकट सर्वच शेतकऱ्यांना शासनाने तात्काळ मदत जाहीर करावी अशी मागणी करत तालुक्यातील शेतकरी बांधवांनी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्याकडे आपल्या भावना व्यक्त केल्या.



राज्याचे माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांनी आज अर्धापूर तालुक्यातील शेलगाव बुद्रुक व खुर्द. या गावाच्या नदीपर्यंत जाऊन पूर परिस्थिती पाहणी केली. नवी आबादी शेलगाव येथील सर्वसामान्य जनतेशी संवाद साधला. त्यांच्या अडी-अडचणी जाणून घेतल्या. यानंतर मेंढला खुर्द-बुद्रुक, खडकी, सांगवी, गणपुर, कोंढा, देळुब खुर्द, भोगाव या गावातील पूर परिस्थितीची पाहणी करून या पूर परिस्थितीमध्ये निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीबद्दल माहिती जाणून घेतली. सोबत असलेल्या अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या त्यांच्यासोबत भाजप युवानेत्या श्रीजयाताई अशोकराव चव्हाण यांची उपस्थिती होती. तसेच विभागीय अधिकारी , तहसीलदार रेणुकादास देवणीकर महसूल व वेगवेगळ्या विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांच्यासह माजी सभापती किशोर स्वामी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय देशमुख लहानकर, बालाजी पाटील गव्हाणे, गटविकास अधिकारी दत्तात्रय कदम, नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, राजू शेटे, व्यंकटी राऊत, संचालक मोतीराम पाटील जगताप, नगरसेवक बाबुराव लंगडे, बालाजी कदम, यशवंतराव राजेगोरे, सोनाजीराव सरोदे, डॉ.विशाल लंगडे, राजू पाटील कल्याणकर, चंद्रमुणी लोणे, शंकरराव ढगे यांच्यासह वेगवेगळ्या गावातील पदाधिकारी, शेतकरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ऐन गणेशोत्सवाचा तोंडावर एस टी कर्मचाऱ्यांना संप

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०४ सप्टेंबर :- एस.टी. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपात कन्नड आगारातील चालक,वाहक सह सर्व कर्मचारी सहभागी झाल्याने मोठी तारांबळ झाली आहे



महाराष्ट्रातील लालपरी म्हणजे एसटी कर्मचाऱ्यांनी २०२१ मध्ये मोठं आंदोलन केलं होतं. त्यावेळी जवळपास दोन महिने बसची चाके थांबली होती. त्यानंतर आता पुन्हा राज्य परिवहन महामंडळाचे कर्मचारी संपावर गेले आहेत. राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांनी पुन्हा एकदा आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी संप पुकारला आहे. आर्थिक बाबी, खासगीकरण अशा विविध मागण्या विधानसभेची आचारसंहिता लागण्याआधी मान्य करा, असा इशारा देत एसटी कर्मचारी संघटनेने आजपासून बेमुदत संप पुकारला आहे. ऐन गणेशोत्सव काळात लालपरीला ब्रेक लागल्याने गणेशोत्सवासाठी गावी जाणाऱ्या चाकरमान्यांसह सर्वसामान्यांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता आहे. एसटी कर्मचाऱ्यांना शासकीय नियमानुसार वेतन देण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले होते. मात्र मुख्यमंत्र्यांनी दिलेली मुदत उलटून गेल्यानंतरही कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काचे वेतन मिळत नसल्याने ऐन गणेशोत्सव काळात एस.टी.कर्मचाऱ्यांनी संपाचे हत्यार उपसले आहे. सर्वच एसटी कर्मचारी चालक वाहक कार्यशाळा कर्मचारी या संपात सहभागी झाल्याने एसटी सेवा ठप्प झाली आहे.मात्र गणेशोत्सव अवघ्या दोन दिवसांवर आलेला असताना एसटी कर्मचाऱ्यांनी संपाचे हत्यार उभारल्याने एसटी प्रशासनाचे धाबे दणाणले आहे. या संपात संजय पाटे,योगेश राठोड,वाल्मिक शर्मा,गणेश दिघोळे,विकास पवार,नंदू निकम,राजू काकुळते, ज्योती साळवे,एम.पी.चव्हाण,सुदाम भारती, विजय आदमाणे, गणपत पवार,अविनाश पवार,राजू पवार,भगवान देवरे,रोहिदास पवार,संतोष बैरागी, जी.एस. दिघोळे,सह चालक,वाहक मोठ्या संख्येने सामील झाले होते

# सोयगाव आगारला पहिल्याच दिवशी ३ लाखाचा फटका

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.३ सप्टेंबर

ऐन सणासुदीच्या काळामध्ये एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांनी बेमुदत धरणे आंदोलनाचे हत्यार उपसल्यामुळे सोयगाव येथील आगारात कर्मचाऱ्यानी मंगळवारी आंदोलन केल्या मुळे प्रवाशांना त्याचा थेट फटका बसला आहे.पहिल्या च दिवशी सोयगाव आगारात ८५ फेऱ्या रद्द झाल्याने एसटी महामंडळाचे अंदाजे तीन लाखाचे उत्पन्न बुडाले असुन विद्यार्थी व प्रवाशांचे हाल झाले आहे.



एसटी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन मिळावे यासह अनेक मागण्यासाठी एसटी कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. एसटी कामगार संयुक्त कृती समितीच्या वतीनं मंगळवारी सोयगावला बेमुदत धरणे आंदोलनाला बसले आहेत. आंदोलनामुळे सोयगाव आगारातील एकही बस बाहेर गेलीं नाही.आर्थिक व महत्त्वाच्या प्रश्नांची सोडवणूक होत नसल्यामुळे कामगारांमध्ये निर्माण झालेली नाराजीने महामंडळातील अनेक कर्मचारी संघटनांनी एकत्र येत संयुक्त कृती समितीच्या वतीने आज दि.३ सप्टेंबरपासून बेमुदत आंदोलनाचा सुरुवात केली आहे याचा थेट फटका प्रवाशांना बसला आहे.या आंदोलनात सोयगाव आगारातील सर्व लिपिक,चालक, वाहक आणि मेकॅनिक यांच्यासह कर्मचारी धरणे आंदोलनात सहभागी झाले.

दरम्यान मंगळवारी पहाटे सात वाजेच्या आत बाहेर गेलेल्या १२ बस फेऱ्या सकाळी अकरा वाजेपर्यंत सोयगाव आगारात परतल्या होत्या त्यामुळे प्रवाशांना अर्ध्यावर च प्रवास करावा लागला आहे.

# हवाई दलाचे लढाऊ विमान कोसळून मोठा स्फोट; जीवितहानी टळली!

बाडमेर : राजस्थानच्या बारमेरमध्ये काल रात्री हवाई दलाचे मिग-२९ हे लढाऊ विमान कोसळले. विमान कोसळल्याची माहिती मिळताच नागाणा पोलिस स्टेशन घटनास्थळी पोहोचले आणि मदतकार्य सुरू केले. सुदैवाने विमानाचा पायलट अपघातापूर्वी सुखरूप बाहेर पडला.

अपघातानंतर या लढाऊ विमानाला मोठी आग लागल्याने पोलिसांनी अग्निशमन दलाच्या पथकाला घटनास्थळी बोलावून घेतले. अग्निशमन दलाच्या पथकाने घटनास्थळी पोहोचून विमानाला लागलेली आग विझवली. या दुर्घटनेत पायलट सुरक्षित असल्याचे हवाई दलाकडून निवेदन जारी करण्यात आले आहे. मिग-२९ हे लढाऊ विमान शेतात कोसळल्याने घटनास्थळी ग्रामस्थांची मोठी गर्दी झाली होती. ग्रामस्थांची गर्दी पाहून पोलिसांनी फायटर प्लेनला चारही बाजूंनी घेराव घातला असून कोणालाही घटनास्थळी जाऊ दिले जात नाही.

या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन कोर्ट ऑफ इन्क्वायरीचे आदेश देण्यात आले असून, या अपघाताच्या कारणांचा शोध घेण्यात येणार आहे. अपघातानंतर परिसरात घबराटीचे वातावरण निश्चितच होते, मात्र वैमानिकाच्या शहाणपणामुळे मोठी दुर्घटना टळली असून कोणीही जखमी झाले नाही. या घटनेने पुन्हा एकदा हवाई दलाची तत्परता आणि वैमानिकांची कार्यक्षमता अधोरेखित केली आहे. भारतीय हवाई दलाने ट्विटरवर (एक्स) जारी केलेल्या संदेशात म्हटले आहे की, बाडमेर सेक्टरमध्ये रात्रीच्या नियमित प्रशिक्षण मोहिमे दरम्यान हवाई दलाच्या मिग-२९ लढाऊ विमानात गंभीर तांत्रिक बिघाड झाला, ज्यामुळे पायलटला बाहेर काढावे लागले. विमानातून पायलट सुरक्षित असून कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही. कोर्ट ऑफ इन्क्वायरीचे आदेश दिले आहेत.

# वडगावची ग्रामसभा राशन दुकानाने गाजली, ग्रामसभेला अनेक सदस्य गैरहजर; ग्रामस्थात नाराजी

तभा प्रतिनिधी

वाळूज महानगर: वडगाव कोल्हाटी येथील ग्रामसभेचे ३ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता ग्रामपंचायत कार्यालय सभागृह येथे आयोजित केली होती. या ग्रामसभेला सरपंच ग्रामसेवक व तीन ग्रामपंचायत सदस्य हजर होते तर बरेचसे ग्रामपंचायत सदस्य गैरहजर होते यामुळे ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त करत ग्रामसभेला न येणाऱ्या सदस्यांना नोटीसा काढाव्यात अशी मागणी करत तिसगाव येथे स्थलांतरित झालेल्या राशन दुकानदाराविषयी तक्रारींचा पाढा वाचला.

यावेळी ग्रामसभेचे अध्यक्ष सरपंच सुनील काळे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू असलेले या ग्रामसभेत नागरिकांनी वडगाव येथील एका राशन दुकानदाराचा मृत्यू झाल्यानंतर हे दुकान तिसगाव येथे स्थलांतरित केल्याने अनेक नागरिकांना समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याचे सांगितले. दुकानातील थांब व नेहमी बंद असल्याने राशन घेता न आल्याने आमचे राशन कार्ड कायमस्वरूपी बंद होईल अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली. तिसगाव हे मुख्य महामार्गाच्या पलीकडून असल्याने अनेक महिला नागरिक व वृद्ध यांना रस्ता ओलांडताना गंभीर अपघात होऊन जीव गमवावा लागेल तेव्हाच प्रशासनाला जाग येईल का असा प्रश्न प्रकाश निकम यांनी उपस्थित करत या दुकानाविषयी तातडीने निर्णय घेऊन सध्या कार्यरत कमिटी बरखास्त करण्याची मागणी केली. तर रमेश दाभाडे यांनी सावित्रीबाई फुलेनगर येथील सुरू असलेल्या परमपूज्य महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे काम लवकर पूर्ण करण्याची मागणी केली. साजापूर वडगाव या रस्त्याचे काम आहे सुरू करण्याचे अनेक ग्रामस्थांनी मागणी केली. याविषयी सरपंच सुनील काळे यांनी सांगितले की सदरील राशन दुकानात संदर्भात अनेक वेळा प्रशासनाकडे पाठपुरावा केलेला आहे यावेळेस निर्णय घेऊन नागरिकांना होत असलेला त्रास दूर करण्याचा प्रयत्न करू तसेच वडगाव साजापूर या रस्त्यासाठी निधी मंजूर झाला असून पावसाळ्यामुळे काम थांबले असल्याचे सांगत या रस्त्याचे काम ऑक्टोबर मध्ये सुरू करण्यात येईल असे सांगितले.

या ग्रामसभेमध्ये टीबी मुक्त भारत मोहीम सुरू केल्याची माहिती देत, स्वच्छ भारत मोहिमेचा दुसरा टप्पा सुरू करणार असल्याचे सांगितले. परिसरातील नागरिक शौचालयाचा वापर न करता उघड्यावर जाऊन बसतात त्यांच्यासाठी परिसरामध्ये गुड मॉर्निंग पथक नेमणार असल्याचे सरपंच काळे यांनी सांगितले.

या ग्रामसभेला उपसरपंच ज्योती साळे सदस्य माधुरी समोसे, विजय सरकटे, ग्रामविकास अधिकारी भीमराव भालेराव, तंटामुक्ती अध्यक्ष कृष्णा काळे, प्रकाश निकम, सिद्धार्थ बनकर, यशपाल कदम, नामदेव सावते, आकाश मगर, गजानन मिसाळ, भाग्यश्री साळवे, महादेव सोनटक्के, राजू दहातोंडे, रमेश दाभाडे, विष्णू ढाकणे, आरती काळे, नंदा राजपूत आदींसह नागरिक व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# कन्नड तालुक्यात दोघांचा पुराच्या पाण्याने घेतला जीव!

तभा वृत्तसेवा

कन्नड, दि.०४ सप्टेंबर - तालुक्यात दोन वेगवेगळ्या ठिकाणी पुराच्या पाण्याने जीव घेतल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे

ओढ्याला आलेल्या पुरात एक १८ महिन्याचा चिमुकला वाहून गेल्याची दुर्दैवी घटना घाटशेंद्रा (ता. कन्नड) येथे सोमवारी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास घडली.साई कडूबा बोरसे असे मयत बालकाचे नाव आहे

घाटशेंद्रा येथील कडूबा हरिद्वार बोरसे हे सुरमाळ टेकडीच्या उत्तरेला असलेल्या रेउळगाव पांधीला लागून असलेल्या गट नं ३२४ मधील शेतात राहत होते.रविवारी रात्रीपासून चिंचोली लिंबाजीसह घाटशेंद्रा परिसरात मुसळधार पाऊस सुरू होता. सोमवारी सकाळी घाटशेंद्रा परिसरात धगफुटीसदृश पाऊस झाल्याने कडूबा





बोरसे राहत असलेल्या पांधी नाल्याला मोठा पूर आला .या पुराचे पाणी बोरसे यांच्या घरात शिरले.मुलाची आई घरात स्वयंपाक करीत होती तर मुलाचे वडील घरातील साहित्य बाजूला लावत असताना हा लहानगा मुलगा खेळत खेळत वडिलांचे मागे आला .वडील कामात व्यस्त असताना यावेळी अचानक पाणी वाढल्याने घरात खेळत असलेला साई हा या पुराच्या पाण्यात वाहून गेला. घरात साई दिसत नसल्याने सईच्या आईने पतीला साई विषयी विचारणा केली असता साई दिसून आला नाही.त्यांना संशय आल्याने त्याचा शोधाशोध



घेतला असता घरा जवळून काही अंतरावर असलेल्या नाला मध्ये त्याचा मृतदेह आढळून आला.या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे

शहरात असलेल्या माळीवाडा परिसरातील इसम संतोष विश्वनाथ थोरात वय ३५ वर्ष सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास शेतात जनावरांना चारा पाणी करण्यासाठी गेला होता त्याच्यासोबत त्याचा मित्र आदिनाथ एकनाथ धनेधर वय २२ वर्ष हा होता

शेतातून परतत असताना माळीवाडा -बहिरगाव रस्त्यावर असलेल्या पुलावरून पाण्याचा प्रवाह वाढला होता त्यावेळी संतोष आणि आदिनाथ पुलावरून पायी गावात येत होते अचानक पाण्याचा प्रवाह वाढल्याने हे दोघे पाण्यात वाहून जात असताना वाल्मिक रहाणे यांनी प्रसंगवधान राखत आदिनाथ यास

**ब्राम्हणी शिवना नदीचा संगम माळीवाडा जवळ होतो याच नदीच्या पात्रावर पूल असुन हा मुख्य रस्ता आहे,बहिरगाव, भोकणगाव, दाभाडी,आदी गावांना जाण्यासाठी हा महत्त्वाचा रस्ता असुन या रस्तावर असलेल्या पुलाची मात्र दयनीय अवस्था झाली आहे**

वाचवले, परंतु संतोष पाण्यात वाहून गेला संतोष यास वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न गावकऱ्यांनी केले पण रात्र असल्याने आणि पाण्याचा प्रवाह वाढत असल्याने सर्व प्रयत्न सपशेल अयशस्वी होत होते, घटनास्थळी कन्नड शहर पोलिस तत्काळ दाखल झाले सकाळी ७ वाजेच्या सुमारास छत्रपती संभाजीनगर येथून पथक आले तब्बल पावणे सहा तासांच्या अथक शोध मोहिमे नंतर ब्राम्हणी नदी पात्रात संतोष यांचा मृतदेह आढळुन आला,जिल्हावरून आलेल्या पथकातील कर्मचारी ए. पी.कोल्हे, राजदीप गंगावणे, अजिंक्य मगर,दिनेश मुंगसे, प्रसाद शिंदे,शिवसंभा कल्याणकर दिनेश वेलतोडे, सनी खोतकर, किशोर कोळी या पथकाने मृतदेह शोधला आहे. घटनास्थळी नायब तहसीलदार दिनेश राजपूत, मुख्यधिकारी नंदकिशोर भोंबे, तलाठी दिपक एरंडे,सह पोलिस कर्मचारी,उपस्थित होते कन्नड ग्रामीण रुग्णालयात डॉ. सुरेंद्र कुलकर्णी यांनी शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला शहरात या घटनेने हळहळ व्यक्त होत आहे संतोष यांच्या पश्चात आई,वडील,भाऊ,बहिणी,असा परिवार होता सायंकाळी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# सोयगाव तालुक्यात वीज कोसळून शेतकरी ठार

सोयगाव,दि.३ सप्टेंबर : शेतातून घरी परतणाऱ्या शेतकऱ्यावर वीज कोसळून शेतकरी ठार झाल्याची घटना सोमवारी रात्री आठ वाजता नांदा तांड्यात घडली दरम्यान सावळदबारा प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी हजर नसल्याने रात्री शवविच्छेदन साठी साठ किमी अंतरावर सोयगाव ग्रामीण रुग्णालयात शव आणावे लागले आहे तुकाराम मोहन चव्हाण( वय.४०) असे वीज कोसळून ठार झालेल्या मृत शेतकऱ्याचे नाव आहे सदर शेतकरी पोळा सण साजरा केल्या वर शेतात गेले असता पाऊस सुरु झाला त्यामुळे पाऊस थांबे पर्यंत ते शेतात थांबले मात्र रात्री आठ वाजता घरी जाताना त्यांच्या अंगावर वीज पडून मृत्यू झाला आहे महसूल विभागाच्या वतीने तलाठी विशाल शेलकर यांनी तातडीने पंचनामा करून प्राथमिक घटनेचा प्राथमिक अहवाल सोयगाव तहसील कार्यालयात सादर केला दरम्यान सोयगाव सह तालुक्यात सोमवारी रात्री सात वाजेपासून पुन्हा विजांच्या कडकडाटात मुसळधार पावसाने सुरुवात केली होती दरम्यान नांदातांडा ता.सोयगाव येथील शेतकऱ्याच्या अंगावर वीज कोसळून मृत्यू झाला त्यास शवविच्छेदन साठी सावळदबारा प्राथमिक आरोग्य केंद्रात घेऊन गेले परंतु वैद्यकीय अधिकारी नसल्याने मृत शेतकऱ्याचे शव साठ की मी अंतरावर सोयगावला आणावे लागले होते.त्याच्या पश्चात पत्नी,दोन मुले,दोन मुली असा परिवार आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## ३ लाख कोटीं रुपयांचा टप्पा ओलांडला

आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने, व्यवस्थापन अंतर्गत मालमत्तेमध्ये (अ‍ॅसेट अंडर मॅनेजमेंट) ३ लाख कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. ३१ जुलै २०२४ पर्यंत कंपनीचे अ‍ॅसेट अंडर मॅनेजमेंट (एयूएम) ३.१४ लाख कोटी इतके होते. श्री अनुप बागची, एमडी आणि सीईओ, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्स म्हणाले, व्यवस्थापन अंतर्गत मालमत्तांमध्ये ३ लाख कोटी रुपयांचा टप्पा पार केल्याबद्दल आम्हाला आनंद होत आहे. हे आमच्या उत्पादनांना असलेली ग्राहकांची पसंती आणि त्यांना त्यांची दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यास सक्षम करण्यासाठी त्यांचा आमच्यावर असलेला विश्वास प्रतिबिंबित करते. उत्पादने आणि प्रक्रिया सुलभ करण्याचा आमचा दृष्टीकोन आमच्या व्यवस्थापन अंतर्गत मालमत्तेमध्ये वाढ घडवून आणणारा एक घटक आहे.

## सिम्बॉयसिस लॉ अडमिशन टेस्ट २०२५ तारखा जाहीर

मुंबई : सिम्बॉयसिस इंटरनॅशनल (अभिमत विद्यापीठ) तर्फे सिम्बॉयसिस लॉ अडमिशन टेस्ट २०२५ च्या नोंदणी प्रक्रियेला सुरुवात करण्यात येत असल्याची घोषणा करण्यात आली आहे. या विद्यापीठातील कायदे अभ्यासासाठीची ही महत्त्वाची प्रवेश परीक्षा आहे. या वर्षी काही महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. यंदा परीक्षा १३ डिसेंबर (शुक्रवार) आणि १५ डिसेंबर (रविवार) या तारखांना होणार असल्या तरी अर्ज प्रक्रिया नेहमीप्रमाणे मे महिन्याऐवजी अधिकृतरित्या १४ ऑगस्ट २०२४ रोजी खुली करण्यात आली आहे. . ही परीक्षा दोनदा घेतली जाईल आणि दोन पैकी सर्वोत्कृष्ट गुणांना ग्राह्य धरले जाईल.

## 'इंजीनियर्ड फॉर इमोशन' नवीन मोहिमेचे केले अनावरण

पुणे –जेबीएल, एक प्रतिष्ठित ऑडिओ ब्रँड इंजिनिअर्ड फॉर इमोशन' या उत्सवी मोहिमेची घोषणा करताना खूप आनंदित आहे. ही मोहीम उत्तम आवाज देणारी उत्पादने तयार करण्यासाठी जेबीएल ची वचनबद्धता अधोरेखित करून भावना जागृत करण्यासाठी डिझाइन केलेली आहेत. यातील भावना मनोबल वाढवून अभिव्यक्ती आणि प्रामाणिकता मध्ये मदत करतात, प्रेरणा देतात आणि त्यांच्यासोबत शहारेसुद्धा आणतात. सप्टेंबर ते नोव्हेंबर या कालावधीत चालणाऱ्या या मोहिमेचा उद्देश ऑडिओ रसिकांना उत्तम ऑडिओ अनुभव देणे आहे. जेबीएलची 'इंजिनिअर्ड फॉर इमोशन' मोहीम आवाजाचा सखोल स्तरावर कसा प्रभाव पडू शकतो आणि उत्सवाच्या काळात आनंद, नॉस्टॅल्जिया आणि एकजूटता येते.

## अनुभवांसह उत्सवाचा उत्साह

नाशिक – जेबीएल, एक प्रतिष्ठित ऑडिओ ब्रँड इंजिनिअर्ड फॉर इमोशन' या उत्सवी मोहिमेची घोषणा करताना खूप आनंदित आहे. सप्टेंबर ते नोव्हेंबर या कालावधीत चालणाऱ्या या मोहिमेचा उद्देश ऑडिओ रसिकांना उत्तम ऑडिओ अनुभव देणे आहे. जेबीएलची 'इंजिनिअर्ड फॉर इमोशन' मोहीम आवाजाचा सखोल स्तरावर कसा प्रभाव पडू शकतो आणि उत्सवाच्या काळात आनंद, नॉस्टॅल्जिया आणि एकजूटता येते. जेबीएल च्या सणाच्या मोहिमेसाठी फोकस श्रेण्या तुमचा ऑडिओ अनुभव वाढवण्यासाठी डिझाइन केल्या आहेत. टीडब्ल्यूएस/हेडफोन विभागात,ट्यून बीम आणि बड्स आणि ट्यून ७७० एनसी उत्तम आवाज आणि आराम देतात. प्रीमियम नॉइज–कॅन्सलिंग, लाइव प्रो २, लाइव बीम ३ आणि टूर वन एम २ ची वैशिष्ट्ये अतुलनीय स्पष्टता देतात. बार सिरीज साउंडबार तुमच्या लिव्हिंग रूममध्ये डॉल्बी टमॉस आणि मल्टीबीम तंत्रज्ञानासह सिनेमॅटिक सराउंड साउंड सुनिश्चित करतात.

## प्रोक्लेम एक्स्ट्रा हे जलद व दीर्घकालीन नियंत्रण

औरंगाबाद – क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शन लिमिटेड या आघाडीच्या कृषिरसायन कंपनीने मका व सोयाबीन या पिकांसाठी खास विकसित केलेले प्रोक्लेम एक्स्ट्रा हे अत्याधुनिक कीटकनाशक सादर केलेले आहे.या नव्या कीटकनाशकामुळे दीर्घ काळ अळीपासून सुरक्षा मिळते आणि शेतकऱ्यांना अधिकाधिक उत्पादन घेण्यास मदत होते. या अभिनव पर्यायामुळे पीक आरोग्य व उत्पादकता खात्रीपूर्वक सुधारते आणि शेतकऱ्यांच्या उत्पादनाचे यश व शाश्वतता यांतही योगदान मिळते. प्रोक्लेम एक्स्ट्रा हे स्पर्शजन्य, आंतरप्रवाही व केवळ पानांच्या उतिंमध्ये प्रवेशणारे (ट्रान्सलेमिनार) कीटकनाशक असून ते अळ्यांना कमजोर करून नष्ट करते. ते पिकांवरील विविध प्रकारच्या अळ्यांचे प्रभावी नियंत्रण करते आणि त्याचा वापर केल्यानंतर अळ्यांकडून पिकाचे होणारे नुकसान त्वरित थांबून दीर्घकाळासाठी जलद नियंत्रण मिळते.

## 'मु.पो.बोंबिलवाडी'चित्रपटाची केली घोषणा

हरीश्चंद्राची फॅक्टरी, एलिझाबेथ एकादशी, वाळवी या तीन मराठी चित्रपटांना मिळालेल्या राष्ट्रीय पुरस्कारांच्या हॅटट्रिकनंतर आणि यंदाचा सर्वाधिक गाजलेला चित्रपट 'नाच गं घुमा'ने भारत आणि परदेशात मराठी बॉक्स ऑफिस गाजवल्यावर लेखक–दिग्दर्शक परेश मोकाशी आणि निर्माती मधुगंधा कुलकर्णी यांनी त्यांचा नवीन चित्रपट 'मु.पो. बोंबिलवाडी'ची आज घोषणा केली. चित्रपट २५ डिसेंबर २०२४ रोजी रोजी प्रदर्शित करण्याचे नियोजन असून चित्रपटाचे मोशन पोस्टर प्रदर्शित करून चित्रपटाची घोषणा करण्यात आली.

# खेळणा ओवरफ्लो मा नगराध्यक्ष अब्दुल समीर याच्या हस्ते जलपूजन



सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.३, खेळणा मध्यम प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या दोन तीन दिवसात दमदार पाऊस झाल्याने प्रकल्प 'ओव्हरफ्लो' झाला झाल्याने युवानेते माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर अ. सत्तार यांच्याहस्ते खेळणा प्रकल्पात जलपूजन करण्यात आले. यंदा तालुक्यातील अंभई मंडळात सुरुवातीपासून दमदार पाऊस झाल्याने केळगाव प्रकल्प 'ओव्हरफ्लो' झाला आहे. यामुळे खेळणा मध्यम प्रकल्पात पाण्याची आवक वाढली होती. रविवारी रात्री पुन्हा या परिसरात दमदार पाऊस झाल्याने प्रकल्प 'ओव्हरफ्लो' झाला आहे. खेळणा प्रकल्प 'ओव्हरफ्लो' झाल्याने पिण्याच्या पाण्यासह सिंचनाचा प्रश्न मार्गी लागेल असे अब्दुल समीर म्हणाले.

पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांच्या निर्देशाने मागील काळात खेळणातील बराचसा गाळ काढण्यात आला होता, खेळनातील जलसाठा वाढवा यासाठी मंत्री अब्दुल सत्तार यांचा कायम प्रयत्न राहिलेला आहे. खेळणा धरणाची उंची वाढविण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरी स्तरावर असल्याचे युवानेते अब्दुल समीर म्हणाले.

खेळणा मध्यम प्रकल्प ओव्हरफ्लो झाल्याने तालुक्यातील चिचपूर, मांडणा,पालोद, मंगरुळ, दहेगाव, अन्वी, डोंगरगाव, तर भोकरदन तालुक्यातील आव्हाणा, सुभानपुर, मालखेडा येथील शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. हा प्रकल्प ओव्हरफ्लो झाला की पिण्याच्या पाणी आरक्षित करून वरील गावातील शेतकऱ्यांना कॅनॉल द्वारे खरिपासह रबी हंगामासाठी पाणी दिले जाते. यामुळे परिसरातील विहिरींनाही फायदा होत असल्याने यंदा रब्बी चे क्षेत्र वाढेल असा विश्वास अब्दुल समीर यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा गाढे, कृउबा समितीचे संचालक नंदकिशोर सहारे, सतीश ताठे, शेख जावेद, माजी नगराध्यक्षा श्रीमती राजश्री निकम,शिवसेना महिला आघाडीच्या दुर्गाबाई पवार, शकुंतलाबाई बन्सोड, शिवसेना जिल्हा संघटक सुदर्शन अग्रवाल, शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, नॅशनल सूतगिरणीचे संचालक विठ्ठल सपकाळ, शंकरराव खांडवे, माजी उपनगराध्यक्ष संजय आरके, माजी नगरसेवक जितू आरके, राजू गौर, बबलू पठाण, रमेश पालोदकर आदींची उपस्थिती होती.

# अंजना नदीवरील सारोळा येथील पूल पहिल्याच पुरात खचला

## तत्काळ दुरुस्ती करा ,अन्यथा घेणार मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय

तभा वृत्तसेवा

नाचनवेल : दि.३. सप्टेंबर– कन्नड तालुक्यातील अंजना नदीवरील सारोळा येथील मुख्य पूल चार वर्षांपूर्वी नदीला महापूर आल्यामुळे वाहून गेला होता त्यामुळे नागरिकांची वाहनधारक शालेय विद्यार्थी प्रवासी तसेच दळणवळण सुविधा तसेच इतर व्यवहारासाठी रुग्णांना जाण्या येण्यासाठी मोठी समस्या निर्माण झाली होती . त्यानंतर ग्रामपंचायतच्या वतीने संबंधित बांधकाम विभागाला निवेदन देऊन नवीन पुलासाठी मागणी देखील करण्यात आली होती मात्र प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून आल्यास गावकऱ्यांनी तात्पुरत्या स्वरूपाचा नळकांडी पूल तयार करण्यात आला होता. मात्र सोमवार दिनांक २ सप्टेंबर रोजी झालेल्या मुसळधार



पावसामुळे नदीला महापूर आल्याने पहिल्याच पावसात हा पूल खचला त्यामुळे आता मात्र ग्रामस्थ संतप्त झाले असून प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याचे मत गावकरी व्यक्त करीत आहे. ग्रामस्थांनी या नदीपात्रात उभे राहून प्रशासनाचा निषेध केला आहे .

ग्रामपंचायत च्या वतीने ३१ /८/ २०२४ रोजी पालकमंत्री अब्दुल सत्तार यांना देखील निवेदन दिले असल्याचे मत ग्रामपंचायत ने सांगितले. मंगळवार दिनांक ३ सप्टेंबर रोजी पुन्हा संबंधित विभागाला ग्रामपंचायत च्या वतीने निवेदन दिले आहे . या ठिकाणी नवीन पूल मंजूर करून लवकरात लवकर या फुलाचा प्रश्न प्रशासनाने मार्गी लावावा अन्यथा आम्ही समस्त गावकरी ग्रामपंचायत कठोर भूमिका घेऊन कायदेशीर मार्गाने आंदोलन करणार असल्याचे मत ग्रामपंचायत ने व्यक्त केले तसेच येणाऱ्या निवडणुकीवर आम्ही बहिष्कार टाकण्याचा निर्णय देखील घेणार आहोत असे देखील मत ग्रामस्थ व्यक्त करीत आहे. यावेळी जगन्नाथ जंगले यांनी पुलाची दुरुस्ती तात्काळ न झाल्यास येण्याऱ्या विधानसभा मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा देण्यात आला, यावेळी आप्पा टकले,तेजराव जंगले,भास्कर ढमाले, ढमाले,मुन्शी शा,नानेश्वर जंगले,बाळू धनगे,विश्वनाथ ढमाले,संतोष जंगले,अकबर शहा हजर होते.

# साजापूर येथील पोळ्याचा बाजार चिखलात; ग्राहक व व्यापारी त्रस्त

वाळूज महानगर: औद्योगिक परिसरातील जवळपास चार ते पाच खेड्यांचा एकमेव आठवडी बाजार साजापूर येथे प्रत्येक सोमवारी भरतो. मात्र अनेक समस्या पासून येथील व्यापारी व नागरिक त्रस्त असून ग्रामपंचायतचे मात्र याकडे दुर्लक्ष आहे सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने व हा सोमवारचा आठवडी बाजार म्हणजे पोळा सणाचा बाजार होता. या आठवडी बाजारात पावसामुळे सर्वत्र चिखलाचे साम्राज्य पसरल्याने व्यापारी व ग्राहकांची प्रचंड गैरसोय झाली. चिखलामुळे येथे दलदल निर्माण झाली होती. तर चिखलातून व्यापारी व ग्राहकांना मार्ग काढावा लागत असल्याने ते



मी गेल्या अनेक वर्षांपासून या बाजारात चिवड्याचे दुकान चालवतो. नेहमी दुर्गंधी सहन करावी लागते मात्र पावसाळ्यात आमचे फारच हाल होत असतात. ग्राहकांची संख्या कमी होते परिणामी आमच्याही धंद्यावर परिणाम होतो, नुकसान सहन करत व्यापार करावा लागतो. बाजार समिती आमच्या समस्यांकडे लक्ष देत नाही. वसुली मात्र नियमित केली जाते. आमच्या समस्यांकडे ग्रामपंचायतीने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.
–चंद्रकांत नजन चिवडा व्यापारी, साजापुर

नाराजी व्यक्त करत होते. याकडे ग्रामपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याच्या तक्रारी व्यापारी व ग्राहकांनी मांडल्या.

गेल्या चार–पाच दिवसापासून परिसरात भरपूर पाऊस सुरू होता नद्या नाल्यांना पूर आलेला असून सध्याही पावसाचे दिवस आहे आम्ही पोळ्याचा मोठा बाजार असल्याने खूप प्रयत्न केला परंतु पावसामुळे आम्हाला त्या परिसरात मरून टाकता आला नाही तरीही यापुढे आम्ही त्या ठिकाणी मुरूम टाकणार आहे तसेच या परिसरात टाकलेल्या कचऱ्यातून दुर्गंधी मुळे बाजारातील व्यापारी व त्रस्त असल्याने आम्ही या ठिकाणचा कचरा इतरत्र टाकण्याची व्यवस्था करू.
– जनार्दन बनसोडे, सरपंच साजापूर

# सर्ज्या-राजाला सजवून पंचक्रांशीतून मिरवत पारंपरिक पोळासण हर्षोल्हासात साजरा!

### हर्सूल हरसिद्धी मातेसमारेही उत्साह

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

शहरत आणि जिल्ह्यात पारंपरिक बैलपोळा सण उत्साहात साजरा झाला. सोमवारी, २ रात्रभर आणि दुपारपर्यंत सुरू असलेल्या वरूणराजाने घटकाभर विश्रांती घेतल्यामुळे सर्ज्या–राज्याची मिरवणूक शांततेत आणि उत्साहात पार पडली.

शहर परिसरात हर्सूल, जटवाडा, चिकलठाणा, मुकुंदवाडी, इटखेडा, कांचनवाडी, नक्षत्रवाडी, मिटमिटा, पडेगाव, छावणी, बेगमपुरा, देवळाई–सातारा आदी भागांत सजविलेल्या ढवळ्या–पवळ्याची गावपंचक्रोशीतीतून वाजत–गाजत मिरवणूक काढून घरासामोर त्यांचे मनोभावे पूजन करून नैवेद्य भरविला. शहर आणि जिल्ह्यात पोळासणादरम्यान कुठेही अनुचित प्रकार घडला नाही. हर्सूल हरसिद्धी माता मंदिर आणि मुकुंदवाडी–चिकलठाणा परिसरातही पोळा सणाचा उत्साह दिसून आला.

बैलांप्रती कृतज्ञता

कृषी संस्कृतीत आपल्या गोधनाप्रती कृतज्ञता म्हणून पोळा सण साजरा



करण्याची पारंपरिक प्रथा आहे. वर्षभर राबराब राबणाऱ्या आपल्या ढवळ्या–पवळ्याला दोन दिवस विश्रांती आणि यानिमित्ताने त्याला अंघोळ घालून शिंगांना हिंगूळ, अंगाला रंग, बाशिंग, गोंडे बांधून, शिंगांना नानाविध रंगांचे फुगे, तसेच अंगावर झूल पांघरूण, नैवेद्यरूपी गोडधोडाचे दोन घास मुखात भरवून सहकुटुंब सहपरिवार त्याची पूजा करून दर्शन घेतात. शेतकऱ्यांच्या आयुष्यातील हा एक महत्वाचा सण यंदा हर्षोल्हासत सर्वत्र साजरा झाला.

वरूणराजा मेहेरबान

मेहेरबान वरूणराजामुळे बळीराजा सामधानी असून, पोळा सणात त्याचा अपूर्व उत्साह दिसून आला. गेल्या पंधरा दिवसांपासून पोळासणासाठी, आपल्या लाडक्या सर्ज्या–राजासाठी साजश्रृंगार त्यांनी खरेदी केला. रविवारपासूनच पोळा सणाची सुरुवात झाली. रविवारच्या पावसाने कधी नव्हे ते ओढे–नदी–नाले दुथडी भरून वाहत असल्याने बळीराजाने आपल्या लक्ष्मीसमान सर्ज्या–राजाला सुगंधी साबणाने सचैल स्नान घातले.

ढवळ्या–पवळ्यांसोबत न्याहारी

सोमवारी सकाळीच शेतकऱ्यांनी आपल्या लाडक्या सर्ज्या–राजासोबत शेत–शिवार, खळ्यात न्याहारी घेतली. दुपारी सजावट करून गावच्या पंचक्रोशितून सजविलेल्या बैलांची मिरवणूक काढण्यात आली. गावातील ग्रामदैवतांना नारळ फोडून गावाला फेरी मारून पारासमोरील वेशीतून पोळा फुटला. आता पूर्वीप्रमाणे मानाचा बैल पुढे काढण्याची प्रथा राहिली नसल्यामुळे दंगल, हाणामारीच्या घटना घडत नाही. कायदा व सुव्यवस्थेला गालबोट लागू नये म्हणून गावोगावी कडक पोलीस बंदोबस्त तैनात करूण्यात आला होता. एकूण शहर आणि जिल्ह्यात पोळा सणाला कुठेही गालबोट लागले नाही. पोळा शांततेत व उत्साहात पारंपरिक पद्धतीने हर्षोल्हासात साजरा झाला.

हर्सूला पोळ्याचा उत्साह मावळाला

हर्सूल गावात मागील वर्षी रस्त्याचे रुंदीकरण करण्यात आले. यामुळे उत्तरमुखी हनुमान मंदिराचा काही भागही पाडण्यात आला. पूर्वी मंदिर मोठे असल्याने मंदिराच्या समोर व बाजूला बैलच्या जोड्या उभ्या राहत असत त्यामुळे भरगच पोळा भरल्याचे पाहायला मिळत होते. यदा मात्र तो उत्साह दिसून आला नाही. मंदिराचा अर्धा भाग पाडल्यामुळे मंदिराच्या समोरच मानाच्या दोन–चार बैलाजोडया उभ्या असल्याचे दिसून आले. एकूण हर्सूलला पोळ्याचा पूर्वीचा उत्साह दिसून आला नाही.

## मीराबाई पालोदे याचे निधन



सिल्लोड प्रतिनिधी – मीराबाई भाऊसाहेब याचे दीर्घ आजराने निधन झाले मूत्यू समई त्याचे वय ३६वर्षाचे होते या घटने मुळे गावातील आजी माजी व गावातील बरेच प्रतिष्ठात मंडळी अत्य यात्रेत उपस्थित होती त्याच्या प्रशांत एक मुलगा एक मुलगी सासू सासरे असा परिवार आहे.



### जाहीर नोटीस

ने. ता. : २९/०८/२०२४ । प्रो.फी. रुपये । पा. नंबर

ॲड. जी. डी. पिसाळ
अहमदनगर । नि. नंबर : २४

**मोटार अपघात अर्ज नं. : १९३/२०२३**

**अहमदनगर येथील मे. मोटार अपघात न्यायाधीकरण, अहमदनगर यांचे कोर्टात**

**अर्जदार :** **भाऊसाहेब माणिक डिसले**

**सामनेवाले :** **न्यु इंडिया जन. इन्शु. कं. लि.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी सदरचा अर्ज मोटार अपघात नुकसान भरपाई मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील सामनेवाले क्र. २ श्री साई गोदावरी रोड करिअर, रा. एच. ५४६ १०बी ११ श्री साई गोदावरी रोड करीअर हैदराबाद रोड, वाजेगाव, नांदेड, ता. नांदेड, जि. नांदेड ४३१६०३ यांना वारंवार नोटीस काढूनही मे. कोर्टात हजर होत नाही किंवा त्यांना नोटिसीची बजावणी होत नाही, म्हणून मे. कोर्टाचे आदेशानुसार सदरची जाहीर नोटीस दैनिक वर्तमानपत्रात देण्यात येत आहे. सबब तुम्हास या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, सदरच्या प्रकरणामध्ये तुम्हास हजर होण्यासाठी दिनांक २९/०८/२०२४ ही तारीख नेमण्यात आलेली आहे. तरी सदर तारखेस सकाळी ११.०० वाजता तुम्ही स्वतः अगर तुमचे वतीने अधिकृतरित्या अधिकार दिलेल्या व्यक्ती अथवा वकील यांचे मार्फत मा. न्यायालयात हजर राहून तुमचे म्हणणे सादर करावे, तसे न केल्यास अर्जाची सुनावणी तुमचे अपरोक्ष होवून निकाल दिला जाईल, याची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/०७/२०२४ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

हुकूमावरून

**बेंच क्लार्क**
मोटार अपघात न्यायाधीकरण
अहमदनगर

**अधीक्षक**
मोटार अपघात न्यायाधीकरण
अहमदनगर

### जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी–१/जन्म–मृत्यु नोंद/सिआर–३९३
उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २५/०७/२०२४

अर्जदार : जायदाबी भ्र. इब्राहिम शेख (लग्नानंतरचे नांव) जायदाबी पिता करिम शेख (लग्नापुर्वीचे नांव) रा. करिम नगर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार नगर परिषद कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म–मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड एच. जी. शेख यांच्या मार्फत अर्ज सादर करून अर्जदार यांच्या जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९६५ रोजी कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९६५ रोजी कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शामकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तमा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९६५ रोजी कन्नड ता. कन्नड ता. कन्नड येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०४/०९/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०१/०१/१९६५ रोजी कन्नड ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २४/०७/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझया सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

### जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी–१/ जन्म–मृत्यु नोंद/सिआर–३८९
उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २५/०७/२०२४

अर्जदार : इब्राहिम निजाम शेख रा. करिम नगर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार नगर परिषद कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय: जन्म–मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज,

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड एच. जी. शेख यांच्या मार्फत अर्ज सादर करून अर्जदार यांच्या जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९५९ रोजी कन्नड ता. कन्नड येथे आलेला आहे.

अर्जदार यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९५९ रोजी कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९५९ रोजी कन्नड ता. कन्नड ता. कन्नड येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०४/०९/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा, मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०१/०१/१९५९ रोजी कन्नड ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही

करिता दिनांक २.५/०७/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझया सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

### जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी–१/ जन्म–मृत्यु नोंद/सिआर–३९०
उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २५/०७/२०२४

अर्जदार: सना कौसर फारूक शेख (लग्नानंतरचे नांव) सना कौसर नाजिम शेख (लग्नापुर्वीचे नांव) रा. करिम नगर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार नगर परिषद कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय: जन्म–मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड एच. जी. शेख यांच्या मार्फत अर्ज सादर करून अर्जदार यांच्या जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा जन्म दिनांक १३/०१/१९९५ रोजी कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांचा जन्म दिनांक १३/०१/१९९५ रोजी कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा जन्म दिनांक १३/०१/१९९५ रोजी कन्नड ता. कन्नड ता. कन्नड येथे आल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०४/०९/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १३/०१/१९९५ रोजी कन्नड ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २४./०७/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

संचिका क्र.२०२४/३.वि.अ.वै. एम. ए. जी./न. मृ. नोद/सी.आर./२०२४

### जाहीर प्रगटन

दिनांक : २७/०८/२०२४,

अर्जदार : श्री/श्रीमती अरुण सोपानराव धुमाळ रा. वाळूज ता गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

:–: विरुध्द ::

गैरअर्जदार :– ग्रामपंचायत कार्यालय वालुज ता गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :– जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११ (२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार स्वतः नामे अरुण सोपानराव धुमाळ यांचा जन्म दिनांक ०७/०५/१९६६ रोजी मौजे वाळुज ता गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय वाळूज ता गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे. त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अदक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनुसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक २७/०८/२०२४ व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :– वैजापूर.
दिनांक : २७/०८/२०२४.

उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

# ॲड.धर्मराज यांच्या माध्यमातुन युवासेना अव्वल राहणार -भास्करराव अंबेकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**


युवकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्यांना न्याय मिळून देण्यासाठी युवा-सेनेने प्रयत्न करावेत. आज युवकांसमोर बेरोजगारी, व्यसनाधिनता अशा अनेक समस्या उभ्या आहेत. युवा शक्तीला एकीकडे राष्ट्र शक्ती म्हटले जाते. परंतु त्यांच्या समस्यांकडे शासन सोयस्करपणे दुर्लक्ष करीत आहेत. त्यांच्या या समस्या सोडविण्यासाठी युवासैनिकांनी प्रयत्न करावेत त्यांना वाचा फोडण्यासाठी युवासेनेने संघटन मजबुत करावे, असे आवाहन शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे)जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी केले.



जालना शहरातील शिवसेना भवनात विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचे सुपुत्र ॲड. धर्मराज दानवे यांची जालना जिल्हा युवासेना राज्य विस्तारक पदावर नुकतीच नियुक्ती झाली. त्यानिमित्त आयोजित सत्कार कार्यक्रमप्रसंगी अंबेकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार संतोष सांबरे, उपजिल्हाप्रमुख बाबुराव पवार, युवासेनेचे सचिव विनायक चोथे, विस्तारक भरत सांबरे, शहरप्रमुख बाला परदेशी, घनश्याम खाकीवाले, दुर्गेश काठोठीवाले, महिला आघाडीच्या जिल्हा संघटक मंगलताई मेटकर, माजी नगरसेविका गंगुताई वानखेडे, युवासेना शहर जिल्हाध्यक्ष राजु सलामपुरे, मंगेश गव्हाड, शहरप्रमुख अंकुश पाचफुले, अश्विन अंबेकर,युवासेना कार्यकारणी सदस्या अश्विनीताई पवार,उपसचिव मनीषाताई वाघमारे,सहसचिव पूजाताई खंदारे यांच्यासह युवासेना पदाधिकार्यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना अंबेकर म्हणाले की, जालना जिल्ह्यात युवासेना वाढीसाठी भरपुर चालना आहे. वार्डा-वार्डात युवकांनी पक्षप्रमुख उध्दव ठाकरे, युव-ासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या हात बळकट करण्यासाठी संघटन मजबुत करावे. तसेच विद्यार्थी, युवकांचे प्रश्न सोडविण्यासाठी व त्यांना वेळोवेळी मदतीसाठी तात्पर राहावे, असे आवाहन केले. यावेळी सत्कारास उत्तर देतांना नवनियुक्त युवासेना राज्य विस्तारक धर्मराज दानवे म्हणाले की, आगामी काळात जालना जिल्ह्यातील युवासेनेचे संघटन हे राज्यात अव्वल कसे राहील यासाठी मी कसोशीने प्रयत्न करणार आहे. जिल्ह्यातील सर्वच पदाधिकार्यांना सोबत घेवून मजबुत बांधणी करण्यात येईल. या जिल्ह्यात शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) हा पक्ष अत्यंत मजबुत असल्याने या ठिकाणी युवासेनेची बांधणीही चांगली होईल, यात मला शंका वाटत नसल्याचे सांगून जालना जिल्हा युव-ासेनेच्या वतीने केलेल्या सत्काराबद्दल आभार व्यक्त करुन युवासैनिकांना कामाला लागण्याचे आवाहन केले. तर यावेळी माजी आमदार संतोष सांबरे यांनीही ॲड. धर्मराज दानवे यांना नियुक्तीबद्दल शुभेच्छा देत जालना जिल्ह्यात युवासेनेचे संघटन मजबुत करण्यासाठी आपण निश्चित प्रयत्न कराल परंतु पदाधिकार्यांनीही एकमेकांकडे बोट न दाखवता प्रत्येकांनी आपले काम चोख करुन जिल्ह्यात संघटन बांधणी चांगली करावी. तसेच सामान्य नागरिक व युवकांना ही संघटना आपलीशी वाटेल असे कार्य करावे, असे आवाहन केले. यावेळी युवासेना उपजिल्हाप्रमुख ऋषी खिरे,युवासेना तालुकाप्रमुख संदीप मगर, दिपक कदम, कुणाल खाकीवाले, जयेश सांबरे, तेजस कदम, श्रवण सांबरे, विशाल वाघमारे, राजेश शेळके यांच्यासह युवासैनिकांची उप-स्थिती होती.

## आ.आदित्य ठाकरे, खा. संजय राऊत, ना.अंबादास दानवे आज मंठ्यात

### अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची करणार पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/ प्रतिनिधी**

परतुर मंठा विधानसभा मतदारसंघांमध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी शिवसेना नेते आदित्य ठाकरे, खा. संजय राऊत आणि राज्याची विरोधी पक्षनेते ना. अंबादास दानवे बुधवार ता.४ रोजी मंठा तालुक्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात त्यांच्यासोबत खासदार संजय जाधव, आमदार राजेश राठोड, माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया, शिवसेना जिल्हाप्रमुख तथा बाजार समितीचे सभापती ए.जे.बोराडे, उपसभापती गोपाळराव बोराडे,ड. पंकज बोराडे उपस्थित राहणार असून मंठा, पांगरी खुर्द यासह काही गावांना भेटी देऊन नुकसान झालेल्या शेतीपिकांची पाहणी करणार आहे. यावेळी ते शेतकऱ्यांशी संवाद साधणार असून यावेळी शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शिवसेना तालुकाप्रमुख अजय अवचार, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राष्ट्रवादीचे तालुकाध्य यांनी केले आहे.

# संक्षिप्त

## पिकांचे पंचनामे करून भरपाई द्या- माजी आ.अरविंदराव चव्हाण



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना जिल्हयामध्ये गेल्या दोन-तीन दिवसापासून झालेल्या अतिवृष्टी, जास्त पाऊस तर काही ठिकाणी ढगफुटी व जलप्रलय यामुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. अशा शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी, याबाबतचे मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. यामध्ये मूग, उडीद,सोयाबीन, कापूस, तूर व मका तसेच फळ पिकांमध्ये मोसंबी,द्राक्ष व डाळिंब यासारख्या अनेक पीक व फळ पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पीक नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्यात यावे.

तसेच जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी पीक विमा काढलेला आहे, परंतु क्रॉप इन्शुरन्स प डाऊनलोड करून त्यामध्ये नुकसानीची माहिती फोटोसह अपलोड करणे बाबत कृषी विभागाकडून कळविण्यात आले आहे. परंतु ग्रामीण भागातील काही शेतकरी असुशिक्षित असून काही शेतकऱ्यांकडे साधे मोबाईल असल्याने अनेक शेतकऱ्यांना या अँपचा वापर करता येत नाही. त्या कारणाने अनेक शेतकरी पिक विमा भरूनही या योजनेपासून वंचित राहतात. त्यामुळे नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे सरसकट करण्यात यावे. व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये भरपाई देण्यात यावी अशी मागणी दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब चितेकर,कामगार आघाडीचे मराठवाडा कार्याध्यक्ष सतीश वाहुळे,शहर जिल्हाध्यक्ष रिंकल तायडे,युवती जिल्हाध्यक्ष शितल बारोटे, सेवादलाचे जिल्हाध्यक्ष पद्माकर हांडे,जालना विधानसभा अध्यक्ष प्रतापराव शिंदे, उद्योग सेलचे जिल्हाध्यक्ष ज्ञानदेव जगताप, किसान सेलचे जिल्हाध्यक्ष शिवचरण बाळराज, विष्णू घुले, विजय सोनवणे, नवनाथ लोखंडे, किशोर सवडे, विठ्ठल मोहिते, तालुका अध्यक्ष संतोष ढेंगळे,उमेशराव मोहिते, सतीश ढवळे, सलमान पठाण ,पप्पू भाई ,सद्दाम चाउस, प्रवीण मोहिते, कांचन शिरभे ,गीतांजली ढवळे ,सुनीता काटकर, संजय चव्हाण ,भगवान उगले, दिनकर दराडे ,सिद्धार्थ रणशूर, सतीश ईरछे, संतोष घडे यांच्या सह जिल्हयातील शेतकर्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## राजेंन्द्र पा.कोरडे यांची पदोन्नीती झाल्या बद्दल सत्कार गौरव समारंभ



**तभा वृत्तसेवा**
**माहोरा/प्रतिनिधी**

भोरखेडा तालुका जाफ्राबाद येथील श्री. राजेन्द्र तुकाराम कोरडे, जालन जिल्हा अंतर्गत सार्वाजनिक बांधकाम उप विभानात कार्यरित असलेले सहाय्यक राजेन्द्र पा.तुकाराम कोरडे, यांची कनिष्ठ अभियंता म्हणुन पदोन्नती झाली आहे.त्यांचा माहोरा येथील ग्रामसंसद कार्यालय, सरपंच गजानन लहाने मित्र, उपसरपंच बाबासाहेब बोरसे, मंडळ,माजी ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष राजेन्द्र पाटील लोखंडे, यांच्या सयुक्त विद्यामानाने भव्य सत्कार समारंभ करण्यात आला. या माहोरा येथील वैद्यकिय अधिकारी डॉ.अशोक वाघमारे, सेवा निवा निवृती कर्मचारी पाणी पुरवठा इंत्रिनिअर एस.बी. वाघ,माजी सभापती चंद्रकांत चौतमोल, भानुदास बोर्डे, सैय्यद दिलावर, निसार भाई,ग्रा.प.चे सदस्य भास्कार दादा सोनुने, लक्ष्मण वाघ, दादाराव गडकरी, नंदकुमार बोर्डे, शंकर लहाने, पुष्कराज गव्हले,गुलाबराव कळंब, कोंडुबा बोरसे,गणेश गायकवाड,बाळाभाऊ गव्हले,संतोष गौरकर, कृष्णा कुमार जाधव, संतोष वरपे,विजय इंगळे, सोळंके बाबा,अन्य जणांनी राजेंन्द्र पा.कोरडे,शाल श्रीफळ देऊन, सरकार गौरव केला.

## शेतकऱ्यांच्या जिवनाची राखरागोंळी करणाऱ्या निकृष्ट सरकारला जाब विचारण्यासाठी मोर्चात सहभागी व्हाच- कल्याणराव बोराडे

**तभा वृत्तसेवा**
**परतुर, मंठा/प्रतिनिधी**

परतुर-मंठा विधानसभा मतदारसंघातील शेतकरी बांधवांनी गेल्यावर्षी पावसाळ्यात पिकविमा भरला अजुन तो पिक विमा अद्यापही सरकारने शेतकरी बांधवांच्या खात्यावर जमा केला नाही तो तात्काळ जमा करावा तसेच सध्याचे राज्यातले सरकार हे शेतकरी विरोधी धोरण आमलात आणत आहे . माझ्या शेतकरी बांधवांच्या शेतमालाला योग्य हमीभाव आणि हक्काचा पीकविमा देत नाही . या प्रमुख मागण्यांसह अन्य मागण्यांसाठी सत्तेत बसलेल मगरुर सरकार माझ्या शेतकरी बांधवांना पिक विमा देत कस नाय या सरकारला जाब विचारण्यासाठी दिनांक पाच सप्टेंबर गुरुवार रोजी परतुर येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयावर भव्य शेतकरी जनआक्रोश ट्रेक्टर मोर्चा चे आयोजन जण कल्याण विकास मंच परतुर - मंठा, नेर, सेवली विधानसभा मतदारसंघ द्वारे मोर्चाचे आयोजन करण्यात आले असुन या मोर्च्यात माझ्या शेतकरी बांधवांनो हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे अवाहण जणकल्याण विकास मंच चे अध्यक्ष कल्याणराव बोराडे यांनी केले आहे .



## घनसावंगीतील बोररांजणी साठवण तलावाचे जलपूजन



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

मागील चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे बोररांजणी ता. घनसावंगी येथील साठवण तलाव पूर्ण क्षमतेने भरला असून शेती सह पिण्यासाठी मुबलक पाणी साठा उपलब्ध झाल्याने पंचक्रोशीतील ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

बैलपोळा सणानिमित्त सोमवारी ( ता. ०२) तलावात बोररांजणी आणि यावल पिंप्री ग्रामस्थांच्या वतीने जलपूजन करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते नानासाहेब उगले, माजी सरपंच परमेश्वर जाधव, सुभाष उगले, माजी उपसरपंच बाबासाहेब तौर, तुळशीराम गवंदे, पाटीलबा उगले, यांच्यासह बोर रांजणी, यावल पिंपरी पंचक्रोशीतील ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# जालन्याला महाराष्ट्राच्या नेतृत्वाची संधी मिळेल!

### मराठवाडा ट्रेड ऑफ चेंबर्स कॉमर्स पदाधिकाऱ्यांचा सत्कार!



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

व्यापारी पेठ म्हणून देशभर नावलौकिक असलेल्या जालना शहरात व्यापारी महासंघ सशक्त असून व्यापाऱ्यांच्या अडचणी, समस्या सोडवल्या आहेत. गतवर्षी रौप्य महोत्सवी अधिवेशनातून येथील व्यापाऱ्यांनी कल्पनाशक्ती, संघटन कौशल्य, नेतृत्व क्षमता यांची चुणूक मराठवाड्याला दाखवून दिली. या बळावरच मराठवाडा ट्रेड ऑफ चेंबर्स अँड कॉमर्स च्या कार्यकारिणीत जालन्याला मानाची पदे मिळाली असून भविष्यात महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची संधी जालना जिल्हा व्यापारी महासंघास मिळेल असा विश्वास मान्यवरांनी आज व्यक्त केला. स्वातंत्र्य सैनिक रामभाऊजी राऊत नागरी सहकारी पतसंस्था आणि जालना जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने मराठवाडा ट्रेड ऑफ चेंबर्स न्ड कॉमर्स पदाधिकाऱ्यांचा मंगळवारी ( ता. ०३) पतसंस्थेच्या सभागृहात जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विनीत साहनी,संघटन मंत्री तथा पतसंस्थेचे अध्यक्ष राजेश राऊत, सत्कारमूर्ती मराठवाडा ट्रेड ऑफ चेंबर्स न्ड कॉमर्स चे महासचिव शाम लोया,सहसचिव संजय दाड, कार्यकारिणी सदस्य सुभाषचंद्र देवीदान, दिलीप शाह, इंदरचंद तवरावाला, गोवर्धन अग्रवाल,सी.ए .गोविंद प्रसाद मुंदडा, विजयकुमार बगडिया ,लक्ष्मीनारायण मानधना यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रस्ताविकात राजेश राऊत यांनी जालना शहरात पुर्वीपासून व्यापारी बांधवांचे वर्चस्व राहिले असून नेतृत्वास बळकटी मिळावी यासाठी कौटुंबिक सत्कार सोहळा आयोजित केल्याची भूमिका राजेश राऊत यांनी स्पष्ट केली. जिल्हाध्यक्ष विनीत साहनी यावेळी म्हणाले, अतिरिक्त बोजा असलेल्या प्रोफेशनल टॅक्स विरोधात व्यापक स्वरूपात लढा उभारावा लागेल असे सांगून व्यापारी सुरक्षित तर कुटुंब आणि शहर सुरक्षित राहील असे साहनी यांनी नमूद केले. मराठवाडा ट्रेड ऑफ चेंबर्स न्ड कॉमर्सच्या विविध व्यावसायिक संघटनांना एकत्रित करून संघटन मजबुती आणि कार्य वाढीसाठी सगळ्यांची साथ आणि मोलाचे सहकार्य लाभेल अशा अपेक्षा सत्कारमूर्तींनी याप्रसंगी सत्कारास उत्तर देताना व्यक्त केल्या. सूत्रसंचालन आशीष रसाळ यांनी केले तर शांतीलाल राऊत यांनी आभार मानले कार्यक्रमास संजय देठे,प्रा. राजेंद्र भोसले,रूपेश जैस्वाल, गणेश भोसले,मोहन इंगळे, विनोद कुमावत, विनोद पवार,बालाजी बांडे, प्रमोद गंडाळ, निळकंठ कुलकर्णी, आदींची उपस्थिती होती.

## टेंभुर्णी संत सेना महाराज यांची पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा**
**टेंभूर्णी / प्रतिनिधी**

टेंभुर्णी येथें संत श्री सेना महाराजांची पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी संत सेना महाराज यांची मंगल कार्यालयात आरती करण्यात आली आणि त्याप्रसंगी भंडारा ठेवण्यात आला. या भंडाऱ्याचा असंख्य भाविक भक्तांनी लाभ घेतला. याप्रसंगी संत सेना महाराज समिती समारोहाचे अध्यक्ष बंडु जाधव हे होते. याप्रसंगी उपस्थितांमध्ये अरुण जाधव, दिनकर जाधव, उपाध्यक्ष आकाश जाधव, सागर गवळी,दीपक बोराडे ,गजानन बोराडे साईनाथ जाधव, सुनील गवळी खंडू जाधव, शक्ती गवळी, शरद गवळी, तुळशीराम जाधव अशोक जाधव, दिलीप जाधव, रवी गवळी, सुनील जाधव दीपक जाधव, शरद जाधव, पुण्यतिथी समारोह समिती भाग घेतला. पुढील वर्षी विविध कार्यक्रमांनी संत सेना महाराजांची पुण्यतिथी साजरी करण्याचा मानस दिनकर जाधव यांनी व्यक्त केला. पुढील वर्षापासून अनेक समाजातील मान्यवरांचा या समितीत समारोह मधील समावेश असेल असे ते सांगितले. उपस्थितांमध्ये नवभारत शिक्षण संस्थेचे संचालक तथा उपनचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख, संचालक विश्वनाथ सांगोळेंची उपस्थिती लावली.

## कार्याध्यक्षपदी निवडीबद्दल धन्नावत यांचा अग्रवाल समाजातर्फे सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

श्री गणेश महासंघाच्या कार्याध्यक्षपदी ड. महेश धन्नावत यांची निवड झाल्याबद्दल अखिल भारतीय अग्रवाल समाजाच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अखिल भारतीय अग्रवाल समाजाचे जालना जिल्हाध्यक्ष दिलीप अग्रवाल, कोषाध्यक्ष सचिन जयपुरिया, सचिव अनुज बगड़िया, उपाध्यक्ष सचिन भारूका, ज्येष्ठ विधीज्ञ ड सीताराम धन्नावत, कैलाश भारतीया, गिरीश अग्रवाल, गोपाल मल्लावत, अतुल गिंदोडिया, ड. बॉबी अग्रवाल, ड. अश्विनी धन्नावत यांची उपस्थिती होती. श्री गणेश महासंघाचा आजवरचा प्रवास विशद करताना ड. महेश धन्नावत म्हणाले की, सर्वांनी एकत्र येऊन गणेशोत्सव आयोजित करण्याच्या उद्देशाने श्री गणेश महासंघाची स्थापना झालेली आहे. महासंघाच्या माध्यमातून रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिरे, समाज प्रबोधन, वैद्यकीय मदत आणि शैक्षणिक उपक्रम यासारख्या सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे दरवर्षी आयोजन केले जाते. माझ्यावर कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवली, हे मी माझे भाग्य समजतो, असे ते म्हणाले.

# हिडिबाची यात्रेस आजपासुन पारध येथे होणार प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**

आज दि. ४ सप्टेंबर पासून हिडिबाची यात्रेस सुरुवात होणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या यात्रेत आसपासच्या गावातील हजारो नागरिक मोठ्या उत्साहाने सहभागी होऊन यात्रेचा आनंद लुटतात.

कौरव-पांडवांचे पूर्वज अस-लेले व्यासमुनींचे पिताश्री महर्षी पाराशर बांचे संपूर्ण महाराष्ट्रात फक्त पारध येथे मंदिर आहे. रायपोळ नदीच्या काठावरच मुनींचे एक भक्त कै. रामचंद्र महाराज यांनी येथे मठाची स्थापना अंदाजे ४० वर्षापूर्वी केलेली आहे. या मठाच्या चोहोबाजूंनी सुशोभित शोभिवंत झाडे लावलेली आहे. तसेच येथे पिडीची स्थापना करण्यात येऊन गावातील व परिसरातील भाविक मंडळी मोठ्या भक्तीभावाने येत असतात. येथील भाविकांनी पाराशर महाराज मंदिराच्या पाठीमागे उद्या बुधवारपासून हिडीबाच्या यात्रेस प्रारंभ होत आहे. हिडींबा ही राक्षसीण होती. तिने रूपांतर करून महाभारतातील भीम याला मोहित करून त्याच्यासोबत लग्न केले होते. भीमापासून हिडिंबा राक्षसिणीला घटत्कोच नावाचा पुत्र झाला होता. त्याने महाभारतात श्रमदानातून शेवडी नावाची विहीर खोदली असून, त्याविहिरीचे पाणी इतर विहिरीपेक्षा गोड आहे. १९७२ साली गावातील भाविकांनी मुनीचे मंदिर बांधले आहे. ईश्वराची देणगी लाभलेले पारध येथील कलाकार, मूर्तीकार, गवंडी कै. श्रीरंग पेंटर ठेग यांनी कोणत्याही प्रकारचा मोबदला न घेता हे मंदिर बांधण्याचे काम पूर्ण केले.

पारध पोलिस ठाण्यात कै. एकनाथ नावाचे पोलीस कॉन्स्टेबल होते. त्यांच्या स्वप्नात मुनींनी साक्षात्कार दिला. त्यांनी पोलिससेवेत नोकरीत असताना सुध्दा मनोभावे व्रत ठेवून मुनींची एक पाष-ाणाची मूर्ती घडविली. त्यानंतर विधिवत धार्मिक प्राणप्रतिष्ठा करून धार्मिक सो-हळा घडवून आणला, अशाप्रकारे एकनाथ महाराज वाघुरळकर यांनी पारध नगरीत एक इतिहास घडवून आणला. त्यांचा एक चांगला आदर्श इतर कर्मचाऱ्यांनी घेण्यासारखा आहे. सारखा उद्या बुधवारपासून हिडीबाच्या यात्रेस



प्रारंभ होत आहे. हिडींबा ही राक्षसीण होती. तिने रूपांतर करून महाभारतातील भीम याला मोहित करून त्याच्यासोबत लग्न केले होते. भीमापासून हितीबा राक्षसिणीला घटत्कोच नावाचा पुत्र झाला होता. त्याने महाभारतात पांडवांकडून रणांगणात कौरवाविरूध्द युध्द केले होतेत्यामुळे त्याच्या मातेस देवी मानून येथे हिंडींबा राक्षसिणीची पूजा करण्यात येते. हिडीबा राक्षसिणीची भव्य प्रतिकृती तयार करून तिची बैलगाडीवरून संपूर्ण गावातून मिरवणूक काढण्यात येते. येथेच महाकवी व्यासाचे वडील महर्षी पाराशर यांचे भव्य असे मंदिर आहे. या मंदिरावर सुंदर असे नक्षीकाम केलेले आहे. याच परिसरात रामचंद्राचे मंदिर, विठ्ठल-रुक्मीणी व ज्ञानेश्वराचे मंदिर आहे. समोर मोठा सभामंडप आहे. महर्षी पाराशर यांच्या येथील वास्तव्याने या गावास पारध असे नाव पडले असल्याचे येथील वृध्द सांगतात.सन १९८० नंतर या पाराशर महाराज संस्थानचे लोकवर्गणीतून सभामंडप, स्वयंपाक घर, पाण्याचा हौद इत्यादी कामे पूर्ण केलेली आहे. तसेच कै. साळुबाई देशमुख रा. पारध यांनी स्वतः दोन एकर जमीन या पाराशर महाराज संस्थानला दिलेली आहे. त्याचबरोबर विदर्भातील धामणगांव धाड परिसरातील मासरूळ येथील के. रामकौरबाई बैरागी यांनी त्यांच्या मालकीच्या पदमावती शिवारातील चार एकर जमीन संस्थानला दिली. भाद्रपद शु. द्वितीयेला म्हणजे पोळा झाल्यानंतरतिसऱ्या दिवशी हिडींबाची यात्रा भरते, हिंडीबा राक्षसिणीची भव्य प्रतिकृती तयार करून तिची बैलगाडीवरून संपूर्ण गावातून मिरवणूक काढण्यात येते. हिडींबा यात्रेची सुरुवात हलवाई गल्लीमधून बारी समाजाचे ज्येष्ठ नागरिक हे मुख्य रस्त्यावरून मिरवणुकीला पहिल्या दिवशी हिडीबाची मिरवणूक काढण्यात येते. या मिरवणुकीत हजारी भाविक दूरवरून येऊन सहभागी होतात. मिरवणुकीत लेझीम, टाळ, मृदंगांच्या गजरात भजन, भारूड सादर करून रेवड्या, गुलालाची उधळण करीत ही भव्य मिरवणूक काढण्यात येऊन रायघोळ नदीच्या पात्रात मिरवणुकीचा समारोप होतो.

दुसऱ्या दिवशी कुस्त्यांचे भव्य सामने आयोजित करण्यात येतात. यामध्ये नावाजलेले जालना, संभाजीनगर, सिल्लोड, भोकरदन तसेच विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील मल्ल सहभागी होऊन कुस्त्या खेळतात. मोठ्या रक्कमेचे बक्षिसे मिळवितात. या कुस्त्या पाहण्यासाठी प्रचंड गर्दी उसळते. मात्र कुठलाही अनुचित प्रकार येथे घडत नाही, संपूर्ण गावकरी मिळून हा उत्सव खेळीमेळीच्या वातावरणात साजरा करतात. याकरिता गावातील प्रत्येक नागरिक परिश्रम घेत असतो.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# विश्वास जपण्याचे आव्हान!

आठ वर्षांपूर्वी, मार्च २०१६ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी सोहळ्याच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी एक खंत व्यक्त केली होती. परवडणारा आणि जलद गतीने न्याय मिळावा ही सामान्य नागरिकांची अपेक्षा पूर्ण करण्यात अजूनही आपल्या न्यायव्यवस्थेला यश आलेले नाही, अशा शब्दांत त्यांनी न्यायव्यवस्थेचे कान टोचले, तेव्हा मनातली भावना व्यक्त झाल्याच्या समाधानाने सामान्य माणूस सुखावला होता. खुद्द राष्ट्रपतींच्या मुखातूनच यावर बोट ठेवले गेल्याने, जलद गतीने आणि परवडणारी न्यायव्यवस्था आता अंमलात येईल, अशा अपेक्षांचे धुमारेही फुटू लागले होते. सामान्य माणसाच्या या अपेक्षांनी गेल्या आठ वर्षांत कोणता पल्ला गाठला, त्याचा आढावा घेण्यासाठी विद्यमान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या रविवारच्या भाषणाकडे पाहावे लागेल. एकट्या सर्वोच्च न्यायालयात तब्बल सुमारे ८३ हजार खटले प्रलंबित आहेत, ही आकडेवारी या वाटचालीची दिशा दर्शविण्याकरिता पुरेशी बोलकी ठरते. कोविड महामारीच्या काळात प्रलंबित खटल्यांचा निपटारा करण्यात अडचणी आल्याचे कारण दिले जाते. या महामारीच्या काळात न्यायालयांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग आणि ई-फायलिंगसारख्या अत्याधुनिक तंत्राचा वापर करून न्यायदानाचे कार्य सुरू ठेवल्याबद्दल तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी न्यायव्यवस्थेवर स्तुतिसुमने उधळली होती. मात्र, न्याय मिळविण्याचा प्रत्येक मार्ग प्रत्येक नागरिकासाठी सतत खुला असणे व न्याय मिळण्याबाबत प्रत्येक नागरिकाच्या मनात विश्वास असणे, हे न्यायव्यवस्थेचे मानकही तेव्हा राष्ट्रपतींनी उद्धृत केले होते. गेल्या आठ वर्षांच्या वाटचालीतील प्रत्येक अर्ध्या टप्प्यावर राष्ट्रपतींकडून व्यक्त झालेल्या अपेक्षा आणि रविवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केलेली खंत या बाबी एका धाग्यात गुंफल्या, तर एकंदरीत न्यायव्यवस्थेबाबत आठ वर्षांपूर्वी व्यक्त झालेल्या त्या अपेक्षा अजूनही पूर्ततेच्या प्रतीक्षेतून बाहेर पडलेल्या नाहीत, असे म्हणावे लागेल. न्यायालयांतील प्रलंबित खटल्यांची वाढती यादी पाहता, न्यायदानातील विलंबामुळे सामान्य माणसाच्या अपेक्षा अजूनही पूर्ण झालेल्या नाहीत.

रविवारी जिल्हा न्यायपालिकांच्या राष्ट्रीय परिषदेच्या समारोप समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्यायसंस्थेच्या कार्याचा गौरव केलाच; पण आठ वर्षांपूर्वी देशाच्या याच सर्वोच्च पदावरून तत्कालीन राष्ट्रपतींनी व्यक्त केलेल्या व्यथेचा पुनरुच्चारही केला. न्यायव्यवस्थेविषयी आदर व श्रद्धा हा आपल्या परंपरेचाच भाग आहे. देशाच्या संविधानाने नागरिकांस दिलेल्या स्वातंत्र्याच्या हक्काचे संरक्षण करणारी व कायद्याची अंमलबजावणी करणारी संस्था म्हणूनच न्यायव्यवस्थेविषयी हा आदर आहे; याच आठ वर्षांपूर्वी तत्कालीन राष्ट्रपतींनी अधोरेखित केलेल्या भावनेचा पुनरुच्चार विद्यमान राष्ट्रपतींनी केला. देशातील न्यायासनावर बसलेली प्रत्येक व्यक्ती सामान्य नागरिक देवासमान मानते. धर्म, सत्य व न्याय यांचा आदर करणे ही या देशाच्या जनजीवनाची संस्कृतीच आहे. न्यायव्यवस्थेने संवेदनशीलतेने ही संस्कृती जपली पाहिजे, असा राष्ट्रपतींच्या भाषणातील अपेक्षेचा सूर होता. गेल्या काही दिवसांतील देशातील घडामोडींच्या पृष्ठभूमीवर राष्ट्रपतींनी अलिकडेच ज्या काही भावना व्यक्त केल्या, ते पाहता, या घडामोडींचा नवा संदर्भ त्यांच्या या भाषणातून डोकावत असल्याचे जाणवते. महिलांवरील अत्याचाराच्या अमानुष घटनांनी देशात संतापाची लाट उसळली होती, तेव्हा राष्ट्रपतींनी आपल्या भावना अतिशय उद्विग्नपणे व्यक्त केल्या होत्या. असे प्रकार सहनशीलता आणि संयमाची कसोटी पाहणारे असून यापुढे ते सहन करता येणार नाहीत, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली होती. एका वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केलेल्या लेखात कोलकाता येथील बलात्कार व हत्येच्या घटनेचा उद्वेग संवेदनशीलतेने उमटला होता. आता न्यायव्यवस्थेच्या संवेदनशीलतेला त्यांनी साद घातली आहे. कोट्यवधी नागरिकांच्या मनात न्यायाविषयीचा आदर कायम राखण्याची जबाबदारी न्यायसंस्थेवर असल्याने संवेदनशीलतेने व कमी खर्चात, तत्परतेने घरपोच न्याय मिळवून द्यायला हवा, या अपेक्षेचाही या निमित्ताने पुनरुच्चार झाला, तेव्हा दीर्घकाळ प्रलंबित खटल्यांच्या निकालाकडे डोळे लावून न्यायाची प्रतीक्षा करणाऱ्या हजारो पीडितांना पुन्हा एकदा आपल्या भावना व्यक्त झाल्याचे समाधान मिळाले असेल. प्रलंबित खटल्यांची वाढती संख्या आणि त्यामध्ये सतत पडत जाणारी भर हे न्यायसंस्थेसमोरील खरे आव्हान आहे. प्रलंबित खटले प्रमाणित वेळेत निकाली काढण्याकरिता न्यायव्यवस्थेने गेल्या अनेक दशकांत अनेक उपाययोजना केल्या, पण त्या प्रभावी ठरलेल्या नाहीत, हे यानिमित्ताने स्पष्ट झाले आहे. खेडोपाडीच्या गरीब जनतेस कोर्टात जाण्याची भीती वाटते. एकदा न्यायालयाची पायरी चढली तर आपले जगणे अधिक खडतर होईल अशी त्यांची भावना असते, ही त्यांची खंत न्यायसंस्थेने अंतर्मुख होऊन व्यवस्थेचा फेरविचार करावा, असे संकेत देणारी आहे.

एकूणातच न्यायव्यवस्थेविषयी आदर, श्रद्धा आणि विश्वास असलेल्या समाजाचा भ्रमनिरास होणार नाही, याची खबरदारी घेण्याची नवी वेळ न्यायसंस्थेवर आली आहे, या भावनेच्या इतिहासाची पुनरावृत्ती झाली आहे. न्यायालयांच्या साखळीतील प्रत्येक न्यायालयांतील प्रलंबित खटल्यांची वाढती संख्या हे न्यायव्यवस्थेपुढील केवळ आव्हान नव्हे, तर ती एक समस्या होऊ पाहात आहे. न्यायदानास होणारा विलंब हा न्याय नाकारण्याएवढाच अन्यायकारक असतो, असे म्हटले जाते. गेल्या वर्षी टाटा ट्रस्ट या संस्थेतर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या 'इंडिया जस्टिस रिपोर्ट' नावाच्या एका सर्वेक्षण अहवालातून उघड झालेले वास्तव आणि देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधान आणि विविध यंत्रणांच्या प्रमुखांकडून न्यायव्यवस्थेच्या क्षमतेविषयी वेळोवेळी व्यक्त झालेल्या भावना यांत बरेचसे साम्य असल्याचे दिसून आले. न्यायदानाच्या प्रक्रियेतील संथपणावर त्या अहवालानेही बोट ठेवले होते. दर १० लाख लोकसंख्येमागे किमान ५० न्यायाधीश असावेत, असा संकेत देशाच्या विधि आयोगाने १९८७ मध्ये घालून दिला होता. आज साडेतीन दशकांनंतरही हा अनुशेष भरून निघाला नसल्याने विविध न्यायालयांतील प्रलंबित खटल्यांची संख्या पावणेपाच कोटींच्या घरात पोहोचल्याचे स्पष्ट झाले होते. न्यायपालिका हा सामान्य माणसाच्या अपेक्षांचा अखेरचा आधार असतो. तो विश्वास कायम राहावा, प्रत्येकास न्याय मिळावा आणि न्यायव्यवस्था अधिक प्रभावी राहावी यासाठी ठोस उपाययोजना आखण्याचा संकल्प केंद्र सरकारने गेल्या वर्षी सोडला आहे. चालू दशकाअखेरीपर्यंत हा संकल्प सिद्धिप्रत नेण्याचा केंद्र सरकारचा निर्धार आहे. देशातील काही न्यायालयांतील खटले ५० वर्षांहूनही अधिक काळापासून प्रलंबित आहेत. याचा अर्थ, न्यायाच्या प्रतीक्षेत एका पिढीचे डोळे शिणले असून, त्यांना आता न्याय मिळाला तरी त्याचे समाधान किती मिळेल, हा प्रश्न आहे. देशातील सारे प्रलंबित खटले निकाली काढण्यासाठी, त्यांचा निपटारा करण्यासाठी न्यायालयांना पुढची काही दशके अहोरात्र काम करावे लागेल, असे सांगितले जाते. आज न्यायाची प्रतीक्षा करणाऱ्या पिढीने प्रतीक्षेचे ओझे पुढच्या पिढीच्या खांद्यावर सोपवावे, अशीच ही स्थिती आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्याच स्थितीचे नेमके वर्णन करून सामान्य माणसाच्या भावनांना आवाज दिला आहे.

## आंतरराष्ट्रीय

# मोदी आणि झेलेन्स्की यांची ऐतिहासिक भेट

**वसंत गणेश काणे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २३ ऑगस्ट २०२४ ला युक्रेनचे राष्ट्रपती व्लादिमिर झेलेन्स्की यांच्याशी 'मारिन्स्की पॅलेस' या त्यांच्या निवासस्थानी मनमोकळी चर्चा केल्याचे वृत्त आहे. ही भेट म्हणजे दुसरे-तिसरे काहीही नसून संतुलन साधण्याची कृती आहे, असे मानणारा एक गट आहे. रशियाला जाऊन आल्यानंतर युक्रेनला गेलात तर संतुलन साधले जाईल, अशी ही भूमिका आहे. युक्रेन व रशिया यात युद्ध सुरू असताना मोदी रशियाला गेले होते. मोदींच्या रशिया दौऱ्यावर पाश्चात्त्य देशांनी नाराजी व्यक्त करत भारतावर एकतर्फी भूमिका घेतल्याचा आरोप केला होता; त्यावरचा उतारा ही भेट आहे, असे मानणारे अनेक आहेत.

भारत आणि युक्रेनदरम्यान द्विपक्षीय संवाद आवश्यक झाला होता. युद्ध सुरू असतानाही भारत आणि युक्रेनमधील व्यापारी संबंधांमध्ये विशिष्ट वस्तूंवरील बंधने स्वीकारून केलेल्या व्यापारात वाढ झाली आहे. याशिवाय भारत युक्रेनला युद्धानंतर कशी मदत करू शकतो, यावर चर्चा करण्याची इच्छा उभयपक्षी नक्कीच निर्माण झाली असावी. जसे की भारत युक्रेनला औषधे, रुग्णसुविधा, अन्य पायाभूत सुविधा व सुधारणा याबाबत कशी मदत करू शकतो, हा मुद्दा महत्त्वाचाच होता. आता युक्रेनसोबतचे व्यापारी व्यवहार जोरात सुरू राहतील. मोदींनी झेलेन्स्की यांच्या पाठीवर ठेवलेला हात हेच तर सूचित करीत नसेल ना? अमेरिकेच्या दबावाखाली मोदी युक्रेनला गेले, असे काहींना वाटते तर रशियालाही मोदींनी युक्रेनला जावे व झेलेन्स्कींच्या मनाचा अंदाज घ्यावा, असे वाटत असावे, असा काहींचा कयास आहे. कारण आता युक्रेनच्या फौजा रशियात घुसून मारताहेत. गोंधळलेल्या आणि चडफडणाऱ्या पुतिन यांना मोदींची युक्रेन भेट उपयोगाची आहे, असे तर वाटले नसेल ना? असे अनेक अंदाज आहेत.

मोदी रेल्वेने सात तासांच्या प्रवासासाठी पोलंडमधून युक्रेनच्या राजधानीकडे कीवकडे भल्या पहाटेच निघाले होते. यावेळीही विमान हल्ल्यांच्या सूचना देणारे भोंगे वाजतच होते; त्याचवेळी कीवमध्ये मोदींना घ्यायला आलेल्यांची लगबगही सुरू होती. हा दिवस युक्रेनचा 'नॅशनल फ्लॅग डे' होता. दुसऱ्या दिवशी युक्रेनचा 'स्वातंत्र्य दिन' होता. हा मुहूर्त साधून युक्रेनच्या मोठ्या शहरांवरही याच काळात रशिया क्षेपणास्त्रांचा मारा करीत होता.

भारतीयांबाबतचा एक कुतूहलाचा भाव युक्रेनमध्ये आहे. भारताच्या पंतप्रधानांची युक्रेनला ही पहिलीच भेट होती. यामुळेही युक्रेनमध्ये संमिश्र स्वरूपाचे वातावरण होते, असे म्हटले जाते. सध्या सुरू असलेल्या युद्धासंबंधात भारताची नक्की भूमिका कोणती आहे, हे युक्रेनला जाणून घेण्याची इच्छा तर नक्कीच आहे. रशिया आणि भारत यांची मॉस्कोमध्ये गळाभेट होत असतानाच्या प्रसंगी कीवमधील मुलांच्या हॉस्पिटलवर क्षेपणास्त्रांचा हल्ला सुरू होता. हे पाहून झेलेन्स्की यांच्या मनाचा प्रचंड क्षोभ झाला असला पाहिजे.

आज एकीकडे अमेरिका आणि नाटो तर दुसरीकडे रशिया, चीन, उत्तर कोरिया आणि इराण अशी स्थिती आहे. युरोपातील अनेक राष्ट्रांचा युक्रेनला पाठिंबा आहे, हे नक्की; त्याची कारणे मात्र वेगवेगळी आहेत. हंगेरीचे व्हिक्टर ओरबान यांचा पाठिंबा नाईलाजापोटी आहे. युक्रेनला पाठिंबा न द्यावा तर रशिया खूश होईल; पण युरोपातली इतर राष्ट्रे नाराज होणार. जर्मनीचा युक्रेनला मनापासून पाठिंबा आहे; पण जर्मनीचे रशियाशी जे व्यापारी संबंध आहेत, त्याचे काय? तेलवाहिन्यांचे जाळेच आहे की! तेही जपायला हवे ना? बाल्टिक राष्ट्रे युक्रेनला मनापासून पाठिंबा देत आहेत. या मागचे कारण काय, तर रशिया आणि बाल्टिक राष्ट्रे यांच्या मधोमध असलेले युक्रेन आज रशियाचे आघात सहन करते आहे. युक्रेनला भारताची तटस्थता समजत नाही, पण भारत तटस्थ आहे. कारण त्याच्या पाठीमागे तशीच मोठी कारणे असली पाहिजेत, असे मानणारे युक्रेनमध्ये आहेत. दुसरी शक्यताही ते गृहीत धरतात. ती ही की, युक्रेनचा सध्या सुरू असलेला लढा भारताला अमान्य आहे. रशिया-युक्रेन संघर्षात भारताने कधीही त्रयस्थ भूमिका घेतली नाही. उलट आमचा तिसरा शांततेचा पक्ष आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर झेलेन्स्की यांना आश्वस्त केल्याचे वृत्त आहे. युद्धाऐवजी राजकीय चर्चाच अधिक फलदायी ठरेल, मुत्सद्दीपणा आणि संवाद हाच संघर्ष सोडवण्याचा एकमेव मार्ग आहे, असे भारताचे मत असल्याचे मोदींनी चर्चेत स्पष्ट केले आहे.

सामान्यतः युद्धजन्य परिस्थितीत काही ना काही सबब काढून राजकीय नेते आजवर भेटी देण्याचे टाळत आले आहेत. याउलट कृषी, अन्न उद्योग, औषध, संस्कृती आणि मानवतावादी सहाय्य या क्षेत्रात सहकार्य करण्यासाठी या देशांनी करार केला. सोबतच भारताने युक्रेनला ऑक्सिजन तयार करण्याची क्षमता असलेले तसेच प्रत्येकी सुमारे २०० वैद्यकीय प्रकरणे हाताळू शकतील, असे भीष्म क्यूब्स, म्हणजे जणू अत्याधुनिक मोबाईल रुग्णालयेच भेट म्हणून दिली. युक्रेनमधील विचारवंत भारत आणि युक्रेन यात पुरेसा संवादच झाला नाही/नसावा, असे मानतात. केवळ युक्रेनच नव्हे तर पूर्व युरोप आणि दक्षिण आशियातील राष्ट्रेही एकमेकांसाठी अगदी नवखी आहेत. आम्ही भारताला आजही केवळ अध्यात्म आणि योग याचे धनी मानतो. आयटी क्षेत्रातील भारताची भरारी आम्हाला नुकतीच कुठे जाणवू लागली आहे. पण २०१४ नंतर रशिया आणि युक्रेन या भूराजकीय क्षेत्रात जे घडले त्याची भारताला जाणीव आहे का? क्रिमियासारख्या आमच्या एका प्रांताचा लचकाच रशियाने तोडला आहे. अहो, आम्ही आपल्या स्वातंत्र्यासाठी लढतो आहोत. तुम्ही नाही का आपल्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटिश वसाहतवादांशी लढलात, अगदी तसेच, ही आहे युक्रेनची भूमिका. दोन्ही नेत्यांनी प्रादेशिक अखंडता आणि राज्यांच्या सार्वभौमत्वाचे रक्षण, याबाबतच्या आंतरराष्ट्रीय कायद्याच्या तत्त्वांचे पालन करण्यावर भर दिला. म्हणजे शांतता स्थापनाचा विषय एकाच्या मध्यस्थीकडून समान भूमिका असलेल्या मध्यस्थांच्या फळीच्या मध्यस्थीकडे जाताना दिसतो आहे. रशिया वेगळा, सोव्हिएत युनियन वेगळे. एकेकाळी युक्रेनही सोव्हिएत युनियनचा हिस्सा होते. अशा प्रांतांचे संघटन म्हणजे सोव्हिएत युनियन. ते आता राहिलेले नाही. सोव्हिएत युनियन आणि भारत यात तांत्रिक आणि संरक्षणविषयक सहकार्य फार जुन्या काळापासून अस्तित्वात आहे. प्रत्यक्षात सर्व व्यवहार सोव्हिएत युनियनच्या नावे पण युक्रेनमधूनच व्हायचा. आज मात्र युक्रेनचा दक्षिण आशियातील देशांशी संबंध राहिलेला नाही. कारण सर्व व्यवहारांवर रशियाने लबाडीने आपला अधिकार प्रस्थापित केला आहे, ही युक्रेनची खदखद आहे. युक्रेनियन विचारविश्वातील ही वैचारिक खदखद समजून घेण्याइतपत भारतीय मनोविश्व निश्चितच समृद्ध आहे. दुसरे असे की, युद्ध थांबवा, न थांबाल तर हाती विध्वंसाशिवाय काहीही लागणार नाही, हे ठासून सांगणारा आणि युक्रेन आणि रशिया हे दोघेही ज्याला सारखाच विश्वसनीय मानतात, असा मोदी वगळता दुसरा कुणी आहे का?

९४२२८०४४३०

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# वाढवण प्रकल्प राज्यासाठी वरदान

पूर्वी भारत अतिशय समृद्ध होता. सोन्याचा धूर भारतातून निघत असल्याच्या अनेक कथा ऐकिवात असतीलही. या सुवर्ण युगाची पुन्हा पायाभरणी व्हावी यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रयत्नशील असून, वाढवण बंदराची निर्मिती हे त्याचे एक ज्वलंत उदाहरण आहे. भारताच्या तीन सीमांवर समुद्र किनारा असून, भारतासाठी ही फार मोठी उपलब्धी आहे. या समुद्र किनाऱ्याची लांबी जवळपास ५४२२ किमी. असून त्यापैकी पश्चिम किनारपट्टीचा ७२० किमी.चा किनारा महाराष्ट्राला लाभला आहे. त्यामुळे भारताचा ६५ टक्के आंतरराष्ट्रीय व्यापार समुद्रमार्गे होतो, हे विशेष. या बंदरासाठी ९ बिलियन डॉलर्स म्हणजे ७२,२२० कोटी रुपयांची गुंतवणूक जेएनपीटी आणि महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड संयुक्तपणे करणार आहे. हे बंदर किनाऱ्यापासून खोल समुद्रामध्ये जवळपास १२ किमी. अंतरावर बांधले जाणार आहे. अद्ययावत बंदराची निर्मिती आणि त्यांना जोडणारे दळणवळणाचे मार्ग जेवढे अधिक चांगले तेवढा व्यापार वाढण्यास अधिक हातभार लागतो. त्यामुळे भारताची अर्थव्यवस्था बळकट होण्यास अनेक मार्ग प्रशस्त होतात. परिणामी भारतीय जनमानसाचे जीवनमान उंचावते हा भाग वेगळा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेमकी हीच बाब हेरून रस्ते व रेल्वेचे आधुनिकीकरण व सागरमाला प्रकल्पांतर्गत बंदरे विकसित करून आंतरराष्ट्रीय व्यापार कसा सुदृढ व फायदेशीर होईल, हे बघितले आहे. वाढवण बंदराच्या निर्मितीमागे हाच एक प्रमुख उद्देश असून, हा प्रकल्प मध्यपूर्व आणि युरोपमधील देशांना जोडणाऱ्या मोठ्या प्रकल्पाचा महत्त्वाचा भाग ठरणार आहे. पालघर जिल्हा आणि विशेषकरून डहाणू तालुक्यातील अर्थव्यवस्था किनारपट्टीवरची गावे सोडता कृषी आधारित आहेत. तरुणवर्ग काही प्रमाणात नोकरीकडे वळला आहे. परंतु, या बंदराच्या निर्मितीनंतर पुढील १० वर्षांनंतर या भागाचा कायापालट होणार असून, या भागामध्ये अनेक कंपन्या येणार असल्याने तरुणांना आपल्याच परिसरामध्ये नोकरीची व्यवस्था होणार आहे. भविष्यामध्ये येणाऱ्या रोजगाराच्या नवीन संधी पालघर जिल्ह्यासाठीच नव्हे, तर मराठी तरुणांना एक नवा आयाम उपलब्ध करून देणारा ठरणार आहे. अशा प्रकारच्या विकासाचे उत्तम उदाहरण म्हणजे गुजरातमधील कांडला बंदर होय. तेथील जनतेने सरकारद्वारे विकास कसा साधला, हे महाराष्ट्रामधील मराठी तरुणांनी शिकले पाहिजे. विकासाची ही दृष्टी आत्मसात केली तर विकासाला अधिकाधिक चालना मिळू शकते. भारताचे प्रमुख औद्योगिक केंद्र हे बंदर राहणार असून, जगामधील १० सर्वश्रेष्ठ बंदरांपैकी एक असणार आहे. १२ लाख नोकऱ्या निर्माण करणाऱ्या या प्रकल्पाला महाविकास आघाडी काही लोकांना हाताशी धरून विरोध करीत असल्याचे दिसून येत आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार, या बंदरामुळे निसर्गाला कोणतीही हानी पोहोचणार नसून, ज्या स्थानिक तरुणांना आपला पिढीजात मासेमारीचा व्यवसाय करायचा नसेल त्यांना हजारो नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत. या बंदरामुळे वाढवण परिसरातील शेती, मासेमारी व आदी व्यवसाय बंद पडतील, अशा खोट्या व भ्रामक वावड्या उठविण्याचे काम काही लोकांनी सुरू केले आहे. नरेंद्र मोदी यांनी विकासात्मक प्रकल्प हाती घेतला की, भारतविरोधी शक्ती सदैव सक्रिय होते, हा आजवरचा अनुभव आहे. महाराष्ट्रामध्ये अनेक कामांमध्ये त्यांनी अडथळे आणले. राजकीय क्षेत्रामध्ये विचारांचा विरोध लोकशाहीसाठी पोषक खाद्य समजले जाते. परंतु, देशाच्या विकासात्मक धोरणांना विरोध करणे ही संस्कृती अलिकडे नव्याने उदयास आल्याने हा एक गंभीर धोका भारतापुढे निर्माण झाला आहे. नरेंद्र मोदी जे जे करतील ते सर्व चुकीचे असा भ्रामक व खोटा प्रचार विरोधकांनी रचल्याचे दिसून येत आहे. आम्ही देशाच्या भविष्याशी खेळत आहोत, हे साधे भानही विरोधकांना राहू नये, हे देशाचे दुर्दैव आहे. सामान्य जनतेने विरोधकांचा डाव वेळीच ओळखला नाही, तर भविष्यात देशाची मोठी हानी होईल, हे सामान्य जनतेनेही ओळखायला हवे.



९८८१७१७८५६

## इतस्ततः

# उद्योग-व्यवसायातील कौटुंबिक व्यवस्थापन

**दत्तात्रेय आंबुलकर**

कुटुंबाद्वारे व कौटुंबिक स्तरावर चालविण्यात येणारे उद्योग-व्यवसाय हे भारतीय उद्योग आणि अर्थव्यवस्थेचे मुख्य व प्रमुख वैशिष्ट्य. देशांतर्गत विविध कुटुंबांद्वारे परंपरागत स्वरूपात व पिढ्यान्पिढ्या आपापल्या उद्योगांचे संचालन-व्यवस्थापन केले जाते व त्यापैकी अधिकांश उद्योग यशस्वीपणे चालविले जातात. बदलते औद्योगिक वातावरण व व्यवस्थापन कार्यपद्धतीच्या पृष्ठभूमीवर कौटुंबिक उद्योगांच्या व्यवस्थापनातील नव्या पिढीचे स्थान आणि त्यांचे कार्यकर्तृत्व यांचा पडताळा घेणे म्हणूनच उपयुक्त ठरते. कौटुंबिक स्तरावर उद्योग-व्यवसायांच्या संदर्भात प्रामुख्याने असे सांगितले जाते की, या क्षेत्राची सर्वात मोठी व जमेची बाजू म्हणजे, त्यांच्या कुटुंबात उपलब्ध असलेली व प्रशिक्षित अशी नवी पिढी; याच नव्या पिढीतून या व्यवसायाची व्यवस्थापक आणि व्यवस्थापनाची पिढी सातत्याने तयार होत आली आहे. म्हणूनच जागतिक स्तरावर भारतातील या कुटुंबांतर्गत असणाऱ्या व्यवस्थापनाची नोंद घेण्यात आली आहे. कुटुंब स्तरावर असणाऱ्या या विशेष व्यवस्थापन पद्धतीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, कुटुंबातील युवा व नव्या पिढीला आपला व्यवसाय व व्यवस्थापनाचे धडे घरच्या घरी व ज्येष्ठांचा सल्ला-मार्गदर्शनासह मिळत असतात. त्याचसोबत त्यांना व्यवसाय प्रक्रिया, कार्यपद्धती, निर्णयपद्धती, आर्थिक व्यवहार, धोरणात्मक पद्धती इ.चे मूलभूत धडे विद्यार्थिदशेतच गिरविता येतात. याचा फायदा कौटुंबिक व्यवस्थापन पद्धतीत नवी पिढी व नवा व्यवसाय घडविण्यामध्ये होत असतो. कुटुंब स्तरावर घरातील पुढच्या पिढीकडे उद्योग-व्यवसायाची सूत्रे सोपविताना काही बाबतीत अधिक काळजीपूर्वक विचार करणे आवश्यक असते. या विचारपूर्वक व नियोजनपूर्ण आखणीतूनच नव्या पिढीतील व नव्या स्वरूपाचे व्यवस्थापक-व्यवस्थापन या उद्योगांना लाभत असते. यासंदर्भात पुढील मुद्दे अधिक विचारणीय ठरतात.

**उद्योग-व्यवसायाला कुटुंबातील व्यवस्थापकांची कितपत आवश्यकता आहे?** : बदलता काळ आणि परिस्थितिनुरूप व्यावसायिक बदल होत असतात. त्याचवेळी घरच्या व्यावसायिक पृष्ठभूमीसह नवी पिढी तयार होत असते. व्यवसाय आणि व्यक्ती यांच्यामध्ये असणारे नवेपण व बदल हे परस्परपूरक कसे होऊ शकतील व त्याचा परस्परांना कसा फायदा होऊ शकेल, हे पाहणे महत्त्वाचे ठरते. याच संदर्भातला दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे संबंधित उद्योग-व्यवसायाच्या प्रचलित गरजांनुसार व्यवसाय आणि व्यक्ती यांची यथोचित सांगड कशी घालता येईल? प्रस्थापित उद्योग-व्यवस्थापन व काळानुरूप त्यांच्या असणाऱ्या गरजांची पूर्तता कौटुंबिक स्तरावरील व्यवस्थापकांद्वारे करणे फायद्याचे व जोखमीचे ठरते. याचे नेमके भान ठेवून योग्य ती पावले वेळेत उचलण्यावरच कौटुंबिक व्यवस्थापन पद्धतीचे यश खऱ्या अर्थाने अवलंबून असते.

**कुटुंबातील नव्या पिढीची प्रवेश प्रक्रिया** : घरच्या वा कुटुंबातील उद्योग-व्यवसायात नव्या पिढीला सामावून घेणे वा त्यांना औपचारिकरीत्या नवी जबाबदारी सोपविणे यासाठी विशेष पद्धत नसली तरी त्यासाठी आवश्यक अशा प्रक्रियेचे पालन करणे आवश्यक असते. त्यामुळे व्यवसायामध्ये घरच्या नव्या पिढीला सहभागी करताना कुटुंबातील अशा सदस्याची व्यवसायाशी संबंधित आवड-निवड पाहणे महत्त्वाचे ठरते. व्यवसायाच्या प्रचलित वा वाढत्या गरजा आणि त्यानुरूप कुटुंबातील नव्या सदस्याची योग्यता आणि कल यांचा मेळ घालणे यावरच अशा घरगुती स्वरूपाच्या नव्या प्रयत्नांचे यश अवलंबून असते.

**कुटुंबातील सदस्याचा व्यवसाय प्रवेश आणि प्रक्रिया** : उद्योग-व्यवसायाच्या पद्धती आणि कार्यपद्धतीच्या साच्यामध्ये कुटुंबातल्या नव्या व युवा घटकाला सामावून घेण्यासाठी विशिष्ट पद्धतीचा अवलंब करणे फायद्याचे ठरते. ही पद्धत निर्धारित स्वरूपात नसली, तरी ठरावीक स्वरूपात असणे फायद्याचे ठरते. काही व्यावसायिक वा उद्योजक कुटुंबांमध्ये आपल्या उद्योग-व्यवसायाची सूत्रे नव्या पिढीकडे सोपविण्यासाठी ठरवून व योजनापूर्वक प्रयत्न केले जातात. ही प्रक्रिया प्रसंगी वर्ष-दोन वर्षांपर्यंतसुद्धा चालते. यामध्ये कुटुंबांतर्गत जुन्यांचा अनुभव व नव्यांची माहिती आणि ज्ञान यांची नेमकी देवाणघेवाण होते व त्याचा फायदा कौटुंबिक उद्योगांना नव्या पिढीच्या माध्यमातून नवे व्यवस्थापन मिळण्याच्या दृष्टीने होतो.

**कौटुंबिक व्यवसायाला पूरक मानसिकता** : नव्याने उद्योग-व्यवसायाची सुरुवात करताना शिक्षण व ज्ञान-तंत्रज्ञानाची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे कुटुंबांतर्गत उद्योग-व्यवसायाचे व्यवस्थापन-संचालन करण्यासाठी ज्ञान-तंत्रज्ञान व व्यवस्थापनाच्या जोडीलाच आवश्यकता असते; ती विशिष्ट व्यवस्थापकीय मानसिकतेची. या मूलभूत व महत्त्वाच्या बाबी नव्याने कुटुंबाचा उद्योग सांभाळणाऱ्यांकडे असल्या तर त्याचा त्यांना आपल्या उद्योजक-व्यवस्थापक म्हणून कारकीर्द सुरू करतानाच नव्हे, तर पुढील कामकाज आणि कारकीर्दीसाठी अवश्य होत जातो. कुटुंबातील नव्याने सामील झालेल्या सदस्याकडे उद्योग-व्यवसायाशी निगडित व संबंधित मानसिकतेमध्ये मुख्यतः उद्योग प्रक्रियेविषयक मूलभूत ज्ञान, शैक्षणिक पात्रतेला व्यवसाय-व्यवहारविषयक प्रत्यक्ष सराव, स्वतःचे प्रयत्न, प्रयोगशीलता, निर्णयक्षमता, संवादकुशलता, नेतृत्वशैली, नवे शिकण्याची जिद्द, सकारात्मकता, परस्परसंबंध, समूह व्यवस्थापन, संवेदनशीलता यांसारख्या मुद्यांचा प्रामुख्याने समावेश करता येईल.

**वाट आणि वाटचाल** : कुटुंबातील उद्योग-व्यवसायाची वाट सहज भासत असली, तरी ती सहजसुलभ असतेच असे नाही. घरच्या उद्योग-व्यवसायाला सद्यःस्थिती वा सद्यःस्वरूप देण्यासाठी आधीच्या पिढी वा पिढ्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम आणि प्रयत्न कारणीभूत असतात, हे विसरून चालणार नाही. त्यामुळे कौटुंबिक उद्योगातील प्रस्थापित व्यवस्थापनाने कुटुंबातील नव्या सदस्याला वाट दाखविणे व नवागतांनी त्यानुसार वाटचाल करणे, असा प्रयत्नशील योग ज्या ठिकाणी घडून येतो, ते कौटुंबिक उद्योग वा उद्योजक दोन्ही आपापल्यापरीने यशस्वी होतात, हे मात्र खरे!

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### पुन्हा आजीच्या बोधकथा...

जसे छोट्या-मोठ्या दुखण्यावर आजीचा बटवा रामबाण उपाय करायचा, तशाच आजीच्या बोधकथा जीवन जगण्याची कला शिकवायच्या. आज मुलांना काल्पनिक परी कथा किंवा कार्टून्स माहीत आहेत. त्यातही हिंसक रूपातील कार्टून्स मुलांचे अधिक जवळचे होत चालले आहेत. कळत-नकळत त्याचा परिणाम बालमनावर होऊन हळूहळू वृत्ती तशी होऊ लागते. पूर्वी घरोघरी आजीच्या बोधकथा ऐकत मुले झोपी जात असे. त्यातून मुले जीवन जगण्याची कला, कठीण प्रसंगांना तोंड देण्याची युक्ती, इतरांना मदत करणे अशा अनेक छोट्या छोट्या गोष्टी शिकत. त्या गोष्टीत वाघासारख्या बलाढ्य आणि हिंस्त्र पशूपासून आजी भोपळ्यात बसून युक्तीने स्वतःची कशी सुटका करते. पुढे जरीही लबाड लांडगे कोल्हे यांनी पकडले तरीही तिखट-मिठाची पूड डोळ्यात फेकून स्वतःचा जीव कसा वाचवते. अशा अनेक गोष्टी जरी मजेदार वाटत असल्या, तरीही त्यात तथ्य होते. दुर्दैवाने आयुष्यात असे कठीण प्रसंग आलेच तर आपण पूर्वतयारीत असायला हवे, कधी कधी शक्तीपेक्षा युक्ती कशी वापरायची, हे आजीच्या बोधकथेतून मुले शिकत असे. त्यांच्यात क्षात्रतेज जागृत राहात असे. आज पुन्हा या बोधकथा मुलांना सांगण्याची आवश्यकता आहे. सोबतच काल्पनिक कार्टून्स आणि परीकथांचे वास्तव मुलांना सांगून त्या काल्पनिक विश्वातून वास्तविक जगाची ओळख करून द्यायला हवी. सोबतच आजीसारखी देवभक्तीची गोडी मुलांमध्ये निर्माण करायला हवी. तेव्हाच मुले आजच्या कठीण परिस्थितीला तोंड देऊ शकतील.

**केतकी हरदास**/नागपूर

●● ●●

### विचार पर्यावरण रक्षणाचा!

या पृथ्वीवर आज आपण मोठ्या आनंदाने राहात आहोत. चैतन्य, समृद्धी, सौंदर्य, सुंदरता इतकेच नव्हे तर स्वर्गसुखच या पृथ्वीवर अवतरले. माणसाचे जीवन पिढ्यान्‌पिढ्या उमलू लागले. वस्त्या फुलू लागल्या, विकासाचे चक्र गतीने फिरू लागले. पुढे पुढे ही गती अधिकच वाढली, अनियंत्रित झाली. त्यातून पर्यावरणाच्या समस्याचा डोंगर उभा राहिला. या पर्यावरणाच्या समस्यांकडे डोळेझाक केल्यास त्या अधिकच तीव्र बनण्याची शक्यता नाकारता येत नाही. पर्यावरण समस्या आणि त्यातून उद्भवणाऱ्या भीतिदायक भविष्यात धोक्याची सूचना आहे; पण माणसाच्या स्वार्थात पर्यावरणाची आहुती तर पडणार नाही ना? परिस्थिती नुसतीच कठीण आहे की भयावह आहे? साडेचार अब्ज वर्षांचा इतिहास असलेल्या या वसुंधरेचा माणसाच्या फक्त १००-१५० वर्षांतील उद्योगामुळे नाश तर होत नाही ना? पर्यावरणाची सर्वत्र हानी होत असलेल्या या समस्येवर खरंच काहीच उपाय नाही का? सगळीकडे आशेचा दीप मंदावत असताना जगाच्या काही कोपऱ्यात मात्र काही मिणमिणते दिवे हा अंधकार निकराच्या प्रयत्नाने दूर करत आहेत. पर्यावरण रक्षणाचे व्रत घेतलेले आणि त्याचा ध्यास असलेले मोजकेच लोक आपापल्या परीने या कार्यात खारीचा वाटा उचलत आहेत. जगाने वेडे ठरवलेले असे काही जण आजूबाजूसही असतात. काही आपल्या दैनंदिन जीवनात फक्त पाठकोरे कागदच वापरतात तर काही प्लॅस्टिकचा वापर कटाक्षाने टाळतात. गाडी घ्यायची ऐपत असूनही काही जण आयुष्यभर सायकलच वापरतात. आपल्याला वेड्यासारखे भासणारे हे लोक त्यांचा मार्ग अत्यंत शहाणपणाने स्वीकारतात. वैयक्तिक स्तरावरील ते प्रयत्न कधीतरी सांघिक स्वरूप घेतात. मेघा पाटकरांचे 'नर्मदा बचाव आंदोलन' एकत्रित ग्रामीण विकासाच्या कल्पनेवर आधारित अण्णा हजारे यांची 'आदर्श गाव योजना', धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात बारीपाडा या गावात चैत्राम पवार या आदिवासी युवकाने जंगल रक्षणासाठी चालवलेली मोहीम आदी सारे आपापल्या परीने झटत आहेत. या सर्व आंदोलनांना मिळालेल्या यशापयशापेक्षा पर्यावरणाचा विषय ऐरणीवर येऊन लोकजागृती केल्याने त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. पर्यावरणाचा आवाका पाहता हे प्रयत्न भलेही तुटपुंजे वाटतील; पण या छोट्या प्रयत्नांनी पर्यावरण संरक्षणाचे मोठे कार्य केले आहे. पर्यावरण समस्या या अंधकाराच्या विशाल पटलावर आशेचे मंद दिवे मोठ्या धैर्याने, नेटाने प्रकाश देत आहेत, मार्ग दाखवत आहेत. जेव्हा अशा प्रयत्नांचे हजारो, लाखो, करोडो दीप उजळतील, तेव्हा पर्यावरण समस्या ही 'समस्या' राहणारच नाही. अर्थात त्याची सुरुवात डोळसपणे व्हायला नको का? म्हणूनच पर्यावरणाचा अभ्यास करून सर्व बांधवांनी उद्याच्या अंधकारातील मिणमिणते दीपक व्हावे, हीच मनीषा!

**विजय वाघ**/९१६८९१४९६६

●● ●●

### गरज रामराज्याचीच!

वर्तमानपत्र उघडावे तर स्त्रियांवर अत्याचाराच्याच बातम्या जास्त दिसतात. स्त्रीला देवीचं रूप मानणाऱ्या या देशातील आजचे चित्र बघितले तर मन विषण्ण होते. हा देश भगवंताने निर्माण केलेला आहे. रामाचा अवतार हा रावणाला मारण्यासाठीच झाला तसेच कृष्णाचाही जन्म कंस नामक दृष्टाला मारण्यासाठीच झाला. म्हणजे भगवंताने दृष्टांना, दृष्ट प्रवृत्तीचा नायनाट करण्यासाठीच भारतात जन्म घेतला. भारत ही जगन्माता आहे. आजची ही वाढलेली अराजकता बघितली की वाटते खरी रामराज्याची गरज आज आहे.

**मधकर अमत डबीर**/९८२२६१५३३१

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन नुकसान भरपाई द्या : डॉ. प्रतापसिंह पाटील

**धाराशिव, दि.३ सप्टेंबर -**



धाराशिव जिल्ह्यात ३० ऑगस्ट पासुन अतिवृष्टी व सततचा पाऊस झाल्याने जिल्ह्यात खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तात्काळ पंचनामे करुन धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खरीप पिकांच्या नुकसानीची भरपाई मिळावी अशी म ागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस डॉ.प्रतापसिंह पाटील यांनी मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस,ना. अजित पवार मदत व पुनर्वसन मंत्री ना.अनिल पाटील यांच्याकडे केली आहे. पावसाने वार्षिक सरासरी ओलांडली असून मागील तीन दिवसात एकूण सलग ३८ तास पाऊस पडल्यामुळे जिल्ह्यातील खरीप पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. तरी तात्काळ पंचनामे करुन धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खरीप पिकांच्या नुकसानीची भरपाई करावी असेही या निवेदनात पुढे म्हटले आहे.

### समर्थ, श्री गणेश कृषी विज्ञानतर्फे सत्कार

**जळकोट, दि.३ सप्टेंबर -**

जळकोट येथील प्रयाग मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी शाखेला फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड या शिखर संस्थेचा सन २०२२-२३ या वर्षाचा १ ते २५ कोटी ठेवी गटामध्ये सर्वोत्कृष्ट संस्थेचा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर समर्थ क्लासेस व श्री गणेश कृषि विज्ञान मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रयाग मल्टीस्टेटचे चेअरमन ॲड. सचिन कदम यांचा सत्कार करुन शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी समर्थ क्लासेसचे संचालक रामशेट्टी पाटील, कॉम्प्युटरचे संचालक लक्ष्मीकांत पाटील, सोसायटीचे मॅनेजर पांडुरंग साखरे, कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# श्री सिध्दीविनायक परिवाराचा रोलर पूजनाचा कार्यक्रम उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ सप्टेंबर -**

श्री सिध्दीविनायक परिवातील खाम सवाडी येथील श्री सिध्दीविनायक ग्रीनटेक युनिट क्रमांक २ गुळ कारखान्याच्या गळीत हंगाम २०२४-२५ रोलर पूजनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

श्री सिध्दीविनायक परिवाराचे संस्थापक अध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांनी रविवार दि.१ रोजी सपत्नीक लक्ष्म ीपूजन करून रोलर पूजन केले. यावेळी कुटुंबासह खामसवाडी ग्रामस्थ व कळंब तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ३० जून २०२२ रोजी या कारखान्याची मुहूर्तमेढ रोवण्यात आली होती. त्यानंतर मागील वर्षी प्रथम चाचणी घेऊन कारखाना सुरू करण्यात आला होता. यावर्षी पूर्ण क्षमतेने गाळप केले जाणार असून प्रतिदिन दीड हजार मेट्रिक टन उसाचे गाळप करण्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती दत्ता कुलकर्णी यांनी उपस्थितांना दिली. कारखाना परिसरातील लोकांच्या मनात श्री सिध्दीविनायक परिवाराबद्दल विश्वास आहे. तो विश्वास सार्थ ठेवण्याचे काम परिवाराकडून केले जाणार आहे. ऊस खरेदी नंतर अवघ्या १५दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा केले जातात. नेहमी पारदर्शक व्यवहार केला जाईल असा विश्वास देत म ेळी पूजनाच्या कार्यक्रमाला अडीच हजार पेक्षा अधिक शेतकऱ्यांना येथे आमंत्रित करून कारखान्याची कार्यपद्धती समजावून सांगण्यात येणार आहे. यावेळी खाम सवाडीचे सरपंच अमोल पाटील, भाजपा




तालुकाध्यक्ष अजित पिंगळे यांच्यासह विविध मान्यवरांनी सिध्दीविनायक परिवाराबद्दल गौरवोद्गार काढले. मोहेकर उद्योग समूहाचे अध्यक्ष हनुमंत मडके, बालाजी कोरे, खामसवाडी उपसरपंच किरण पाटील, सोसायटी चेअरमन संजय पाटील, दिलीप पाटील, अरुण चौधरी, माणिक बोंदर, सचिन मिनियार, गणेश कामटे, दिनेश कुलकर्णी, राजकुमार जाधव, अरविंद गोरे तसेच विभाग प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. नितीन भोसले यांनी केले.

## नवोदय विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

**धाराशिव, दि.३ सप्टेंबर -**

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय तुळजापूर येथे हॉकीचे जादूगार म्हणून ओळखले जाणारे मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिन आज गुरुवार दि.२९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम विद्यालयाचे प्राचार्य श्री के. वाय.इंगळे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावरती वरिष्ठ अध्यापक एस.डी.खोब्रागडे, टी.ए.काळे, एच.जी.जाधव यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. यानंतर अरहंता वाघमारे या विद्यार्थिनीने सर्व विद्यार्थ्यांना खेळाच्या संदर्भात प्रतिज्ञा दिली. रोहन माळी सातवी ब या विद्यार्थ्याने हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या विषयी माहिती सांगितली. इंग्रजी विषयाचे अध्यापक टी.ए.काळे यांनी मेजर ध्यानचंद यांचे बालपण, त्यांचे कुटुंब हॉकी प्रेमी कसे होते, त्यांच्या नेतृत्व गुण व देशप्रेमी कशी होते याविषयी आपले विचार व्यक्त करून विद्यार्थ्यांना दररोज प्रामाणिकपणे व्यायाम करण्याचे आवाहन केले.

## आरोग्य समस्या आढावा बैठक संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३ सप्टेंबर -**

उमरगा लोहारा तालुक्यातील सध्या डेंगू व इतर आजारांचा प्रादुर्भाव वाढल्या कारणाने नागरिकांना विविध आरोग्यविषयक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या अनुषंगाने आमदार ज्ञानराज चौगुले यांनी सोमवार दि.०२ रोजी तहसील कार्यालय उमरगा येथे सर्व संबंधित अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली.

सदर बैठकीत प्रशासनातील जिल्हा हिवताप संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकमेकांना सहकार्य करून प्रसंगाचे गांभीर्य ओळखून योग्य त्या तातडीच्या उपाययोजना आखणे बाबत सूचना केल्या. यात शहरी व ग्रामीण भागातील सर्व डबक्यातील पाण्याला मोकळी वाट करून देणे व सर्व भागातील स्वच्छता करून घेणे

डास निर्मूलनासाठीचे फवारणी युद्ध पातळीवर करून घेणे याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या. तसेच प्रत्येक नागरिकांनी त्यांच्या घर व परिसरात डासांची उत्पत्ती होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी बाबत, हँडबिल व ध्वनी प्रेक्षकाद्वारे जनजागृती करणे बाबतही सूचना देण्यात आल्या.

शहरी व ग्रामीण भागातील मोकळ्या प्लॉट धारकांनी त्यांची जागेची स्वच्छता स्वतः ठेवणे बाबत सर्व संबंधित प्लॉट धारकांना नोटीस बजावणेबाबतही कळवण्यात आले.

या पुढील ग्रामीण व शहरी भागात आरोग्यविषयक तपासण्या वेगाने करणे बाबत आरोग्य अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या

या बैठकीत युवा सेना विभागीय निरीक्षक किरण गायकवाड, उपविभागीय अधिकारी गणेश पवार, तहसीलदार गोविंद येरमे, मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर, मुख्याधिकारी सचिन भुजबळ, डॉ.विनोद जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सीमा बडे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.मारुती कोरे, सा.बां. विभागाचे शाखा अभियंता धीरज पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख बळीराम सुरवसे, अरुण जगताप, सुनील माने,पंढरीनाथ कोणे, आप्पासाहेब पाटील आदी उपस्थित होते.

## इंडिया बँकेच्या शाखा व्यवस्थापकाच्या गाडीचा काच अज्ञाताने फोडला

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.३ सप्टेंबर -**



येथील भारतीय स्टेट बँकेचे शाखा व्यवस्थापक यांच्या उभ्या इर्टीका गाडीचा मागचा काच अज्ञाताने दगड मारुन नुकसान केले.

ही घटना पानगाव (ता. कळंब) गावात रविवारी रात्री साडे बाराच्या सुमारास घडली.

याबाबत पोलिसांकडून मि ळालेली माहिती अशी की, येरम ाळा स्टेट बँकेचे शाखा व्यवस्थापक महेंद्र भाऊ भोर वय (वय ४०) राहणार रांजणी ता.अंबेगाव जि.पुणे हल्ली मुक्काम येरमाळा हे पानगाव येथील रोजनिशी कंत्राटी कर्मचारी नंदकुमार पवार यांच्याकडे रविवारी (ता.एक) धार्मिक कार्यक्रमानिमित्त गेले असता पवार यांच्या घरासमोर भोर यांच्या मालकीची इर्टीका कार क्र.एम. एच १४ एक्स ५८६५ लावली असता आज्ञात इसमाने रात्री साडेबारा वाजेच्या सुमारास कारच्या मागच्या काचावर दगड मारुन दहा हजार रुपयांचे नुकसान केले. महेंद्र भाऊ भोर यांच्या फिर्यादीवरुन येरमाळा पोलिसांत घटनेची तक्रार नोंदवण्यात आली असुन पुढील तपास पोहेकॉ डी. जी.राठोड हे करीत आहेत.

## पालकमंत्री तानाजीराव सावंत यांच्या नेतृत्वाखाली दुधी गावच्या ग्रामस्थांचा शिवसेना पक्षात प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३ सप्टेंबर -**

महाराष्ट्राचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री मतदार संघाचे विकासरत्न लाडके आमदार प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांच्या विकास करण्याच्या पद्धतीवर विश्वास ठेवून परंडा तालुक्यातील दुधी गावच्या ग्रामस्थांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे.

विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे पॅनल प्रमुख प्रमोद लिमकर तसेच चेअरमन बाबुराव जाधव, संचालक भीमा जाधव, बालाजी पाटील, धर्मा जाधव, पंडित लिमकर, नाना आसवरे, महानंदा कवटे, महारुद्र लिमकर पाटील, सौदागर लिमकर, सुमीत पाटील, शिवाजी पाटील, अरुण जाधव, आनिल लिमकर, सत्यवान आसवरे, बाबूशा जाधव, उमेश जाधव, पंडित शिंदे, संभाजी जाधव, सचिन जाधव, नारायण मुळीक, आनंद काकडे, दत्ता लिमकर, योगेश जाधव, प्रथमेश गीते, पोपट आसवरे, शामराव जाधव, मसू आसवरे, त्रिंबक लिमकर, दशरथ शिंदे, कृष्णा जाधव, आदेश लिमकर, पांडुरंग कवटे, रेवन लिमकर, अमर लिमकर, दादा शिंदे, सुखदेव पाटील या असंख्य कार्यकर्त्यांचा पालकमंत्री सावंत यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश झाला आहे.

या प्रवेशावेळी धनंजय सावंत, दत्ता साळुंखे, प्रा. गौतम लटके, जयदेव गोफणे, राहुल डोके, सुधीर रोडगे व दुधी येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

## फेडरेशन ऑफ मल्टीस्टेटचा प्रयागला ठेवी गटात पुरस्कार



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.३ सप्टेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील प्रयाग मल्टीस्टेट को-ऑपरेटिव क्रेडिट सोसायटी शाखेला फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी या शिखर संस्थेचा सन - २०२२-२३ सालासाठीचा १ते २५ कोटी ठेवी गटामध्ये सर्वोत्कृष्ट संस्थेचा पुरस्कार जाहीर झाला आहे. ग्राम ीण भागात सहकारातला मिळालेला हा पुरस्कार जळकोट गावच्या विकासात भर टाकणार आहे.

फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट या शिखर संस्थेने नुकतेच एक पत्र पाठवले असून, प्रयाग मल्टीस्टेट को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे चेअरमन ॲड. सचिन कदम यांना पाठवलेल्या पत्रात सर्वोत्कृष्ट संस्था म्हणून निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले आहे. प्रयाग मल्टीस्टेट को-ऑपरेटिव क्रेडिट सोसायटी ही ग्रामीण भागात सहकारात आर्थिक उन्नती बरोबर सामाजिक योगदानही देत आहे. सोसायटी मार्फत आत्तापर्यंत विविध सामाजिक उपक्रम घेण्यात आले आहेत. संस्थेने ठेवी गटात उद्दिष्ट पार केल्याने हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर चेअरमन ॲड. सचिन कदम यांच्याशी संपर्क केला असता, हा पुरस्कार सर्वसामान्य ठेवीदार यांचा आहे. संस्थेवर दाखवलेला विश्वास हाच आमचा खरा पुरस्कार असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या अथक परिश्रमामुळे आम्ही पुरस्काराचे मानकरी ठरलो. असे त्यानी आवर्जून सांगितले. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल जळकोट व परिसरातील नागरिकांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

## दहिफळ गावचा संपर्क तुटल्याने जनजीवन विस्कळीत

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.३ सप्टेंबर -**

रविवारी (ता.१) पहाटे पासुन सुरु झालेल्या पावसाने येरमाळा परिसरातील तेरणानदी क्षेत्रात येणाऱ्या संजितपूर गावाचा रविवार दुपार पासुन संपर्क तुटल्याने ऐन पोळ्याच्या सनावर संकटाचे सावट पसरले आहे. दहिफळ गावचा संपर्क तुटल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. येरमाळा महसूल मंडळात,अतिवृष्टी झाली असुन ८४ मि.मी.पाऊस झाला आहे. राष्ट्रीय महामार्ग ते दहिफळकडे जाणाऱ्या तेरणा नदीवरील पुलावर पाणी आल्याने तर संजितपूर गावाकडे जाणाऱ्या नदीच्या पुलावरही पाणी आल्याने गावाचा संपर्क तुटल्याने आज साजरा केल्या जाणाऱ्या बैलपोळा सणाच्या साहित्याच्या खरेदीसाठी गावाकऱ्यांना बाहेर न पडता आल्याने पोळा सनावर पुराच्या संकटाचे सावट परसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. दरम्यान, संजितपूर गावचा संपर्क तुटल्याची सोमवारी दुपारी भेट देऊन पाहणी केली. संजितपूर गावाचा हा दरवर्षीचाच प्रश्न असुन गावाकऱ्यांची पुलाची उंची वाढवण्याची मागणी असल्याने नाबार्ड योजनेतुन दीड कोटी निधी मि ळावा यासाठी आपण प्रयत्न करु असे आ.कैलास पाटील यांनी ग्रामस्थांना बोलताना सांगितले.

## सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आरक्षण सोडत



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३ सप्टेंबर -**

नगर परिषद नळदुर्ग येथे शहर पथ विक्रेता समिती सार्वत्रिक निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने आरक्षण सोडत कार्यक्रम पार पडला आहे.

शहर पथ विक्रेता समितीमध्ये आठ सदस्य घेणे अपेक्षित असुन त्या आठ सदस्यापैकी दोन जागांसाठी आरक्षण सोडत काढण्यात आली आहे. त्यापैकी अनुसुचित जाती महिला साठी आणि विकलांग व्यक्ती महिला साठी आरक्षित झाले आहे . सदरील आरक्षण सोडतची चिठ्ठी नळदुर्ग येथील डॉ.आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मेडियम स्कुलम धील इयत्ता दुसरी चा विध्यार्थी साद सादीक बागवान याच्या हस्ते काढण्यात आली. शहर पथ विक्रेता निवडणुक-२०२४ ची आरक्षण सोडत निवडणुक निर्णय अधिकारी तथा नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या आरक्षण सोडतीस सहाय्यक म्हणुन सुरज गायकवाड सहायक प्रकल्प अधिकारी न.प.नळदुर्ग यांनी सहाय्य केले.

यावेळी माजी नगर सेवक मुसताक कुरेशी, विनायक अहंकारी पत्रकार विलास येडगे, भगवंत सुरवसे, सादिक बागवान, मन्सूर शेख व इतर पथविक्रेते व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नळदुर्ग शहरात पहिल्यांदाच शहर पथ विक्रेता समितीची सार्वत्रिक निवडणुक होत आहे. या निवडणुकीसाठी ९५ मतदार असुन हे ९५ मतदार ८ सदस्य निवडुन देणार आहेत. शहर पथ विक्रेता समितीची ही पहिली निवडणुक असल्याने ही निवडणुक बिनविरोध व्हावी यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

# धनंजय सावंत यांनी पिक कर्ज व पिक विम्याबाबत केली बँक व्यावस्थापकाशी चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३ सप्टेंबर -**

माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष धनंजय सावंत हे शेतकरी, ग्रामस्थ यांच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी व त्या सोडविण्यासाठी गावभेट दौरे घेत आहेत. या भेटी दरम्यान शेतकरी, ग्रामस्थांच्या वेगवेगळ्या अडचणी सोडविल्या जात आहेत.

या गावभेट दौऱ्यावेळी शेतकऱ्यांनी अनाळा महाराष्ट्र ग्रामीण बँकेतुन पिक कर्ज वाटप होत नसल्याची अडचण व सध्या सोयाबीन व इतर पिकांच्या पिक विम्याचे हप्ते शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होत आहेत त्यातुन पुर्वीच्या कर्जांचे हप्ते कपात करण्यात येत असल्याची अडचण जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांच्या पुढे शेतकऱ्यांनी मांडली.



तोंडावर आलेले सणाचे दिवस लक्षात घेऊन सावंत यांनी शेतकऱ्यांची अडचण सोडवण्यासाठी पुढाकार घेऊन आनाळा बँकेच्या व्यवस्थापाकाची तात्काळ भेट घेतली व पिक कर्ज, पिक विम्यातुन पुर्वीच्या कर्जांचे हप्ते कपात या दोन्ही विषयावर चर्चा केली. पिक विमा हप्त्यातुन पुर्वीचे कर्ज कपात करु नका व पिक कर्ज वितरण सुरू करण्याची मागणी सावंत यांनी व्यवस्थापकाला केली.

यावेळी पिक कर्ज वितरणाची आपली मर्यादा संपली असल्यामुळे मुख्य कार्यलयातुन आदेश आल्याशिवाय आम्ही पिक कर्ज वितरण करु शकत नाही, असे बँक व्यवस्थापकानी सांगताच धनंजय सावंत यांनी पिक कर्जाबाबत लागलीच जिल्हाधिकारी यांच्यासी फोन करून संपर्क साधला तर याविषयी चर्चा केली. त्याच बरोबर हा प्रश्न पालक मंत्री तानाजी सावंत यांच्या पुढे मांडून मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

terna | COLLEGE OF ENGINEERING

AGAINST CAP ADMISSION NOTIFICATION
(First Year M.Tech.2024)

Applications are invited from eligible and aspiring candidates for admission to First Year Master of Technology (M.Tech.) for probable vacant seats if any after CAP rounds administered by DTE, Maharashtra and CET Cell.

Institute Code 02130
Mechanical Engineering Design    Computer Science and Engineering
Electronics &Telecommunication Engineering

Schedule of Admission Activities

| Sr.No. | Activity | Date and Time |
|---|---|---|
| 1 | Inviting applications for Against CAP vacancies if any | 04-09-2024 to 09-09-2024 up to 11 AM |
| 2 | Display of Provisional Merit List | 09-09-2024 at 02 PM |
| 3 | Submission of grievance if any in person at Institute | 09-09-2024 up to 04.00 PM |
|  | Display of Final Merit List and allotment of seats | 09-09-2024 at 05.00 PM |
| 4 | Confirmation of admission in person with fulfillment of all original documents | 09-09-2024 to 10-09-2024 up to 03.00 PM |
| 5 | Cut-off Date for all type of admissions for the Academic Year2024-25. (Online registration, Document Verification and Confirmation, E-Scrutiny for Admission for Against CAP Vacancy ) | 10-09-2024 up to 05.00 PM |

*Subject to change from competent authority and kindly check admission notice board timely for any changes.
Please refer institute website www.coeosmanabad.ac.in for more details and Institute admission board for regular updates.

Contact
8329572199, 9881101877, 9822692469

Dr. V. V. Mane
Ph.D. (Mechanical)
PRINCIPAL

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जम्मू काश्मिर विधानसभा निवडणुकीत खा.रजनीताई पाटील काँग्रेसच्या स्टार प्रचारक

## पाटील परिवाराची गांधी परिवाराशी असलेली एकनिष्ठता पुन्हा सिध्द

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३ सप्टेंबर**

जम्मू-काश्मीर मध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी काँग्रेसनं ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. यामध्ये काँग्रेसच्या पहिल्या फळीतील नेत्यांचा समावेश असून महाराष्ट्रातून एकमेव खासदार रजनीताई अशोकराव पाटील यांचा समावेश आहे. काँग्रेसने रजनीताई पाटील यांची स्टार प्रचारक म्हणुन निवड केल्याने पाटील यांची गांधी घराण्याशी असलेली एकनिष्ठता पुन्हा एकदा सिध्द झाली आहे.



लोकसभा निवडणुकीमध्ये मिळालेल्या घवघवीत यशानंतर काँग्रेसने आता आगामी होऊ घातलेल्या महाराष्ट्र आणि जम्मू काश्मिर निवडणुकांमध्ये लक्ष घातले आहे. सत्ताधारी भाजपविरुध्द काँग्रेसने आता कंबर कसली आहे. कलम ३७० रद्द केल्यानंतर जम्मू काश्मीरमध्ये प्रथमच विधानसभा निवडणूक पार पडणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर काँग्रेसनं ४० दिग्गज नेत्यांना स्टार प्रचारक म्हणून जम्मू काश्मीरमध्ये प्रचाराकरिता उतरविण्याचा निर्णय घेतला आहे. स्टार प्रचारकांमध्ये काँग्रेसने पहिल्या फळीतील नेत्यांचा समावेश केला आहे. यामध्ये महाराष्ट्रातून गांधी घराण्याशी एकनिष्ठ राहिलेल्या खासदार रजनीताई पाटील यांचा समावेश आहे. स्टार प्रचारकाच्या यादीत काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, जयराम रमेश, अंबिका सोनी, अजय माकन, सलमान खुर्शीद, कन्हैया कुमार आणि महाराष्ट्रातील रजनीताई पाटील यांच्या नावांचा समावेश आहे. याशिवाय हिमाचलचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू, पंजाबचे माजी मुख्यमंत्री चरणजीत सिंह चन्नी, राजस्थानचे माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांचाही स्टार प्रचारकाच्या यादीत समावेश आहे.



राष्ट्रकुल संसदीय मंडळ ,महाराष्ट्र शाखेतर्फे सन २०२० - २१ करिता देण्यात येणारा उत्कृष्ट भाषण पुरस्कार राष्ट्रपती यांच्या शुभहस्ते दि.०३/०९/२०२४ रोजी विधिमंडळ मुंबई येथे स्वीकारताना आमदार प्रकाश दादा सोळंके

# शेतकऱ्यांनी ७२ तासात पिक विमा कंपनीकडे ऑनलाइन तक्रार करावी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ सप्टेंबर**

बीड तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांना सुचित करण्यात येते, प्रधानमंत्री फसल बीमा योजना खरीप हंगाम २०२४ मध्ये भारतीय कृषी विमा कंपनी लि. यांच्यामार्फत बीड जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे. तरी दरम्यानच्या काळामध्ये पिकांचे स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत विमा संरक्षित क्षेत्र जलमय झाल्यास, भूस्खलन, गारपीट, ढगफुटी, महापूर, दीर्घ काळ पाणी साचून झालेले नुकसान व चक्रीवादळ, वीज पडून लागलेली नैसर्गिक आग इत्यादी कारणामुळे पिकाचे नुकसान झाले असल्यास तसेच काढणी पश्यात अंतर्गत ज्या पिकांची काढणीनंतर शेतात पसरवून अथवा पेंड्या बांधून सुकवणी करणे आवश्यक असते अश्या कापणी/काढणी नंतर सुकवणीसाठी शेतात पसरवून ठेवलेल्या अधिसूचित पिकांचे काढणीनंतर दोन आठवड्यांच्या आत (१४ दिवस) गारपीट, चक्रीवादळ, चक्रीवादळामुळे आलेला पाऊस आणि बिगर मोसमी पावसामुळे नुकसान झाले असल्यास खरीप हंगाम २०२४ मध्ये पिक विमा भरलेल्या शेतकरी बांधवांनी ७२ तासात पिक विमा कंपनीकडे ऑनलाइन तक्रार करावी. नुकसानग्रस्त पीक विमाधारक शेतकरी बांधवांनी वेळीच तक्रारी दाखल कराव्यात. पिक विमा कंपनीला तक्रार देण्यासाठी कृषी व शेतकरी कल्याण विभागामार्फत विकसित क्रॉप इन्शुरन्स अप्लिकेशन पुढील लिंक द्वारे गूगल प्ले स्टोर वरून डाऊनलोडकरून घ्यावे.

https://play.google.com/store/apps/details?id=in. farmguide. farmerapp.central या अप्लिकेशनचा वापर करून

त्याद्वारे माहिती द्यावी. अधिक माहितीसाठी तालुका कृषी कार्यालयातील खालील विमा प्रतिनिधी यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन बीड तालुका कृषी अधिकारी गंडे बी.आर व तहसिलदार शेळके यांनी केले आहे.

**तालुका प्रतिनिधी यांचे संपर्क क्रमांक खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | तालुका | तालुका प्रतिनिधी | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | बीड | जोगदंड पवन | [illegible] |
| २ | बीड | इनकर हनुमान | [illegible] |
| ३ | बीड | तांदळे आशिष | [illegible] |
| ४ | बीड | सोनवणे अविनाश | [illegible] |
| ५ | बीड | जोगदंड सुमित | [illegible] |
| ६ | बीड | घुगे ईश्वर | [illegible] |

# महिला सरपंचाच्या मागणीला केराची टोपली

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३ सप्टेंबर**



केज तालुक्यातील जीवाची वाडी,तुकूची वाडीसह परीसरात विना-परवाना देशी-विदेशी बनावट दारू खुले आम विक्री होत असलेचे लेखी निवेदनासह ग्राम पंचायतचा ठरावाची सत्यप्रत गावच्या प्रथम नागरीक तथा महिला सरपंच,श्रीमती प्रेरणा दिपक काळे सह ग्रामपंचायत कार्यालय,जीवाची वाडीचे पद्अधिकारी व दोन्ही गावातील महिला यांनी पुढाकार घेऊन दर वर्षा प्रमाणे याही वर्षी पोलीस अधिक्षक,बीड.यांना तारीख ०२ऑगष्ट-२०२४ रोजी प्रत्यक्षात एस पी कार्यालयात जाऊन ठरावासह निवेदन दिले, त्या निवेदनाच्या प्रतिलिपी विभागीय पोलीस आयुक्त कार्यालय,छत्रपती संभाजीनगर. तहसीलदार,केज.अप्पर पोलीस अधिक,अंबाजोगाई.पोलीस उपाधिक्षक,केज.अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क,बीड.पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे,केज.यांना कळऊन महिना झाले,परंतु कोणाचीही कारवाही केली गेली नाही विनापरवाना देशी विदेशी बनावट दारू विक्री रोखण्यास सबंधीत नियंत्रण विभाग अपयशी असून ना.पालकमंत्री धनंजय मुंडे यांना कार्यक्रमात निवेदन देऊनही दारु विक्री रोखन्याय यंत्रणा पुर्णतःअपयशी असलेचे परीसरात उलटसुलट चर्चा ऐकवयास मिळत आहे.

# बीड जिल्ह्याच्या विकासात हरित महामार्ग भर टाकणार!

## खा.बजरंग सोनवणेंच्या पत्राला नितीन गडकरींचा हिरवा कंदील

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ सप्टेंबर**

दळणवळण सोयीस्कर होण्यासाठी सुरत-चेन्नई हरित महामार्ग प्रकल्प भारत सरकार अंतर्गत बांधला जात आहे. हा प्रस्तावित महामार्ग महाराष्ट्रातील नाशिक, अहमदनगर, बीड, धाराशिव आणि सोलापूर अशा पाच जिल्ह्यांमधून जातो आहे.त्यामुळे बीड जिल्ह्यातून गेलेल्या महामार्गांना सुरत-चेन्नई हरित महामार्ग जोडला गेल्यास त्याचा फायदा होईल. त्याचबरोबर मराठवाड्याचा दुष्काळी भाग परराज्यांना जोडला जाईल. त्यामुळे दळणवळण करण्यास चालना मिळेल.आशा मागणीचे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक तथा महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना दिले होते. त्या पत्राला त्यांनी हिरवा कंदील दाखविला आहे.



बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी, भारत सरकार प्रस्तावित सुरत-चेन्नई रहित महामार्ग संदर्भात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना पत्र दिले होते.त्यामध्ये त्यांनी मागणी केली होती की, बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातून सुरत-चेन्नई हरित महामार्ग जात आहे,मात्र बीड जिल्हा मुख्यालय ठिकाणापासून लांब अंतरावर आहे.या प्रकल्पामध्ये अरणगाव तालुका जामखेड येथे वाहने चढण्यास व उतरण्यास सुविधा देण्यात आली आहे. या ठिकाणापासून जामखेड-खर्डा-चौसाळा- माळेगाव येथे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ ला सुपर दिला गेला तर मराठवाड्याच्या दळणवळणाला अधिक चालना मिळेल.अविकसित मानल्या जाणाऱ्या भागाला विकासाची जोड निर्माण होईल. तसेच चौसाळा येथे बीड जिल्हा मुख्यालय ठिकाणाला जोडला जाईल.त्यामुळे केज, माजलगाव, धारूर येथील रस्त्यांचे जाळे तयार होईल.अशी मागणी केली होती.

सुरत-चेन्नई महामार्ग हा साळेगाव येथे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ पासून नांदूरघाट पुढे चौसाळा येथे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ येडशी छत्रपती संभाजी नगरला जोडून पुढे खरडा ते दिघोळ फाटा पैठण पंढरपूर पालखी मार्ग राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ इतरला जोडून जामखेड अरणगाव येथून अंदाजीत लांबी ८६ किमी होईल.यामधील काही किलोमीटर लांबीचे रस्ते हे राष्ट्रीय महामार्ग दर्जाचे आहेत व काही लांबीचे रस्ते हे राज्य महामार्ग असून त्यांना राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देऊन ते त्याचे रुंदीकरण हे दोन लेन पेव्हड शोल्डरमध्ये करावे. कारण बीड शहर व बीड जिल्ह्यातील केज, धारूर, माजलगाव तालुक्यासाठी सुपर कनेक्टिव्हिटीचे काम करेल.अशी कनेक्टिव्हिटी तयार झाल्याने मराठ्यातील मागास मानल्या जाणाऱ्या भागाला विकसित होण्यासाठी मदत होईल आणि हा भाग राज्याशी जोडला जाईल.अशी मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी केली होती.त्या मागणीला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी हिरवा कंदील दाखविला आहे.त्यामुळे बीडच्या विकासात आणखीन भर पडली जाणार आहे.

# महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने शिक्षणाधिकारी यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.३ सप्टेंबर**

मुख्याध्यापक पदोन्नती यादीबाबत आक्षेप घेत ऑगस्ट २०२१ रोजी पदोन्नती नाकारलेल्या प्राथमिक शिक्षक व प्राथमिक पदवीधर यांचा या पदोन्नती यादीत समावेश करावा अशा मागणीचे निवेदन प्राथमिक शिक्षणाधिकारी बीड यांना महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्यावतीने देण्यात आले आहे.

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील सुमारे ७०पेक्षा जास्त जागांवर मुख्याध्यापक नसल्याने पालकांकडून मुलाचे शैक्षणिक नुकसान होत आहे अशीओरड होत आहे . पदवीधर पदाच्या पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या शिक्षकांकडून

पाठपुरावा केला जात होता, मात्र ही पदोन्नती झालेली नव्हती. अखेर १६१ प्रा प ची पदोन्नती झाली पण आदेश जारी करण्याचा जि प बीड मुहूर्त पहात आहे . मुख्याध्यापक पदोन्नती साठी दि . २७ ऑगस्ट २०२४ रोजी जावक क्र. ४२४७ ने जि प बीड यादी प्रकाशित केली परंतु या यादीत तिन वर्षापूर्वी पदोन्नती नाकारलेल्या प्राथमिक शिक्षक व प्राथमिक पदवीधर यांचा या पदोन्नतीत समावेश करण्यात आला नाही. मुख्याध्यापक पदोन्नती यादीबाबत आक्षेप घेत ऑगस्ट २०२१ रोजी पदोन्नती नाकारलेल्या प्राथमिक शिक्षक व प्राथमिक पदवीधर शिक्षक यांचा या पदोन्नतीत समावेश करण्यात यावा या मागणीचे निवेदन शुक्रवार दि.३० ऑगष्ट २०२४ रोजी प्राथमिक शिक्षणाधिकारी जि प बीड यांना देण्यात आले यावेळी भगवान पवार कैलास दहातोंडे, बळीराम आकुसकर, नामदेव शिंदे, अंकुश काटे, विभीषण पाटील, रत्नाकर वाघमारे, पुष्पाताई लोमटे, परमेश्वर शिंदे, जरांगे ए. के आदींची उपस्थिती होती.

# माजलगावात २८ कोटी रूपयांच्या स्त्री रूग्णालयास मान्यता

## सहा महिण्याच्या कालावधीत उभारणार इमारत आमदार प्रकाश सोळंके यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३ सप्टेंबर**

माजलगावात २८ कोटी ६८ लक्ष रूपयांचे साठ खाटांचे स्त्री रूग्णालयास मान्यता मिळाली असुन सहा महिण्याच्या कालावधीत रूग्णालयाची इमारत उभारण्यात येणार असल्याची माहिती आमदार प्रकाश सोळंके यांनी दिली आहे.

शहरामध्ये स्त्री रूग्णालय नसल्याने महिलांना इतर ठिकाणी उपचारासाठी जावे लागत होते. यामध्ये महिलांची मोठी परेशानी होती. त्यामुळे माजलगाव शहरात स्वतंत्र स्त्री रूग्णालय उभारण्यात यावे अशी मागणी होती. याची दखल घेत आ. प्रकाश सोळंके यांनी या रूग्णालयाबाबत शासनस्तरावर पाठपुरावा केला होता. त्यामुळे रूग्णालयाची मागणी शासनाच्या विचाराधीन होती. दि. ३ सप्टेंबर २०२४ रोजी याबाबतचा शासन निर्णय निर्गमीत झाला असुन साठ खाटांचे स्त्री रूग्णालय मुख्य इमारत बांधकामास २८ कोटी ६८ लक्ष रूपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यामुळे माजलगाव शहरात स्त्री रूग्णालय उभारण्यात येणार असुन सहा महिण्यांमध्ये स्त्री रूग्णालयाची इमारत उभारण्यात येणार असल्याची माहिती आ. प्रकाश सोळंके यांनी दिली आहे.



# वसाहत बागपिंपळगाव केंद्राची शिक्षण परिषद

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.३ सप्टेंबर**

केंद्र वसाहत बागपिंपळगाव येथील श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत केंद्रप्रमुख नामदेव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रस्तरीय शिक्षण परिषद उत्साहात संपन्न.



केंद्र वसाहत बागपिंपळगाव या केंद्रा अंतर्गत १२ शाळा येतात या १२ शाळेतील प्राथमिक शिक्षकांची केंद्र प्रमुख नामदेव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रस्तरीय शिक्षण परिषद श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत शुक्रवार ३० रोजी दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमासाठी श्री संत भगवानबाबा शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी केंद्र प्रमुख तथा केंद्रीय मुख्याध्यापक यांनी या शैक्षणिक वर्षात सुरू असलेल्या शैक्षणिक कामाचा शिक्षका कडून आढावा घेऊन. शिक्षकांना अध्ययन निष्पत्ती त्यातील स्तर या विषयी सांगून शिक्षकांनी आपल्या शाळेतील विद्यार्थी प्रगत होण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करावे. तसेच आपल्या केंद्रातील सर्व शाळेनी शंभर टक्के महावाचन चळवळ अभियानाचे रजिस्ट्रेशन करुन नाव नोंदणी करावी. नवोदय परिक्षेसाठी जास्तीत जास्त विद्यार्थी प्रविष्ठ करावे या व अशा सुचना यावेळी शिक्षकांना दिल्या. या शिक्षण परिषदेसाठी ४९ शिक्षक हजर होते. या शिक्षण परिषदेत निकाळजे अशोक, कुटे दयावान व कुलकर्णी सोनाली यांनी सुलभक म्हणून काम केले. या प्रसंगी नवनियूक्त ट्रेनी शिक्षकांचा सत्कार केंद्रप्रमूख नामदेव शिंदे यांनी केला. तसेच ट्रेनी शिक्षकांनी प्रामाणिक पणे काम करून आपले वेगळेपण दाखवावे असे सूचवले. शिक्षण परिषद यशस्वीपणे पार पडण्यासाठी श्री संत भगवानबाबा विद्यालयाच्या सर्व शिक्षकांनी सहकार्य केले. या शिक्षण परिषदेसाठी उपस्थित शिक्षकांचे आभार दयावान कुटे यांनी मानले व शिक्षण परिषद आनंदात पार पाडण्यात आली.

# गेवराई शहरात बैल पोळा सण उत्साहात साजरा

## शिवराज पवार यांनी वेशीवर बांधलेले तोरण तोडून बैल पोळा फोडला



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.३ सप्टेंबर**

गेवराई शहरात बैल पोळा सण उत्साहात साजरा करण्यात आला. युवा नेते शिवराज बाळराजे पवार पाटील यांनी हनुमान मंदिराला प्रदक्षिणा घालून ,वेशीवर फुलांच्या माळांनी बांधलेले तोरण तोडून पोळा फोडला. शहरातील शेतकऱ्यांनी वेशीतून सजवलेल्या बैलांना वाजतगाजत मिरवून आणले. दोन दिवसापासून पावसाची संततधार सुरू असल्याने, पोळा सणाच्या उत्साहात भर पडल्याचे दिसून आले.

पोळा पहाण्यासाठी नागरीकांनी गर्दी केली होती. सोमवार ता. २ सप्टेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता गेवराई शहरातील शेतकरी, दरवर्षी प्रमाणे शास्त्री चौकात पोळा सण साजरा करण्यासाठी एकत्र आले होते. गेवराई चे पाटील शिवराज बाळराजे पवार यांनी सजवलेल्या बैलांची मिरवणूक काढून ग्रामदैवतांची पुजा केली. त्यांनी वेशीवर बांधलेले तोरण तोडून बैल पोळा फोडला. त्यानंतर, शेतकऱ्यांनी सजवलेल्या बैलांची वेशीतून मिरवणूक काढली. ढोल ताशा , हलगीच्या तालाने शास्त्री चौकातला परिसर दणाणून गेला. गेल्या दोन दिवसांपासून गेवराई तालुक्यात संततधार पाऊस पडत असून, पोळा उत्साहात पार पडल्याचे चित्र दिसून आले. नागरीकांनी पोळा पाहण्यासाठी गर्दी केली होती. पोलिस निरीक्षक प्रविणकुमार बांगर, पोलिस अधिकारी संतोष जंजाळ, डॉ. भुतेकर , यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांची तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करा- सत्तार

## २ लाख ४९ हजार हेक्टरवरील शेती पिकांचे नुकसान, जिल्ह्यातील सर्वच मंडळात अतिवृष्टी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ सप्टेंबर**

जिल्ह्यात गेल्या दोन दिवसात झालेल्या अतिवृष्टीत मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, जिल्हा प्रशासनाने योग्य समन्वय ठेवून तातडीने नुकसानीचे पंचनामे पूर्ण करावेत. यामध्ये एकही बाधित व्यक्ती पंचनाम्यापासून वंचित राहणार नाही. तसेच त्यांना तात्काळ दिलासा देता येईल, याची दक्षता घेण्याचे निर्देश अल्पसंख्यांक विकास, औकाफ, पणन मंत्री तथा पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी जिल्हा प्रशासनाला आज येथे आयोजित आढावा बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित आढावा बैठकीत पालकमंत्री सत्तार बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर जाधव यांच्यासह जिल्हा प्रशासकीय यंत्रणेचे प्रमुख उपस्थित होते.

जिल्ह्यात तहसील स्तरावरील विविध पथकांमार्फत नुकसानीचे पंचनामे तातडीने करून त्याचा प्राथमिक अहवालाचा प्रस्ताव तातडीने नुकसान भरपाईसाठी शासनाकडे पाठवावा. जिल्ह्यातील बाधितांना तातडीने मदत मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे नुकसान भरपाईसाठी आवश्यक निधी मिळविण्यासाठी पाठपुरावा करणार आहे. शासन निर्णयान्वये नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतीपिक नुकसानीचे विहित पद्धतीने पंचनामे करण्याचे स्थायी निर्देश आहेत. त्यानुसार नुकसान भरपाई देण्यासाठी विविध यंत्रणेनुसार तातडीने पंचनामे सुरू करावेत. या कामासाठी आवश्यकतेनुसार गटविकास अधिकारी, कृषि सहाय्यक, ग्रामसेवक, तलाठी व इतर तालुकास्तरीय अधिकारी-कर्मचारी यांची पथके गठीत करून पंचनामे कालमर्यादेत पूर्ण करावेत व एकही बाधित शेतकरी वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी दिले.

जिल्ह्यात काही गावामध्ये नागरिक पुराच्या पाण्यात अडकून पडले. त्या सर्वांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले असून, त्यांच्या अन्न-पाणी आणि निवाऱ्याची सोय करावी. पाऊस आणि पुराच्या पाण्याने जिल्ह्यातील नुकसान झालेल्या भागातील शेती, घरे व जनावरांचे तातडीने पंचनामे सुरु करावेत. या अतिवृष्टीमध्ये जीवित व वित्तहानीची परिपूर्ण माहिती तयार करावी. तसेच मदतीची आवश्यकता असलेल्या ठिकाणी तातडीने मदत पाठविण्याची व्यवस्था करावी. तसेच महावितरण विभागाने खंडीत झालेला वीज पुरवठा सुरळीत करण्याची प्राधान्याने आणि तात्काळ कार्यवाही करावी. तसेच वीज उपकेंद्र, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रामध्ये पाणी शिरले आहे, त्या ठिकाणचे पाणी काढून देण्याची व्यवस्था करावी.

जिल्ह्यात पावसामुळे झालेल्या नुकसानीचा मंगळवार (दि.३) रोजी पालकमंत्री अब्दुल सत्तार हे आडगाव, सावरखेडा, सोडेगाव, डोंगरगाव पूल येथे नुकसानीची पाहणी करणार आहेत.

जिल्ह्यात गेल्या दोन दिवसात सर्वच मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली असून, वसमत तालुक्यातील टेंभूर्णी येथील सुभाष बाबुराव सवंडकर (३८) हा व्यक्ती नाल्याच्या पाण्यात वाहून गेल्याने मयत झाला. तर आज सायंकाळी औंढा नागनाथ तालुक्यातील सारगवाडी येथील संजय ठोंबरे (वय ३३वर्षे) व चैतन्या ठोंबरे (वय १० वर्षे) हे दोघेजण नाल्याच्या पाण्यात वाहून गेले आहेत. तसेच जिल्ह्यातील अंदाजे २ लाख ४९ हजार ८३९ हेक्टरवरील शेतीपिकाचे तर ५६ पशुधनाचे नुकसान झाले आहे. तर जिल्ह्यातील विविध भागात नदीच्या पुरामुळे अडकून पडलेल्या ८७ नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. तर घरांमध्ये पुराचे पाणी घुसल्यामुळे बाधित झालेल्या कुटुंबातील २१८ नागरिकांना स्थलांतरीत करण्यात आले असून, त्यांचे निवास आणि भोजनव्यवस्था जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आली. तसेच टाकळगव्हाण आणि कोंढूर या दोन गावाचा संपर्क तुटला होता. तर राज्य आणि प्रमुख जिल्हा मार्ग प्रत्येकी ९ असे एकूण १८ मार्ग बंद पडले आहेत.

तसेच जिल्हा परिषदेचा १ रस्ता बंद पडला असल्याचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी पालकमंत्री श्री. सत्तार यांना यावेळी सांगितले. उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, सर्व गटविकास अधिकारी, विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी पत्रकारांशी संवाद साधतांना पालकमंत्री सत्तार म्हणाले की, आढावा बैठकीस गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांची जिल्हाधिकारी कार्यालयात नोंद घेण्यात आली असून या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी गोयल यांना दिल्या आहेत.

मंगळवारी सकाळी पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी सोडेगाव येथील पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी बोलतांना त्यांनी सांगितले की, जिल्ह्यात नुकसानीची परिस्थिती गंभीर आहे. नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे केली जातीलच. एकही शेतकरी मदतीपासून वंचीत राहणार नाही. नुकसान झालेल्यांना शासनाच्या निकषानुसार मदत मिळण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार आहे. पंचनामे झाल्यानंतरच प्रत्यक्षात किती हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले हे स्पष्ट होणार आहे. शेतकरी आणि नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करावे. यावेळी आ. संतोष बांगर, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

- ❋ शेतक-यांना धीर देण्याचे काम करा.
- ❋ नुकसान भरपाईच्या आवश्यक निधीसाठी शासनस्तरावर पाठपुरावा करणार.
- ❋ जिल्हा प्रशासनाने योग्य समन्वय ठेवून पंचनामे पूर्ण करावेत.
- ❋ प्रत्येक गावात एक कर्मचारी नेमा.
- ❋ पंचनामे करताना सूक्ष्म नियोजन करा.
- ❋ एकही बाधित व्यक्ती मदतीपासून वंचित राहता कामा नये.
- ❋ अंदाजे २ लाख ४९ हजार हेक्टरवरील शेतपिकांचे नुकसान.
- ❋ पूरग्रस्त भागात आरोग्यविषयक आजार होणार नाहीत,यासाठी खबरदारी घ्या.
- ❋ जिल्ह्यात सर्व मंडळात अतिवृष्टी
- ❋ सर्व अधिकारी -कर्मचा-यांना क्षेत्रीय स्तरावर सक्रिय करा

# नगर परिषद संवर्ग संघटनेच्या बेमुदत संपाला सुरूवात



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ सप्टेंबर**

नगर परिषद कर्मचाऱ्यांचे वेतन कोषागार कार्यालयामार्फत काढावे तसेच शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सर्व लाभ नगर परिषद कर्मचाऱ्यांना मिळावेत या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य नगर परिषद संवर्ग अधिकारी संघटनेच्यावतीने येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करीत बेमुदत संपाला सुरूवात केली आहे.

मागील अनेक वर्षापासून नगरपालिकाकर्मचाऱ्यांच्या मागण्यां संदर्भात शासन उदासीन आहे. त्यामुळे नगर परिषद कर्मचाऱ्यांच्यावतीने दि ३ सप्टेंबर रोजी प्रदेशाध्यक्ष डी पी शिंदे यांच्या नेतृत्वात विविध मागण्यांसाठी निदर्शने करण्यात आली. यावेळी उपमुख्याधिकारी उमेश हेंबाडे यांच्यासह कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी जिल्हाधिकारी यांचेमार्फत शासनाला पाठविण्यात आलेल्या निवेदनात सातवा वेतन आयोग अधिसूचनेत पदांचा समावेश करून सेवार्थ क्रमांक देण्यात यावा, राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू करावी, नियमाप्रमाणे पदोन्नती द्यावी, सेवानिवृत्ती उपदान व रजा रोखीकरणाचा लाभ मिळावा, आश्वासीत प्रगती योजना लागू करावी, सेवा ज्येष्ठता यादी प्रसिध्द करावी, कर्मचाऱ्यांचे पगार कोषागार कार्यालयातून दर महिन्याच्या १ तारखेस करण्यात यावे, कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करण्यात यावे, युपीएस पेन्शन योजनेत समाविष्ट करावे किंवा जुनी पेन्शन योजना लागू करावी आदी मागण्यांचा समावेश आहे. मागण्यांच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी शासनाने संघटनेला वेळ द्यावा तसेच समस्या आणि मागण्यांवर तत्काळ अंमलबजावणी व्हावी अशी मागणीही यावेळी निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष अंकुश जाधव, जिल्हा सचिव उमेश हेंबाडे, शाम माळवटकर, देवीसिंह ठाकूर, कार्याध्यक्ष तसनीम सनोबर, कोषाध्यक्ष अनिकेत नाईक, काझी, भागवत धायतडक, राजेश पद्मणे, वसंत पूतळे, लिंबाजी कंधारकर, संदीप घुगे, नंदकिशोर डाखोरे आदींची उपस्थिती होती.

# वसमत येथील मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची आ. नवघरेंची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ३ सप्टेंबर**

उप मुख्यमंत्री अजित पवार यांची जनसन्मान यात्रा व शेतकरी मेळावा वसमत येथे आयोजीत करण्यात आली होता. यामध्ये शासनाच्या लोक कल्याणकारी योजना जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी ही यात्रा आयोजीत केली होती. सदरील कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट) यांनी केले होते. सदर कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार हे जनतेला लोककल्याणकारी योजना भाषणाव्दारे सांगत असतांना सकल मराठा समाजाच्यावतीने काही आंदोलक यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावे याचे निवेदन घेवून आले असता आम्ही त्यांना निवेदन देण्यासाठी स्टेजवर बोलावुन उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन देण्यात आले. त्या आंदोलकावर पोलीस स्टेशन वसमत शहर येथे नाहक गुन्हे दाखल करण्यात आले असुन हे अंत्यंत चुकीचे आहे. सदर आंदोलक हे मराठा समाजाच्या भावना शासनापर्यंत पोहचविण्याकरिता सदभावनेने निवेदन देण्याकरिता आलेले असल्याने त्यांच्यावर पोलीस स्टेशन वसमत शहर येथे वेगवेगळ्या कलमाखाली दाखल करण्यात आलेले गुन्हे तातडीने मागे घेण्यात यावे. अशी मागणी आ. राजु नवघरे यांनी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचेकडे केली आहे.

## संक्षिप्त वृत्त

### सिंचन व वीज अनुशेषसाठी आ. मुटकुळेंनी घेतली राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची भेट



हिंगोली- हिंगोली जिल्ह्याचा सिंचन अनुशेष २०१७ साली परभणी जिल्ह्यातून वेगळा करून मान्य करण्यात आला होता, त्या अनुषंगाने बऱ्याच प्रमाणात सिंचनाची कामे झाली परंतु बरीच कामे कर्मचाऱ्यांचा अभावामुळे बंद पडत आहेत. मोठ्या प्रमाणात रिक्त पदे भरण्यात यावी अशी मागणी केली. त्यावेळी सोबतच सिंचन विहरी २२००० करण्यासंदर्भात भूजल सर्वेक्षण कार्यालय पुणे यांनी अभिप्राय दिला होता परंतु प्रत्यक्षात फक्त ५००० विहिरी पूर्ण झाल्या आहेत. त्याच बरोबर सिंचन वाढल्यामुळे विजेचाही तुटवडा भासत आहे. या विजेची अनेक केंद्रे मंजूर करून द्यावी अशी मागणी यावेळी केली. यावेळी शहराध्यक्ष कैलास काबरा, नगरसेवक ॲड राजेश गोटे, हमीद प्यारेवाले उपस्थित होते.

### तलाठी हत्या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे द्या



हिंगोली- आडगाव रंजेबुवा येथील तलाठी संतोष पवार यांच्या खूनप्रकरणाचा तपास उपविभागीय पोलिस अधिकारी यांचेकडून काढून सीआयडीकडे वर्ग करण्यात यावा या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी रिपब्लीकन सेनेच्यावतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करीत निषेध आंदोलन करण्यात आले. निवेदनात सदरील गुन्हा हा कट रचून आणि सुनियोजीत पध्दतीने केला असल्याने इतर आरोपी निष्पन्न करून तत्काळ अटक करून कटाचे कलम समाविष्ट करावे, सदरील प्रकरण जलद गती न्यायालयात चालवून आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी, मयत तलाठी पवार यांच्या कुटुंबीयांना शासकीय नोकरीत समाविष्ट करावे तसेच ५० लाख रूपये आर्थिक मदत करावी, त्यांच्या कुटुंबियांचे पुर्नवसन करावे, तलाठ्यांना सुरक्षा प्रदान करावी, आरोपी प्रताप कऱ्हाळे याच्यासह या प्रकरणातील मध्यस्थींची चौकशी करून सहआरोपी करावे आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. निवेदनावर रिपब्लीकन सेनेचे अध्यक्ष किरण घोंगडे यांच्यासह पदाधिकारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# एसटी कर्मचाऱ्यांचे विविध मागण्यांसाठी धरणे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ सप्टेंबर**

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या वेतनाप्रमाणे वेतन मिळावे, सातवा वेतन आयोग लागू करावा आदी प्रलंबीत मागण्यांसाठी दि ३ सप्टेंबरपासून एसटी कर्मचाऱ्यांनी धरणे आंदोलन सुरू केले असून मागण्या तत्काळ मान्य न केल्यास बेमुदत काम बंदचा इशारा कामगार संघटनेने दिला आहे. या आंदोलनामुळे मंगळवारी काही भागातील बससेवा विस्कळीत झाली होती.

यावेळी कामगार संयुक्त कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाचा निषेध करीत आश्वासन देऊनही ९ महिने उलटले परंतु अद्याप एस टी कर्मचाऱ्यांचा मागण्या मान्य केल्या नाहीत. यावेळी संघटनेच्यावतीने खाजगीकरण बंद करा, सेवानिवृत्त झालेल्या व होणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन मिळण्यासाठी येणाऱ्या अडचणी दुर करा. तसेच महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रीय कार्यालयात संयुक्त घोषणा पत्रानुसार दुरूस्ती करण्यात यावी, चालक, वाहक, कार्यशाळा व महिला कर्मचाऱ्यांना अद्यावत व सर्व सुखसोईचे विश्रांतीगृह द्या, इनडोअर व आऊटडोअर मेडीकल कॅशलेस योजना लागू करा, महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, व वार्षिक वेतनवाढीच्या दराची थकबाकी देण्यात यावी, सरसकट मुळ वेतनात ५ हजार रूपयांची वाढ करावी, सुधारीत शिस्त व अपील कार्यपध्दतीमध्ये शिक्षेचे प्रमाण जास्त असल्यामुळे याबाबत कामगारांमध्ये असंतोष आहे त्यामुळे ती रद्द करण्यात यावी, एस टी कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना सर्व प्रकारच्या एस टी बसमध्ये मोफत पासची सवलत द्यावी आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. यावेळी संयुक्त कृती समितीसह एस टी कामगार संघटना, कामगार सेना, राज्य परिवहन कर्मचारी संघटना आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.

# जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करा- आ. मुटकुळे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ सप्टेंबर**

मागील चार दिवसांपासून जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे आतोनात नुकसान झाले आहे. सोयाबीन, कापूस, हळद, ज्वारी, उडीद, मुग यासह फळबागांचे मोठ्या आतोनात नुकसान झाले आहे. तसेच शहर आणि ग्रामीण भागातील व्यापाऱ्यांच्या दुकानात तसेच घरात पाणी शिरल्याने जीवनाश्यक वस्तूसह इतर वस्तूंचेही मोठे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीमुळे शेतकरी, व्यापारी तसेच ग्रामीण भागातील लोक त्रस्त झाले असून आर्थिक अडचणीत सापडले आहे. या नुकसानीचे तातडीने पंचनामे आर्थिक मदत करावी तसेच जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेकडे पत्राद्वारे केली आहे.

# अतिवृष्टी बाधित भागांचे पंचनामे करतांना अचूकता ठेवा- जिल्हाधिकारी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ सप्टेंबर**

जिल्ह्यातील अतिवृष्टी बाधित भागांचे पंचनामे करताना योग्य समन्वय राखून अचूक माहिती भरावी. तसेच जिल्ह्यातील पशुधन, शेती, पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तसेच रस्ते आणि पुलांसह वीज, पिण्याचे पाणीपुरवठा आदी मूलभूत सोयीसुविधा पुढील दोन दिवसांत सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करावेत. जलसंधारण, जलसंपदा विभागानेही त्यांच्याअंतर्गत येणाऱ्या गाव तलाव आणि पाझर तलावांची दुरुस्ती करून घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी आज येथे संबंधित विभाग प्रमुखांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातून आज ते दूरदृष्य प्रणालीद्वारे आढावा बैठकीत बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर जाधव आदी उपस्थित होते.

जिल्ह्यात पावसामुळे मोठ्या प्रमाणावर शेत पिकांचे, शेती, पशुधन आणि वीज पुरवठा तसेच रस्ते, पुलांचे आणि सार्वजनिक मालमत्ताचे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करताना एकही बाधित व्यक्ती मदतीपासून वंचित राहू नये, याची खबरदारी घ्यावी. हे पंचनामे तात्काळ सुरु केल्यास माहितीमध्ये अचूकता येईल. त्यामुळे संबंधित विभागप्रमुखांनी आपल्या अधिनस्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची पथके नेमून या कामाला प्राधान्य द्यावे. ग्रामीण भागात पिण्याचे पाणी पुरवठा करणाऱ्या यंत्रणांनी पाणीपुरवठा तात्काळ पूर्ववत करण्यास प्राधान्य द्यावे. ज्या गावातील पिण्याच्या पाण्याच्या जलवाहिन्या आणि त्यासाठी लागणारा वीजपुरवठा पूर्ववत करण्यापूर्वी त्यांच्या गावनिहाय याद्या तयार कराव्यात. त्यामुळे त्या गावांना पाणीपुरवठा आणि वीजपुरवठा सुरळीत करणे सोईचे होईल, अशा सूचना त्यांनी दिल्या.

तसेच पावसामुळे नदीवरील रस्ते आणि पुल क्षतीग्रस्त झाले असून, एनएचएआयचे रस्ते आणि पुलांची दुरुस्ती करण्याचे काम तातडीने सुरु करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी केल्या.

तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, राज्य रस्ते विकास महामंडळ आणि जिल्हा परिषदेअंतर्गत येणाऱ्या रस्त्यांचेही काम तातडीने पूर्ववत करून घेण्याचे निर्देश दिले आहे. सावरखेडा येथील रस्ता पुलाचा एक भाग पूर्ण तुटला आहे. तसेच सोडेगाव येथील कयाधू नदीवरील रस्ता आणि पुलाचे काम तातडीने सुरु करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी दिले. रस्ते आणि पुलाचे दुरुस्तीचे काम पूर्ववत करताना स्थानिक लोकप्रतिनिधी आणि तहसीलदार, गावचे सरपंच किंवा पदाधिकारी यांच्याशी संपर्क साधून त्यांना कामाबाबत माहिती द्यावी. त्यामुळे नागरिक आणि प्रशासन तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यात योग्य समन्वय राहील, याची काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

शेतकऱ्यांचे पाळीव प्राणी, दुभती जनावरे यांचे झालेले नुकसान आणि पुराच्या पाण्यात वाहून गेलेले पशुधन यांचे पंचनामे तात्काळ करून घ्या. पाणी ओसरल्यानंतर मलेरिया आणि साथीचे रोग पसरणार नाहीत, यासाठी रोगप्रतिबंधक फवारणी, लसीकरण करून घेण्याच्या सूचना दिल्या. प्राथमिक आरोग्य केंद्र आणि रुग्णालयांमधील उपकरणांचे झालेले नुकसान याची तात्काळ माहिती सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्री.गोयल यांनी दिले. क्लोरीन टॅबलेट आणि ब्लिचिंग पावडरचा गावपातळीवर पुरवठा करावा. जेणेकरून नागरिकांना आरोग्यविषयक समस्या उद्भवणार नाहीत. गावपातळीवर नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे, यासाठी पाणीपुरवठा विभागाने दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच पावसामुळे गावातील शाळांची, वर्गखोल्यांची धोकादायक स्थितीत आहेत का याबाबत शिक्षण विभागाकडून माहिती जाणून घेतली. तसेच धोकादायक स्थितीत शाळा असल्यास सुरक्षित ठिकाणी विद्यार्थ्यांची सोय करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिल्या.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# रेणापूर येथील दोन तरुण नदिपात्रात गेले वाहून



**तभा वृत्तसेवा**
**भोकर, ०३ सप्टेंबर-**

शेताकडे नदीपार करुन जातांना पाण्याचा अंदाज न आल्याने झालेल्या अपघातात २ युवक वाहून गेल्याची घटना दि.३ सप्टेंबर रोजी सकाळी १२ वाजेच्या दरम्यान तालुक्यातील रेणापूर येथे घडली.सदर घटनेची माहिती मिळताच गावकरी व प्रशासना तर्फे शोध मोहीम हाती घेण्यात आली.

भोकर तालुक्यातील रेणापूर या गावालगत सुधा नदी वाहते. तालुक्यात मागील तीन दिवसांपासून अतिवृष्टीमुळे नदी दुथडी भरून वाहत आहे. रेणापूर येथील रहिवासी यश संदीप भगत (२०) व श्रीनिवास भरत मुळेकर हे दोघे जन शेताकडे नदी ओलांडून जात असताना पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्याने झालेल्या अपघातात दोघे वाहून गेल्याची घटना घडली. सदर घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी शोधमोहिम सुरू करून प्रशासनाला माहिती दिली. तहसीलदार सुरेश घोळवे सह कर्मचारी घटनास्थळी धाव घेत शोधकार्य सुरु केले असून सायंकाळी उशिरापर्यंत युवकांचा शोध लागला नाही.

# कोट्यावधीचा खर्च करूनही कोकलेगावचा पुल अर्धवट

## नायगाव सा.बां.अभियंत्याच्या बेजवाबदार पणामुळे कुंटूर भागातील नागरिकांचे जिव धोक्यात

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव , ०३ सप्टेंबर-**

मागील तिन चार दिवसा पासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे जन जिवन विस्कळीत झाले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातील बेजबाबदार कार्यकारी व उप अभियंता मुळे राज्य मार्ग २५६ कुंटूर ते घुंगराळा पुलाचे संवसक्षक कठडे तुटलेले असल्याने आणी पाणी पुलावरून वहात असताना नायलाजस्तव नागरिकांना या पुलावरून प्रवास करत जिव धोक्यात घालावा लागत आहे.

अशी ही भयावह परिस्थिती निर्माण झालेली असताना या पुलाच्या दोन्ही बाजुला धोक्याची सुचना देणारे सुचना फलक देखील लावण्याची जवाबदारी झोपेत असलेल्या नायगाव सा.बा.अभियंतांनी पार पाडलेली नसल्याने नागरिकांच्या जिवितास मोठा धोका निर्माण झाला आसल्याचे संताप जनक चित्र पहावयास मिळत आहे. या गंभीर बाबीकडे मुख्य अभियंता व अधिक्षक अभियंता यांनी लक्ष द्यावे व नागरिकांच्या जिवनाची दक्षता घेत उपाय योजना करावी अशी मागणी या भागातील गावच्या नागरिकांची आहे.



अशीच आवस्था नायगाव ते उमरी राज्य मार्ग २५६ कोकलेगावा जवळील पूलावर २० कोटी रुपयाचा खर्च सि.आ.एफ.या योजने अंतर्गत दोन दशका पुर्वी करण्यात आला आहे तरीही या पुलाचे काम नायगाव सा.बा.विभागाच्या बेजवादार आणि कंत्राटदार धार्जीन अभियंता मुळे अर्धवट आवस्थेत आसल्याने २० कोटीचा खर्च तर पाण्यात गेलाच पण थोडाजरी पाउस झाला की पंदरा गावचा तालुक्यासी संपर्क तुटतो नागरिकांना अगदी जिवमुठ्ठीत घेवून प्रवास करावा लागतो.एवढी भयावह आवस्था असताना अभियंते व लोकप्रतिनिधी मात्र निद्रिस्त आसल्याचे चित्र आहे मागील २० वर्षा पासुन जनता उघड्या डोळ्यांनी पहात आहे. या मार्गावरील वहातुक बंद झाली याची जाणीव ही अभियंता ना माहीत नसल्याचा प्रकार या पावसामुळे समोर आला असल्याने कितीही बेपर्वाई असा सवाल निर्माण झाला आहे.

या पुलाचे राहिलेल्या रस्त्याचे काम तातडीने करावे या मागणी साठी कनेक वेळा आंदोलन केली पण लोकप्रतिनिधी व अभियंताना जाग आली नसल्याने नागरिकाच्या सुरक्षेची काळजी कोण घेणार हा प्रश्न निर्माण झाला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### मुदखेड येथे संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन

**मुदखेड** -मुदखेड येथे दि.३१ऑगस्ट रोजी श्री संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन नाभिक बांधवांच्या वतीने करण्यात आले होते. सर्व प्रथम कार्यक्रमाचे अध्यक्ष मारोतराव गायकवाड, यांच्या हस्ते दीपप्रज्वलन,व संत सेना महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आले. यावेळी मान्यवर व विविध पक्षाचे पदाधिकारी यांचे नाभिक बांधवांच्या वतीने सत्कार करण्यात आले, यानंतर काँग्रेसचे शहरध्यक्ष कैलास गोडसे, भाजपचे जिल्हा महामंत्री प्रवीण गायकवाड,शिवसेना उबाठा गटाचे विश्वभर पवार, बाळासाहेब देशमुख बारडकर, माजी नगरसेवक संजय आऊलवार,शिवसेना शहर प्रमुख सचिन चंद्रे, ओबीसि नेते नागोराव शेंडगे,यांनी संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त आपले मनोगत मांडले, तसेच भोकर मतदार संघाचे बहुजन नेते नागनाथ घिसेवाड यांनी संत सेना महाराजांच्या जीवनकाळावर प्रकाश टाकत उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी नाभिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष दत्ता चापलकर, जिल्हा कोषाध्यक्ष बाळू गायकवाड, धोंडिबा महादवाड, सदाशिव पा. पुयड,राष्ट्रवादी पक्षाचे शहरध्यक्ष महमद बुऱ्हान,राष्ट्रवादी महिला आघाडी शहरध्यक्ष रुक्मिनबाई कुंचटवाड, शिवानंद देवके,प्रकाश पा.सूर्यवंशी,संतोष बोडके,दत्ता सोनटक्के, संतोष गायकवाड,बाबुराव गायकवाड, दत्ता गायकवाड,प्रल्हाद गायकवाड, शंकर गायकवाड, नाभिक संघटनेचे तालुकाध्यक्ष गंगाधर कुंचटवाड,संदीप मुखेडे,बालाजी शहापुरे,सुनील गायकवाड, शिवाजी गायकवाड,परमेश्वर गायकवाड, माधव कोंडामंगल,बालाजी कोंडामंगल, शिवा खुळे, ज्ञानेश्वर गायकवाड, शंकर मोतेवार,शिवा पांगरगावकर,योगेश उत्तमपल्ले, ऋषिकेश शिंगारे,रघुनाथ जामलवाड, माधव गायकवाड, यासह आदींची उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व नाभिक बांधवांनी परिश्रम घेतला होता.

### बातमीमध्ये जातीय उल्लेख करणाऱ्या संपादकावर गुन्हा दाखल करा: बावरी

**नांदेड** -दोन गटात झालेल्या हाणामारीचे वृत्तांकन करताना जातीय उल्लेख करणाऱ्या दैनिक जागरणच्या मुख्य संपादकावर कारवाई करण्याची मागणी भाई मनी सिंघजी सिख सिकलीकर वेलफेअर सोसायटीचे बलजीतसिंग बावरी यांनी निवेदनाद्वारे जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. मध्य प्रदेशातील मथुरा येथील गोविंद नगरमध्ये दोन गटांमध्ये वाद होऊन हाणामारी झाल्याची घटना घडली होती. या घटनेत दोन जणांना अटक करण्यात आले. ही घटना निंदणीय असली तरी दैनिक जागरण या वृत्तपत्राचे मुख्य संपादकांनी जाणीवपूर्वक या बातमीमध्ये सिकलीकर समाजाचा जातीय उल्लेख करून समाजाच्या भावना दुखावल्या आहेत. सिकलीकर समाजामध्ये गँगवार असे जातीचा उल्लेख केलेले वृत्त प्रकाशित केल्यामुळे सिकलीकर समाजाच्या भावना दुखावल्या असून समाजाच्या भावना दुखवणाऱ्या दैनिक जागरणच्या मुख्य संपादकावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी बलजीतसिंग बावरी यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. निवेदनावर अजितसिंग जुन्नी, आझादसिंग बावरी, शेरसिंग बावरी, तारासिंग टाक ज्योतसिंग दुधाने, जसमिंदरसिंग बावरी, जितूसिंग टाक आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.




### शेतकऱ्यांना हेक्टरी ५०हजारची नुकसान भरपाई द्यावी :डॉ. रेखा चव्हाण

**हदगाव** -मागील दिवसापासून होत असलेल्या अतिवृष्टीमुळे हदगाव-हिमायतनगर तालुक्यातील शेतकरी बांधवांचे अतोनात नुकसान झाले असून शासनाने वेळ न दडवता तात्काळ नुकसानीचे पंचनामे करून हेक्टरी ५० हजारची मदत जाहीर करावी अशी मागणी डॉ. रेखा चव्हाण यांनी निवेदनाद्वारे प्रशासनास केली आहे. हदगाव - हिमायतनगर तालुक्यामध्ये अतिवृष्टीमुळे शेती व शेत पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. आज तिसरा दिवस असून या अतिवृष्टीमुळे हळद, सोयाबीन व कापूस पूर्णतः भुईसपाट झाले असून पूर्ण शेतात पाणी साचले आहे ही पूरस्थिती लक्षात घेऊन तात्काळ पंचनामे करून हेक्टरी ५० हजार रुपयांचे सरसकट नुकसान भरपाई म्हणून शेतकऱ्यांना देण्यात यावे तसेच राहिलेला पिक विमा शेतकरी बांधवांना तात्काळ वाटप करण्यात यावा. या अतिवृष्टीमुळे ज्या शेतकरी बांधवांच्या घरात पाणी शिरले तसेच ज्यांचे व्यवसायाचे सामान वाहून गेले त्यांनाही नुकसान भरपाई द्यावी तसेच कापूस व सोयाबीन या पिकासाठी घोषित केलेले अनुदान त्वरित देण्यात यावेत या अतिवृष्टीमध्ये शेतकरी बांधवांचे जनावरे शेळी, गाय, बैल इत्यादी वाहून गेले आहे याची योग्य प्रकारे नोंद घेऊन शेतकरी बांधवांना योग्य त्या प्रमाणात मोबदला देण्यात यावे अशा प्रकारची निवेदन प्रशासनास डॉ. रेखा चव्हाण यांनी दिले आहे.

### अतिवृष्टीने बाधित शेतीचे तात्काळ पंचनामे करा: आ.श्यामसुंदर शिंदे

**लोहा**-लोहा व कंधार मतदारसंघात मागील दोन दिवसापासून अतिवृष्टी झाली आहे, अतिवृष्टीमुळे नदी नाल्यांना व गोदावरी, मन्याड नदीला पूर आला असून पुराचे पाणी शेतात गेल्याने या भागातील शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे, सततच्या मुसळधार पावसामुळे सखल भागात पाणी साचल्यामुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले सरसकट शेतीचे पंचनामे करा,ज्या भागात पूरसदृश्य परिस्थिती उद्धवलेली आहे त्या त्या भागात आपत्कालीन सर्व सोयी सुविधा तात्काळ पुरवण्यात याव्यात व मतदारसंघातील अतिवृष्टीच्या पावसामुळे खरडलेल्या शेत जमिनीचे व बाधित शेतीचे तात्काळ पंचनामे करण्याची मागणी आ. श्यामसुंदर शिंदे यांनी नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



# आ.मोहनअण्णा हंबर्डे यांनी केली नुकसानग्रस्त शेतीची पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**लोहा, ०३ सप्टेंबर-**

नांदेड दक्षिण मतदारसंघाचे आ.मोहन हंबर्डे यांनी मतदारसंघातील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतीची बांधावर जाऊन संपूर्ण शेतीची पाहणी करुन नुकसान झालेल्या शेतीचे विलंब न लावता तात्काळ शासनाने सरसकट पंचनामे करुन तात्काळ मावेजा द्यावा.

संपूर्ण राज्यात मोठ्या प्रमाणात अति वृष्टी झाली त्यामध्ये नांदेड जिल्हा सुध्दा सुटला नाही जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडुन शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले .शेतकरी चिंता ग्रस्त झाला आहे .याकाळात शेतकऱ्याला धिर देणे शासनाचे कर्तव्य आहे .शेतकऱ्यांच्या शेताच्या बांधावर जाऊन शेतीची पाहणी करुन नुकसान ग्रस्त शेतकऱ्याला शासनाने तात्काळ मावेजा द्यावा शेतकरी अडचणीत सापडला आहे सरसकट पंचनामे करून शेतकऱ्याला तात्काळ देण्यात यावे

शेती परिसरात पूरपरिस्थिती सारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.शेतातील सर्व पिके पाण्याखाली गेले आहेत अनेक गावातील शेत जमीन खरडून गेली आहे अनेक ठिकाणची शेती संपूर्णतः पाण्याखाली गेल्याने शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला आहे आशा संबधित गावांना भेटी देवून पाहणी करुन आढावा घेतला व शासनाने तातडीने पंचनामे करून मदत देण्याचे आदेश दिले.

# सरसकट पंचनामे करा :राजेश पावडे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०३ सप्टेंबर-**



गत चार दिवसापासून नांदेड तालुक्यासह सर्व मराठवाड्यात मुसळधार पाऊस झाला आहे. यामुळे खरीप पिकांसह बागायती शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. दरम्यान शेतकरी हवालदिल झाला आहे, काही पिके खरडून गेली तर काही पाण्याखाली गेली आहेत. काहीचे पशुधन वाहून गेले तर काही जणांच्या घरांची पडझड झाली आहे. या परिस्थिती सरसकट पंचनामे करून, शासनाच्या वतीने तातडीने आर्थिक मदत करावी अशी मागणी काँग्रेस जिल्हा कार्याध्यक्ष राजेश पावडे यांनी शासनाकडे केली आहे.

# किनवट- माहूर तालुक्यातील शेतकऱ्यांना अर्थसहाय्य मिळवून देण्यास कटीबद्ध: आ. केराम

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, ०३ सप्टेंबर-**



३१ ऑगस्ट पासून किनवट माहूर तालुक्यात वादळी वाऱ्यासह पाऊस सुरू असून या पावसामुळे नदी नाल्यांना पूर येऊन खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले तर वादळी वाऱ्यात अनेकांच्या घरांची पडझड होऊन गोरगरिबांचे संसार उघड्यावर आले आहेत. या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून सरसकट शेतकरी व बेगर झालेल्या कुटुंबांना शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी अशा मागणीचे निवेदन आमदार भीमराव केराम यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सादर केले आहे.

किनवट व माहूर तालुक्यात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस सुरू आहे. मागील चोवीस तासात १८० मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. संततधार पावसामुळे नदी नाल्यांना पूर येऊन कापूस सोयाबीन ज्वारी तूर मूग उडीद अशा उभ्या खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले. नदी व नाल्याकाठच्या शेतात पुराचे पाणी शिरून पिकासह जमिनी खरडून गेल्या आहेत तर काही ठिकाणी पशुधन दगावले आहेत. सुसाटवारा व मुसळधार पावसात उभी पिके आडवी झाली असून शेतजमिनी पाण्याखाली आल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. वादळी पावसात अनेकांच्या घरांची पडझड होऊन गोरगरीब कुटुंबे उघड्यावर पडली आहेत. या नुकसानीचे तात्काळ वस्तुनिष्ठ पंचनामे करून सरसकट शेतकरी व बेघर झालेल्या कुटुंबाना शासनाने तातडीने अर्थसहाय्य मंजूर करावे अशी मागणी आमदार भीमराव केराम यांनी मुख्यमंत्र्याकडे केली आहे.

**शेतकऱ्यांना अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी कटिबद्ध**

किनवट माहूर तालुक्यावर जेव्हा जेंव्हा नैसर्गिक संकट ओढवते तेव्हा तेव्हा सरकारकडून नुकसानग्रस्त शेतकरी व बेघर कुटुंबीयांना अर्थसहाय मंजूर केले जाते. आपत्तीकाळात परिस्थितीवर लक्ष ठेवण्याच्या सूचना मी प्रशासनाला दिल्या आहेत. शेतकरी व नागरिकांनी हताश होऊ नये तालुक्यातील सरसकट शेतकऱ्यांना शासनाचे अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे असे आश्वासन आमदार भीमराव केराम यांनी शेतकऱ्यांना दिले आहे.

# कार्यकर्त्यांनी विधानसभा निवडणुकीच्या कामाला लागावे; आ.केराम यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**माहुर, ०३ सप्टेंबर-**

आगामी काळात होऊ घातलेल्या राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या हालचालींना वेग येत असल्याने किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचा विकासाचा पाया मजबूत करणारे भारतीय जनता पक्षाचे आ.भिमराव केराम यांनी देखील निवडणुकीच्या रणांगणात भारतीय जनता पक्षाचा झेंडा पुन्हा एकदा फडकविण्यासाठी दंड थोपटले आहे.त्याच अनुषंगाने २८ ऑगस्ट रोजी माहूर शहरातील बालाजी मंगलम येथे आयोजित एकदिवसीय विस्तारीत अधिवेशनात उपस्थित कार्यकर्ते व पदाधिकारी यांना संबोधित करताना आगामी विधानसभा निवडणूकीच्या तयारीसाठी तनमनाने व एकदिलाने कसून कामाला लागावे असे आवाहन केले.

किनवट-माहूर विधानसभा मतदार संघातील अठरा पगड जातीचे नेतृत्व करणारे आ. भीमराव केराम यांच्या अध्यक्षतेखाली २८ ऑगस्ट रोजी स्थानिक बालाजी मंगलम येथे भारतीय जनता पक्षाचे एकदिवसीय विस्तारीत अधिवेशन आयोजित करण्यात आले होते.त्याप्रसंगी ते बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की,केंद्र व राज्य सरकारचा मदतीचा हात असल्याने मतदारसंघाचा विकास झाला आहे. तर केंद्र व राज्य शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध जन कल्याणकारी योजनांमुळे नागरिकांना दिलासा मिळत असल्याने नाकर्ते विरोधक योजनांच्या यशस्वीतेबाबत शंका उपस्थित करत अपप्रचार करीत आहेत. परंतु या मतदारसंघातील मायबाप,बहिणभाऊ ही सर्वसामान्य जनता खरा विकासाचा चेहरा ओळखण्यासाठी आता हुशार झाली असून, कोणत्याही खोट्या नाट्या, नेरेटीव्ह अपप्रचाराला भिक घालत



नसल्याने त्यांच्या पायाखालची जमीन सरकत आहे.तेव्हा योजना बाबत अपप्रचार करणाऱ्यांच्या तोंडाला लगाम लावण्यासाठी कार्यकर्त्यांनी सजग राहावे. तसेच प्रत्येक गावपातळीवरील एकही नागरिक विविध योजनांचा लाभांपासून वंचित राहणार नाही याची काळजी घ्यावी! असेही यावेळी आ. केराम यांनी कार्यकर्त्यांना व पदाधिकाऱ्यांना सूचनावजा आवाहन केले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रदेश सदस्य सुधाकर भोयर, पद्माताई गिरे, सौ. संध्याताई राठोड, किशन मिराशे, अविनाश राठोड, जोतीराम राठोड, विजय आमले राजेंद्र केशवे, पुरुषोत्तम लांडगे, रामभाउ द्रोशेट्टीवार, सुजान भारती, विलास चौधरी, किसन गवळी, प्रफुल्ल राठोड, राजू दराडे, संजय बनसोडे, अमोल पाटील, रहेमतअली सय्यद, अशोक जोशी, दिलीप मुनगिनवार, आकाश कांबळे, सौ.अर्चना दराडे, सौ. निर्मला जोशी यांचेसह भाजपाचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. प्रास्ताविक अनिल वाघमारे यांनी तर सुत्रसंचलन अपिल बेलखोडे यांनी केले.सदरील एकदिवसीय अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी नगरसेवक गोपु महामुने यांनी आपल्या सहकाऱ्यांसह अथक परिश्रम घेतले.

# जलजन्य आजराचा धोका टाळण्यासाठी नागरिकांनी खबरदारी घ्यावी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०३ सप्टेंबर-**

नांदेड जिल्ह्यात सध्या मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने पावसाळ्यातील दूषित पाण्यामुळे जलजन्य आजारांचा धोका वाढला आहे. यासोबतच, पावसाळ्यामध्ये किटकजन्य आजारांचेही प्रमाण वाढते. या पार्श्वभूमीवर, नांदेड जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाच्या वतीने नागरिकांना आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पावसाळ्यात काविळ, गॅस्ट्रो, लेप्टोस्पायरोसीस, डिसेंट्री, डायरिया तसेच डेंग्यू, चिकनगुनिया, मलेरिया, झिका या किटकजन्य आजारांचा धोका असतो. या आजारांमध्ये लघवी पिवळी होणे, भूक न लागणे, अशक्तपणा, उलटी, जुलाब, ताप, पोटात कळ मारून शौच येणे, अतिसार, तीव्र सतत डोके व पोट दुखी, नाक, तोंड व हिरड्यातून रक्त येणे, त्वचेवर पुरळ उठणे, झोप येणे आणि अस्वस्थता, श्वास घेण्यास त्रास होणे अशी लक्षणे दिसून येतात.

जलजन्य व किटकजन्य आजारांपासून बचावासाठी नागरिकांनी खालील उपाययोजना कराव्यात. यामध्ये जलजन्य आजार टाळण्यासाठी पाणी गाळून व उकळून प्यावे, उघड्यावरचे अन्नपदार्थ खाऊ नये, उघड्यावर शौचास बसू नये, ताप आल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा. तसेच किटकजन्य आजारांपासून बचावकरण्यासाठी घरांच्या खिडक्यांना जाळ्या बसवाव्यात, झोपताना मच्छरदानीचा वापर करावा, कोरडा दिवस पाळावा, पाण्याचे डबके साचू देऊ नये. ताप आल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा, अंगावर काढू नये. आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मीनल करनवाल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर, जिल्हा हिवताप व हत्तीरोग अधिकारी डॉ. राजेश्वर माचेवार यांनी नागरिकांना आवाहन केले आहे.

# 'भाऊचा डब्बा' झाला बाराशे दिवसाचा......

## शेवटच्या श्वासापर्यंत सेवा करणार; पुरुषोत्तम धोंडगेंनी व्यक्त केला निर्धार

**तभा वृत्तसेवा**
**कंधार, ०३ सप्टेंबर-**

रुग्ण, त्यांचे नातेवाईक व गरजूंना भाऊच्या डब्याच्या माध्मातून सेवा करण्याची संधी उपलब्ध करून देणे, हे मी माझे भाग्य समजतो. सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेऊन सुरू करण्यात आलेला 'भाऊचा डब्बा ' हा उपक्रम असाच अविरतपणे सुरू राहील. मागील तीन वर्षांपासून यात खंड पडला नाही. पुढेही पडणार नाही. शेवटच्या श्वासा पर्यंत भाऊच्या डब्याच्या माध्यमातून रुग्णांना बरोबरच गोरगरीब, उपेक्षितांची सेवा करणार, असा निर्धार भाऊच्या डब्याचे संकल्पक प्रा. डॉ. पुरुषोत्तम धोंडगे यांनी व्यक्त केला.

भाऊचा डब्बा या उपक्रमाने नुकताच बाराशे दिवसाचा पल्ला ओलांडला. जेष्ठ स्वतंत्र सेनानी, शिक्षणमहर्षी, माजी खासदार व माजी आमदार दिवंगत डॉ. केशवराव धोंडगे यांच्या शतकोत्सवी



वाढदिवसाचे औचित्य साधून श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीच्यावतीने दि. १ मे २०२१ पासून कोरोना रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी भाऊचा डब्बा हा स्तुत्य उपक्रम सुरू करण्यात आला. या उपक्रमाने १२०० दिवसाचा पल्ला ओलांडला आहे.

दिवंगत भाई डॉ. केशवराव धोंडगे यांनी नाहिरेवाल्यांसाठी आपले संपूर्ण आयुष्य झिजविले. त्यांना न्याय मिळवून दिला. मन्याडखोऱ्यात शैक्षणिक दालने उघडून तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षणाची गंगा नेली. उपेक्षित, शोषित समाज त्यांचा केंद्रबिंदू होता. त्यांचे विचार आजच्या काळाला दिशा देणारे आहेत. त्यांनी कधीच तत्वांशी तडजोड केली नाही. त्यांचा वसा पुढे चालविण्याचा आम्ही प्रयत्न करीत असून रुग्ण सेवा त्याचाच एक भाग असल्याचे प्रा. डॉ. पुरुषोत्तम धोंडगे यांनी यावेळी सांगितले.

माजी खासदार व माजी आमदार दिवंगत डॉ.भाई केशवराव धोंडगे यांनी आपल्या हयातीत गोरगरीब जनतेच्या कल्याणासाठी व हितासाठी अहोरात्र प्रयत्न करुन त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले होते. त्यांचाच वारसा पुढे चालू ठेवण्याचे कार्य त्यांचे सुपुत्र पुरुषोत्तम धोंडगे करीत असून त्यांनी गोरगरीब जनतेसाठी भाऊचा डब्बा या नावाने अन्नदानाचा उपक्रम चालू केला आहे. या उपक्रमाने नुकताच बाराशे दिवसाचा पल्ला गाठला आहे.